म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ३८

श्री

# महात्माजींची

# उत्तर-गीता.

REFBK-0001748

लेखक—

वासुदेव ग

# महात्माजींची उत्तर-गीता.

[ गांधी-गीतेचा दुसरा भाग. ]

लेखक-

वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.,
संपादक ' आनंद ', पुणें.

सन ] आवृत्ति पहिली. [ १९२०.

किंमत ८ आणे.

१७.४८.

मुद्रक व प्रकाशक
गोपाळ बळवंत जोशी, ' आनंद ' छापखाना,
३३० सदाशिव पेठ, पुणें शहर.

REFBK-0001748

# प्रस्तावना.

गांधी-गीतेचा हा दुसरा भाग प्रसिद्ध होत आहे. पहिला भाग प्रसिद्ध झाल्याला सारें वर्ष सवा वर्षच झालें. पण येवढ्या अल्प काळांत महात्माजीच्या मतांचा प्रसार सर्व देशभर इतक्या झपाट्यानें झाला, ठिकठिकाणीं त्यांना अनेक महत्त्वाच्या विषयांवर भाषणें करण्याचे इतके प्रसंग आले, व त्यांच्या मतांवर प्रामाणिक व अप्रामाणिक टीकाकारांच्या टीकेचा इतका वर्षाव झाला कीं त्यांचीं खरीं खरीं मतें काय आहेत, त्यांच्यावर कोणते आक्षेप घेण्यांत येतात व त्यावर महात्माजी काय उत्तरें देतात यांची माहिती करून घेणें प्रत्येक हिंदी माणसाचें एक अवश्यक कर्तव्यच होऊन बसलें आहे. त्यामुळें ही सगळी माहिती संकलित करून महाराष्ट्र वाचकांस पुस्तकरूपानें अर्पण करणें अवश्य झालें आहे.

पहिल्या भागांत महात्माजीच्या तोंडीं घातलेल्या भाषणांत आधारावांचून एक अक्षरहि लिहिलेलें नव्हतें. तथापि पुस्तकांत ते आधार जागजागीं नमूद न केल्यामुळें टीकाकारांना टीका करायला तेवढीच जागा मिळाली. या दुसऱ्या भागांत महात्माजींचीं ' यंग इंडिया ' ( इंग्रजी ) व ' नव-

जीवन ’ ( गुजराथी ) हीं दोन वर्तमानपत्रें, श्रीमती सौ. अवंतिकाबाई गोखले यांनीं लिहिलेलें महात्माजींचें चरित्र, Non-Cooperation नांवाचें मद्रासेस प्रसिद्ध झालेलें इंग्रजी पुस्तक व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेले महात्माजींच्या भाषणाचे व मुलाखतींचे विश्वसनीय रिपोर्ट यांचा आधार मुख्यतः घेतलेला आहे, व जागजागीं या आधारस्थळांचा संक्षेपानें नामनिर्देश केला आहे. यामुळें या भागाला नांवें ठेवण्याला टीकाकारांना पूर्वींची आधारांची सबब उपयोगीं पडावयाची नाहीं; कांहीं तरी नवी सबब शोधावी लागेल.

महात्माजींचीं या पुस्तकांत दिलेलीं मतें किंवा त्यांना प्रश्न करणारा तरुण भारत किंवा इतर लोक यांचीं मतें यांच्याशीं माझ्या स्वतःच्या मतांचा अर्थाअर्थी संबंध नाहीं. मी गांधीजीचा अंधभक्ताहि नाहीं, आणि त्यांची टवाळी करणाराहि नाहीं. मी केवळ एक जिज्ञासु आहें, आणि माझ्यासारख्या जिज्ञासूंची इच्छा तृप्त करण्यासाठींच हें पुस्तक लिहिलें आहे हें येथें स्पष्टपणें सांगणें अवश्य आहे.

आनंदकार्यालय, पुणें.
ता. ११।१२।२०.

वासुदेव गोविंद आपटे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| उपोद्घात ... ... ... ... ... | १ |
| १ 'वंदेमातरम्' ... ... ... ... | ८ |
| २ कर्तव्य आणि अधिकार ... ... ... | ९ |
| ३ धर्म आणि राजकारण ... ... ... | १० |
| ४ धर्म आणि भवितव्यता ... ... ... | १३ |
| ५ हिंदुधर्म ... ... ... ... ... | १५ |
| ६ वर्णाश्रमधर्म आणि अस्पृश्य जाति ... ... | १७ |
| ७ स्त्रिया अबला कीं सबला? ... ... ... | २२ |
| ८ स्त्रिया आणि देवदर्शन ... ... ... | २० |
| ९ स्त्रिया आणि देशकार्य ... ... ... | २४ |
| १० पतिव्रता स्त्रिया ... ... ... ... | २७ |
| ११ जातिभेद ... ... ... ... ... | ३१ |
| १२ विधवांचे शाप ... ... ... ... | ३४ |
| १३ ब्रह्मचर्य ... ... ... ... ... | ३६ |
| १४ जुनें भांडवल ... ... ... ... | ४२ |
| १५ लोकशाही वि. गुंडशाही ... ... ... | ४६ |
| १६ जयघोष ... ... ... ... ... | ५१ |
| १७ ग्रामसुधारणा ... ... ... ... | ५२ |

मुद्रक व प्रकाशक
गोपाळ बळवंत जोशी, ' आनंद ' छापखाना,
३३० सदाशिव पेठ, पुणें शहर.

REFBK-0001748

# प्रस्तावना.

गांधी-गीतेचा हा दुसरा भाग प्रसिद्ध होत आहे. पहिला भाग प्रसिद्ध झाल्याला सारें वर्ष सवा वर्षच झालें. पण येवढ्या अल्प काळांत महात्माजींच्या मतांचा प्रसार सर्व देशभर इतक्या झपाट्यानें झाला, ठिकठिकाणीं त्यांना अनेक महत्त्वाच्या विषयांवर भाषणें करण्याचे इतके प्रसंग आले, व त्यांच्या मतांवर प्रामाणिक व अप्रामाणिक टीका-कारांच्या टीकेचा इतका वर्षाव झाला कीं त्यांचीं खरीं खरीं मतें काय आहेत, त्यांच्यावर कोणते आक्षेप घेण्यांत येतात व त्यावर महात्माजी काय उत्तरें देतात यांची माहिती करून घेणें प्रत्येक हिंदी माणसाचें एक अवश्यक कर्तव्यच होऊन बसलें आहे. त्यामुळें ही सगळी माहिती संकलित करून महाराष्ट्र वाचकांस पुस्तकरूपानें अर्पण करणें अवश्य झालें आहे.

पहिल्या भागांत महात्माजींच्या तोंडीं घातलेल्या भाष-णांत आधारावांचून एक अक्षरहि लिहिलेलें नव्हतें. तथापि पुस्तकांत ते आधार जागजागीं नमूद न केल्यामुळें टीका-कारांना टीका करायला तेवढीच जागा मिळाली. या दुसऱ्या भागांत महात्माजींचीं ' यंग इंडिया ' ( इंग्रजी ) व ' नव-

जीवन ' ( गुजराथी ) हीं दोन वर्तमानपत्रें, श्रीमती सौ. अवंतिकाबाई गोखले यांनीं लिहिलेलें महात्माजीचें चरित्र, Non-Cooperation नांवाचें मद्रासेस प्रसिद्ध झालेलें इंग्रजी पुस्तक व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेले महात्माजींच्या भाषणाचे व मुलाखतींचे विश्वसनीय रिपोर्ट यांचा आधार मुख्यतः घेतलेला आहे, व जागजागीं या आधारस्थळांचा संक्षेपानें नामनिर्देश केला आहे. यामुळें या भागाला नांवें ठेवण्याला टीकाकारांना पूर्वींची आधारांची खबर उपयोगीं पडावयाची नाहीं; कांहीं तरी नवी खबर शोधावी लागेल.

महात्माजींचीं या पुस्तकांत दिलेलीं मतें किंवा त्यांना प्रश्न करणारा तरुण भारत किंवा इतर लोक यांचीं मतें यांच्याशीं माझ्या स्वतःच्या मतांचा अर्थाअर्थी संबंध नाहीं. मी गांधीजीचा अंधभक्तहि नाहीं, आणि त्यांची टवाळी करणाराहि नाहीं. मी केवळ एक जिज्ञासु आहें, आणि माझ्यासारख्या जिज्ञासूंची इच्छा तृप्त करण्यासाठींच हें पुस्तक लिहिलें आहे हें येथें स्पष्टपणें सांगणें अवश्य आहे.

आनंदकार्यालय, पुणें.
ता. ११।१२।२०.

वासुदेव गोविंद आपटे.

# अनुक्रमणिका.

विषय. पृष्ठ.

उपोद्घात ... ... ... ... ... १
१ 'वंदेमातरम्' ... ... ... ... ८
२ कर्तव्य आणि अधिकार ... ... ... ९
३ धर्म आणि राजकारण ... ... ... १०
४ धर्म आणि भवितव्यता ... ... ... १३
५ हिंदुधर्म ... ... ... ... ... १५
६ वर्णाश्रमधर्म आणि अस्पृश्य जाति ... ... १७
७ स्त्रिया अबला कीं सबला? ... ... ... २२
८ स्त्रिया आणि देवदर्शन ... ... ... २०
९ स्त्रिया आणि देशकार्य ... ... ... २४
१० पतिव्रता स्त्रिया ... ... ... ... २७
११ जातिभेद ... ... ... ... ... ३१
१२ विधवांचे शाप ... ... ... ... ३४
१३ ब्रह्मचर्य ... ... ... ... ... ३६
१४ जुनें भांडवल ... ... ... ... ४२
१५ लोकशाही वि. गुंडशाही ... ... ... ४६
१६ जयघोष ... ... ... ... ... ५१
१७ ग्रामसुधारणा ... ... ... ... ५२

१८ मजूर वि. भांडवलवाले ... ... ... ५६

१९ गोरक्षण ... ... ... ... ... ५९

२० भयंकर दिव्य ... ... ... ... ६२

२१ रेलवेंतल्या चोऱ्या ... ... ... ... ६५

२२ स्वदेशी ... ... ... ... ... ६६

२३ खिलाफतीचा प्रश्न ... ... ... ... ७३

२४ असहकारिता... ... ... ... ... ८२

२५ एका वर्षांत स्वराज्य... ... ... ... ९२

२६ परिशिष्ट (कलकत्याच्या कांग्रेसमधील भाषण.) १–१६

नवें पुस्तक! नवें पुस्तक!

विजयादशमीच्या मुहूर्तावर प्रसिद्ध झालें.

# रवीचे उज्ज्वल किरण.

अनुवादक—वा. गो. आपटे, बी. ए., संपादक 'आनंद'

पृष्ठें १३२ किं. १२ आणे. व्ही. पी.नें १५ आणे.

ज्यांचीं भाषणें ऐकण्यासाठीं सारें जग हपापलें आहे व जाज्वल्य देशाभिमान, स्वार्थत्याग, स्पष्टवक्तेपणा, निर्भीडता, अंतर्भेदी दृष्टि, काव्यप्रतिभा आणि भाषाप्रभुत्व इ० गुणांबद्दलची ज्यांची कीर्ति त्रिखंडांत पसरली आहे, त्या कविसम्राट डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या अत्यंत सुरस व चटकदार गोष्टी, मार्मिक रूपकें व भारतभूमीच्या उन्नतीसाठीं अत्यंत कळकळीनें केलेल्या प्रार्थना यांचा निवडक संग्रह म्हणजे अमूल्य रत्नांचा ठेवाच होय. हा ठेवा 'रवीचे उज्ज्वल किरण' या पुस्तकांत असून प्रत्येक गोष्टीचें रहस्य उकलून दाखविणारा उपोद्घात व कवीचें सुंदर चित्र आरंभीं जोडिलें आहे. हें पुस्तक वाचून ज्याचे अंतःकरणांत उल्हास, देशाभिमान, उच्च आकांक्षा इ० उत्तेजित होणार नाहींत असा अरसिक क्वचितच आढळेल.

पत्ता—आनंदकार्यालय, पुणें.

# गांधी गीता

अथवा

विसाव्या शतकांतला श्रीकृष्णार्जुनसंवाद

( पूर्वार्ध. )

देशभक्तांचे मुकुटमणि महात्मा गांधी

यांचीं स्वराज्य, नेमस्त आणि जहाल, देशोन्नतीची गुरुकिल्ली, विद्यार्थी आणि देशसेवा, धर्म व धर्म शिक्षण, पाश्चात्य सुधारणा इ० महत्त्वाच्या विषयांसंबंधाचीं मतें समजून घेण्याची तुम्हांला इच्छा असलीच पाहिजे. नाहीं असें होणार नाहीं. तर मग तुम्ही हें पुस्तक अवश्य वाचा. किं. ८५

---

# नाट्यरूप भारतवर्ष.

हिंदुस्थानच्या इतिहासांतील बौद्धकालापासून पेशवाई अखेरपर्यंतच्या काळांतील सत्तावीस ठळक प्रसंग घेऊन ते नाटकांतील प्रवेशांच्या रूपानें वरील पुस्तकांत वर्णिले आहेत. या पुस्तकांतील प्रसंग शाळांतील संमेलनासारख्या प्रसंगीं प्रयोगरूपानें करतां येण्याजोगे आहेत. किं. १ रु.

पत्ता—आनंदकार्यालय, पुणें.

# महात्मा गांधी

## यांची

# उत्तर-गीता

## उपोद्घात.

विजया दशमीच्या शुभ दिवशीं पंचवीस वर्षांचा एक तरुण आपल्या रोजच्या वहिवाटीप्रमाणें पहाटेस चार वाजतां उठून, शुचिर्भूत होऊन, व देवाची प्रार्थना, स्तोत्रपाठ, शारीरिक व्यायाम, स्नान, व संध्यावंदनादि नित्यकृत्यें उरकून बाहेर जाण्यास निघाला होता. अंगांत एक खादीची बंडी, तिच्यावर एक खादीचाच कोट, व डोक्याला खादीचीच टोपी, असे तीनच कपडे त्याच्या अंगावर होते. ही खादी त्यानें स्वतः हातानें सूत काढून हातमागावर स्वतः हातानें विणलेली होती. दोन तीन वर्षांपूर्वीं त्याला कोणीं पाहिलें असतें तर कांहीं निराळाच प्रकार दिसला असता. त्या वेळीं

विलायती कापडाच्या फॅशनेबल उंची कपड्यांनीं नख-शिखांत सजलेला, पायांत पेटंट लेदरचा बूट, व तोंडांत चिरूट, अशा थाटाची त्याची राहणी तुम्हांला दिसली असती. सूर्याच्या कोमल किरणांनीं खिडकींतून आंत येऊन त्याला उठवावयाचें; मग गरमगरम चहाचा पेला झोकल्यावर व सिगारेटचा झुरका घेतल्यावर प्रातर्विधि उरकावयाचा; देवाचें नांव चुकुनसुद्धां तोंडून निघावयाचें नाहीं; व्यायाम करणें म्हणजे निष्कारण कालक्षेप करणें अशी समजूत नसली तरी अंगांत भरलेल्या आळसामुळें तो हातून कधीं घडावयाचा नाहीं; पण केशरचना वगैरे करण्यांत आणि संगीत नाटकां-तलीं पदें गाण्यांत बराचसा वेळ जावयाचा; देहयष्टि पाहिली तर जेमतेमच! त्याचा त्या वेळचा पोषाख म्हणजे फ्रॉक, शर्ट, जाकीट, कोट, कॉलर, नेकटाय, रिस्टवॉच, पायांत रेशमी पायमोजे व त्यांवर चढविलेला पेटंट लेदरचा करकर वाज-णारा डॉसन आणि कंपनीच्या कारखान्यांतला बूट असा असे. पण अलीकडे महात्मा गांधी यांचीं पुस्तकें वाचून त्याला उपरति झाली होती. त्याची वृत्ति अगदीं साफ पालटली होती. परदेशी मालाच्या भपक्याला मोहून आपण देशाचें दारिद्र्य वाढविण्यास मात्र कारण झालों हा विचार मनांत आला म्हणजे त्याचें अंतःकरण पश्चात्तापानें दग्ध होत असे. आपल्या हातून न कळत आपल्या प्राचीन आर्यसंस्कृतीचा व रीतरिवाजांचा अनादर झाल्याबद्दल त्याच्या मनाला फार

हळहळ वाटत असे. देशहिताचे कामीं आपण आपलें आयुष्य वेंचावें असा विचार त्याच्या डोक्यांत घोळूं लागला होता. या कामीं कोणातरी सत्पुरुषाचा उपदेश घ्यावा असें त्याला वाटूं लागलें होतें. हिंदुस्थानच्या सद्यः स्थिती संबंधाचे विचार त्याच्या डोक्यांत नेहमीं सुरूं होते. या विषयासंबंधानें विद्वान् देशभक्तांनीं लिहिलेलीं वर्तमानपत्रें तो नित्यनेमानें वाचूं लागल्यापासून व त्यांवर स्वत: विचार करूं लागल्यापासून आंग्लो—इंडियन लेखक लिहितील तें वेदवाक्य, तें खोटें कधीं असावयाचें नाहीं, व त्यांच्या उपदेशाप्रमाणें वागण्यांतच हिंदुस्थानचें हित आहे हें त्याचें मत अजिबात पालटलें होतें. हिंदुस्थानांत अबादानी आहे हा त्याचा भ्रम दूर झाला होता. उलट, हिंदुस्थान जवळजवळ एक शतकापासून अधोगतीला लागला आहे आणि त्याच्या उद्धारार्थ जोराचे व नेटाचे प्रयत्न लवकरच सुरू न केले तर आणखी पंनास वर्षांनीं काय शोचनीय स्थिति प्राप्त होईल कोण जाणे असें भय त्याच्या मनाला वाटूं लागलें होतें. तो आपल्या देशाच्या भविष्यकालीन स्थितीचा विचार करूं लागला म्हणजे हिंदुस्थानचें भवितव्य काळ्याकुट्ट रंगांत त्याच्या दृष्टीस दिसूं लागे, आणि किंकर्तव्यविमूढ होऊन तो उदासीनतेंत देहभान विसरून जात असे. मनाच्या अशा स्थितींत तो बसला असतां एकदां सुदैवानें त्याची व महात्मा गांधी यांची अकस्मात् गांठ पडली व त्याला त्यांच्या-

पुढें आपल्या शंका मांडून उपदेशामृतप्राशनाचा अलभ्य लाभ करून घेण्याचा सुयोग सुदैवानें लाभला होता वगैरे हकीकत 'गांधी-गीता' या पुस्तकांत आलीच आहे. महात्माजींशीं झालेल्या अल्प परिचयानें व सहवासानें त्याच्या चित्तवृत्तींत विलक्षणच फरक घडून आला होता. त्याची फ्याशनेबल राहणी पालटून साध्या राहणींत त्याला मौज वाटूं लागली होती. त्याच्या विचारांत विलक्षण क्रांति घडून आली होती. सूर्यकिरणांनीं अंधेराला ज्याप्रमाणें पार घालवून द्यावें त्या-प्रमाणें महात्माजींच्या उपदेशानें त्याच्या मनांतल्या निराशेला पार घालवून दिलें होतें. आपल्या मातृभूमीच्या उद्धारार्थ तनमनधन अर्पून व भगवंताच्या कृपेवर श्रद्धा ठेवून प्रयत्न केले असतां तो दयाळु परमात्मा यश दिल्यावांचून राहणार नाहीं अशी त्याच्या मनाची खात्री झालेली होती. त्याच्या मनाची खिन्नता व निरुत्साह हीं जाऊन त्या ठिकाणीं अपूर्व आशावादित्व व उल्हास यांचा संचार सुरू झाला होता. 'गांधी-गीतेंत' सांगितलेले सर्व संवाद त्यानें अक्षरशः ध्यानांत ठेविले होते, व शेवटीं महात्माजींचा निरोप घेतांना त्यांनीं दिलेला आशिर्वाद पूर्णपणें त्याच्या लक्षांत होता. त्या-वेळीं आपलें सर्वस्व मातृभूमीचे चरणीं अर्पण करण्याची त्यानें केलेली प्रतिज्ञा पाळण्याच्या उद्योगालाहि तो लागलेला होता. त्याच्या समजुतींत एकमात्र मोठी चूक झालेली होती, व ती लवकरच त्याच्या स्वतःच्या निदर्शनाला आली. ती ही कीं, प्रत्यक्ष व्यवहाराशीं आजपर्यंत संसर्ग न घडल्यामुळें

व जगाचा अनुभव नसल्यामुळें त्याला वाटलें कीं आतां आपला मार्ग सुगम आहे. आपण कामाला लागण्याचाच काय तो अवकाश आहे. कामाला लागलों कीं यशः–प्राप्ति झालीच. पण हा सगळा गंधर्वनगरीचा देखावा होता. हें मृगजळ आहे, हा केवळ आभास आहे, खरी यशः प्राप्ति आपल्या दृष्टीच्या टप्प्यांतसुद्धां आलेली नाहीं असें त्याला अनुभवानें लवकरच कळून चुकलें. तो आपण बरोबर आणिलेल्या ज्ञानभांडाराच्या जोरावर आपल्या सोबत्यांशीं निरनिराळ्या विषयांवर चर्चा करून देशसेवेकडे त्यांना प्रवृत्त करूं लागला, तेव्हां त्या सोबत्यांत जसे कांहीं थोडेसे लोक श्रद्धाळु होते, तसे कांहीं शंकेखोर, तर्कटी, व कुत्सितहि होते. त्यांनीं पदोपदीं त्याला कांहींतरी प्रश्न व शंका विचारून अडवावें व निरुत्तर करावें. त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांत कांहीं प्रश्न अगदीं अलीकडे घडलेल्या गोष्टींविषयींचे होते. कांहीं जुनेच, पण निराळ्या दृष्टीनें विचार करण्यास लावणारे होते; आणि कांहींतर केवळ लुच्चेगिरीचे म्हणजे तरुणभारताच्या विधानांचा विपर्यास करून मांडलेले होते. वादविवाद करण्याचें कौशल्य त्याचे ठायीं असावें तसें नसल्यामुळें हा प्रश्नांचा भडिमार झालेला पाहून बिचारा अगदीं घाबरून गेला, आणि पुनः महात्माजीकडे जाऊन सर्व प्रश्नांचा नीट खुलासा विचारून यावें व मग आपल्या कार्याला लागावें असा मनाचा निश्चय करून तो आज महात्मा गांधी यांच्या दर्शनासाठीं पुनः गेला होता. तो अंतःकरणाचा अत्यंत निष्कपट, खराखरा

जिज्ञासु, व अल्प कां होईना पण कांही तरी देशसेवा करून कृतार्थ व्हावें अशी तळमळ मनास लागलेली आहे हें महात्माजींनीं पाहिल्याच भेटीला ओळखून ठेविलें होतें. म्हणून तो आलेला पाहतांच महात्माजींना आनंद झाला. त्यांनीं त्याला प्रेमानें जवळ घेतलें, आणि गोड शब्दांनीं विचारलें, 'वा तरुण भारता! कर्तव्याचरणाला एकदम लागतों अशी प्रतिज्ञा करून तूं येथून गेलास त्याला बरेच दिवस झाले. इतक्या दिवसांत तूं काय काय केलेंस? तुला तुझा कर्तव्य-मार्ग सुखकर झाला ना? कां कांहीं अडचणी येऊन तुझी प्रगति कुंठित झाली तें सगळें संकोच न धरतां सांग. मला तुझी हकीकत ऐकण्याची फार उत्कंठा झाली आहे.' तरुणानें हात जोडून खरा प्रकार जसा घडला होता तसा सांगितला. तेव्हां महात्माजी हंसून म्हणाले, 'येवढेंच ना? मग त्यामुळें खिन्न किंवा नाउमेद होण्याचें कारण नाहीं. तुला जगाचा अनुभव नाहीं, व व्यवहारांतला मार्ग कसा विषम आणि कंटकमय आहे तो तुला ठाऊक नाहीं, म्हणून तूं इतका भांबावून गेलास. पण अनुभवानें तुला कळून येईल कीं जगामध्यें खरें काम करणाऱ्या सगळ्याच देशभक्तांना अशा ठेंचा खाव्या लागतात; याहून किती तरी पटीनें भयंकर अशा संकटांना तोंड द्यावें लागतें. संकटें परमेश्वर धाडतो तीं माणसाची कसोटी पाहण्यासाठीं असतात. कुतर्क, कुशंका, आणि उपहास या गोष्टींना काय भ्यावयाचें आहे? या प्रत्येक देशभक्त लेखकाच्या व वक्त्याच्या पांचवीला पुजिलेल्याच

असतांत. आपली स्वतःची बाजू खंबीर करून चालूं लाग-ल्यावर मार्गावरल्या या कंटकांना पायानें तेव्हांच चिरडून टाकतां येतें. कांहीं हरकत नाहीं. तूं माझे जवळ कांहीं दिवस राहा, आणि तुला जें जें कांहीं विचारावेंसें वाटेल तें तें खुशाल मोकळ्या मनानें विचार. तुझ्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें मी देईन आणि तुला देशसेवेला पाठवीन अशी मी उमेद बाळगतों. निराश होण्याचें कारण नाहीं.'

महात्माजींचें हें प्रेमळ व प्रोत्साहक भाषण ऐकून तरुण भारतानें त्यांना कांहीं पूर्वीं संभाषणांत येऊन गेलेल्या विष-यांवर, कांहीं अलीकडे उपस्थित झालेल्या वादग्रस्त विषयां-संबंधानें व कांहीं पूर्वीं विचारण्याचे राहिलेल्या विषयांसंबंधानें प्रश्न विचारले व महात्माजींनीं त्याच्या प्रश्नांचीं समर्पक उत्तरें दिलीं. हे प्रश्न व उत्तरें आतां क्रमाक्रमानें वाचकांस सादर करतों. तरुणभारतानें विचारलेले हे प्रश्न क्रमवार विचारलेले नव्हते. ज्या वेळीं जो प्रश्न विचारावासा त्याला वाटला, त्या वेळीं त्यानें तो विचारला. यामुळें त्याच्या प्रश्नांत विस्कळित-पणा दिसेल. पण त्याला प्रस्तुत लेखकाचा नाइलाज आहे. सध्याच्या काळचे श्रीकृष्ण आणि आधुनिक जिज्ञासु अर्जुन यांच्यामध्यें झालेले हे संवाद जरी सूत्रबद्ध नसले तरी ते बोधप्रद व हितप्रद खास आहेत, येवढ्यांतच वाचकांनीं समाधान मानून घ्यावें अशी विनंति करून ते संवाद आतां यथाक्रम देतों.

## १ ‘ वंदे मातरम् ’

त. भा.—‘ वंदे मातरम् ’ हें पद हिंदुस्थानचें राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारण्यांत आलें आहे. या गीतासंबंधानें आपणांस काय वाटतें?

**महात्मा.**—‘ वंदे मातरम् ’ हें गीत माझ्या मतें अत्यंत मनोहर व हिंदुस्थानचें राष्ट्रीय गीत होण्यास सर्वथा पात्र आहे. या गीताची खुबी ही आहे कीं त्यांत आपल्या भारत-मातेला बरोबर लागू पडतील अशींच विशेषणें योजिलेलीं आहेत. आपल्या लोकांना हें गीत गाण्याचा कितीसा अधिकार हल्लीं पोंचत आहे येवढा काय तो प्रश्न आहे. कवीनें आपल्या मातृभूमिचें गौरव समजावून सांगण्यासाठीं व भविष्य-काळीं तिला प्राप्त होणाऱ्या स्वरूपाचा आम्हांला बरोबर अंदाज करतां यावा म्हणून तिचें शब्दचित्र या गीतांत काढलें आहे. पण ते शब्द भविष्यकालविषयक आहेत हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. या भरतभूमीची सगळी आशा सध्याच्या तरुण मंडळीवर आहे, व कवीनें मातृभूमीचें वर्णन करतांना योजिलेला प्रत्येक शब्द खरा करून दाखविण्याची जबाबदारी या मंडळीवर अर्थात् आहे. ही गोष्ट हें गीत गातेवेळीं तुमच्यासारख्यांनीं अवश्य ध्यानांत ठेविली पाहिजे. (ता. २७।४।१९१५ रोजीं मद्रास येथें झालेलें व्याख्यान.)

# २ कर्तव्य व अधिकार.

त. भा.—आपल्या धर्मांत व्यावहारिक उपयोगाचें असें कोणतें तत्त्व आपल्या दृष्टीनें हल्लींच्या काळीं विशेष महत्त्वाचें आहे?

म०—कर्तव्यपालन हें. पण मौज ही आहे कीं जो उठतो तो नवे नवे हक्क व अधिकार मागत सुटतो, आणि कर्तव्यपालनाकडे कोणी लक्षच देत नाहीं! कर्तव्यपालन हा नवे हक्क व अधिकार संपादण्याचा निश्चित मार्ग आहे. आपणांस जें पाहिजे तें सगळें कर्तव्यपालनानें मिळूं शकतें. कर्तव्यपालन करीत गेल्यानें कोणालाहि भिण्याचें कारण राहत नाहीं. माझे गुरु ना. गोखले यांनीं मला हाच उपदेश दिला आहे. हाच उपदेश माझ्या जीवनांत मला मार्गदर्शक झाला आहे व पुढेंहि होईल. धर्म व राजकारण यांची सांगड कायमची घातली गेली पाहिजे. (मद्रास येथें वाय. एम. ए. च्या सभेंत २७।४।१५ रोजीं केलेलें भाषण.)

# ३ धर्म आणि राजकारण.

त० भा०—धर्म आणि राजकारण यांची सांगड घातली पाहिजे असें आपण आतां सांगितलें, त्यावरून मला नीटसा बोध झाला नाहीं. आपण या मुद्द्याची अधिक फोड करून सांगाल काय ?

म०—माझ्या म्हणण्याचा मतलब हा आहे, कीं धर्माच्या गोष्टी नुसत्या तोंडानें बोलावयाच्या, प्रत्यक्ष आचरणांत धर्मतत्त्वाचें प्रतिबिंब पडलेलें दाखवावयाचें नाहीं हा क्रम उपयोगाचा नाहीं. राजकारणांत सर्वप्रकारचा व्यवहार समाविष्ट होतो. म्हणून मी म्हणतों कीं या हिंदुस्थान देशावर खरें प्रेम करणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें राजकारणांत पडून आपलें राजनीतिक जीवन व राजकारणी संस्था यांना धार्मिक म्हणजे अध्यात्मिक स्वरूप दिलें पाहिजे.

त० भा०—तें कसें द्यावयाचें ? आणि आपलें राजकीय जिवन अध्यात्मिक बनवावयाचें म्हणजे तरी काय ?

म०—तुमचे प्रश्न अगदीं बरोबर आहेत. माझ्यापुढें हे प्रश्न अनेक वेळां उभे राहिले आहेत. निरनिराळे लोक निरनिराळ्या तऱ्हेनें त्याचे अर्थ करीत असतात. या प्रश्नाचा जसजसा खोल विचार करीत जावें तसतशी त्याची कठिनता अधिकाधिक भासत जाते. मी या प्रश्नाचा असा अर्थ समजतों कीं मनु-

ष्याचें राजकीय जीवन हें त्याच्या स्वतःच्या जीवनाचा प्रतिध्वनि झाला पाहिजे. त्या दोघांत विसंगतता असतां कामा नये. आपल्या जीवनांत अहंभाव नसावा; सर्वांविषयीं प्रेम, सर्वांच्या हितार्थ सेवा करण्याची तत्परता, दुसऱ्याच्या अंगच्या गुणांची प्रशंसा करण्याइतकी मनाची उदारता, सत्याभिमान, प्रामाणिकपणा, आत्मसंयमन, ईश्वराचे ठायीं अढळ श्रद्धा, कर्मफलाविषयीं आसक्ति न ठेवतां स्वार्थत्याग करावा लागला तरी तो परोपकारार्थ करण्याची तयारी, हीं अध्यात्मिक जीवनाचीं अंगें आहेत. हीं अंगें आपल्या राजकारणांत दिसतील अशा प्रकारचें वर्तन ठेवणें याला मी राजकारणाला अध्यात्मिक किंवा धार्मिक स्वरूप देणें असें समजतों.

त० भा०——तर मग साधुत्व व उत्तम राजकारणपटुता यांच्यांत आपल्या दृष्टीनें कांहींच भेद नाहीं. पण पुष्कळ लोक या दोन गोष्टी परस्परांहून अगदीं भिन्न समजतात. परवाच 'ईस्ट अँड वेस्ट' मधील एका लेखकानें आपल्या अंगीं साधुता आहे, पण तिच्यावर राजकारणानें पगडा बसविलेला आहे असें म्हटलें आहे. तो लेख आपल्या पाहण्यांत आलाच असेल. त्यावर आपलें उत्तर काय आहे?

म०——साधुता हा शब्द प्रस्तुतच्या जीवनांतून आपण काढून टाकिला पाहिजे. कारण, तो शब्द इतका पवित्र आहे कीं तो कोणालाहि यथार्थ रीतीनें लावितां येईल असें मला वाटत नाहीं. मी एक क्षुद्र सत्यजिज्ञासु मनुष्य आहे. माझी

शक्ति किती मर्यादित आहे तें मी जाणतों. माझ्या हातून चुका घडतात. अशा मला 'साधु' किंवा 'महात्मा' हें नांव लोकांनीं दिलें म्हणजे खरोखर मला त्याची शरम वाटते. मी साधु किंवा महात्मा आहें हें मी कधीं खरें मानणार नाहीं. राजकारणरूपी सर्पाचें वेटाळें सगळ्या व्यवहाराभोंवतीं पडलेलें आहे. कितीही धडपड केली तरी आतां त्यांतून आपली सुटका होणें नाहीं. असें आहे त्या अर्थीं त्या सर्पाशीं शक्य तितकें झगडलें पाहिजे. म्हणून मी १८९४ सालापासून राजकारणांत पडलों, आणि तेव्हांपासून राजकारणांत धार्मिकता घुसडण्यानें काय फलप्राप्ति होईल याविषयींचे प्रयोग स्वतः-वर व मित्रमंडळीवर मी करीत आलों आहें. धार्मिकता या शब्दानें मी नुसत्या हिंदुधर्मासंबंधानें बोलत आहें असें समजूं नका. हिंदुधर्म तर मला अत्यंत मूल्यवान् वाटतोच. पण त्याच्याहि पलीकडे मनुष्यस्वभावांत परिवर्तन घडवून आणणारा, आणि त्याला त्याच्या अंतर्यामींच्या सत्याशीं बांधून त्याचें चारित्र्य शुद्ध करणारा असा एक धर्म आहे. मनुष्याच्या स्वभावांतलें तें एक शाश्वत अंग आहे. त्याचा विकास होण्याचे कामीं कितीहि परिश्रम किंवा कष्ट सोसावे लागले तरी ज्याच्या जोरावर त्यांची तो पर्वा करीत नाहीं; आणि स्वतःची ओळख जोंपर्यंत पटली नाहीं, आपल्या निर्मात्याला त्यानें जोंपर्यंत जाणिलें नाहीं, व आपण आणि आपला निर्माता यांच्या मधील व्यवहाराची खरी किंमत त्याला

कळली नाहीं, तोंपर्यंत ज्याबद्दल माणसाचा आत्मा तळमळत असतो, त्या धर्माविषयीं मी हें बोलत आहें. केवळ शाब्दिक ज्ञानानें कांहीं लाभ व्हावयाचा नाहीं. येथें प्रत्यक्ष क्रियाच झाली पाहिजे. अशा क्रियेनेंच माणसाला आत्मिक बळ प्राप्त होऊन तो शारीरिक शक्तीला जुमानीसा होतो, लढण्याचे कामीं त्याला उत्साह चढतो, आत्मविश्वास त्याच्या ठायीं उत्पन्न होतो, आणि दुःखाच्या निर्मूलनाचा उपाय आपल्याच हातांत आहे अशी खात्री वाटल्यामुळें तो दुसऱ्यावर सूड उगविण्याची बुद्धि सोडून देतो. अशाप्रकारचें जीवनस्वरूप राजकारणांत दिसूं लागणें म्हणजेच राजकारणाला धार्मिक किंवा अध्यात्मिक स्वरूप देणें होय. (बंगलोर येथें ना. गोखले यांच्या पुतळ्याच्या अनावरणसमारंभाच्या वेळचें भाषण व यं. इं. १२।५।२०)

---

## ४ धर्म हाच हिंदुस्थानच्या भवितव्यतेचा एक आधार.

त० भा०—हिंदुस्थानची स्थिति आज सर्वतोपरी हीन दीन झालेली आहे. प्लेग, दुष्काळ, महामारी, महापूर इ. कारणांनीं लक्षावधि लोक मरत आहेत. सरकारी अधिकारी लोकमताची पर्वा करीत नाहींत. लोकांना स्वार्थापलीकडे

धर्माच्या रक्षणाविषयीं जेवढा उत्साह बाळगतों तेवढ्याच उत्साहानें मुसलमान-धर्माच्या रक्षणासाठीं मला झटावेंसें वाटतें, व त्यांत मला फार आनंद वाटतो. कारण तसें करण्यानें मी धर्माचें रक्षण करण्याची पात्रता संपादीत आहें असें मला वाटतें. युरोपांतली पाशवी सत्ता (Brute Force) इस्लाम धर्मावर जेवढें संकट आणीत आहे, तेवढेंच हिंदुधर्मावरहि आणीत आहे. आज मुसलमानी धर्मावर प्रसंग बेतला आहे. उद्यां कदाचित् तो हिंदुधर्मावर येईल. हिंदुधर्माचा पायाच खणुन काढण्याचें काम पाश्चात्य सुधारणा करूं लागली आहे. पाश्चात्य सुधारणेची प्रवृत्ति सैतानी स्वरूपाची आहे. तिच्या मायाजालांत गुरफटले जाऊन आपण आपल्या मूळच्या विचारांचा पाया खणून काढला जाऊं देत आहों. हिंदुधर्मात जें अहिंसेचें तत्त्व आहे तें माझ्या मतें फार मूल्यवान् आहे. अहिंसातत्त्व पाळणारांच्या हातांतले शस्त्र हिंसा करणारांच्या हातांतल्या शस्त्राहून भारी असतें. हिंसा ही एक जंगली योजना आहे. तिच्यांत पशुता आहे. अहिंसा तत्त्व पाळणारांनाच खरी मर्दुमकी दाखवितां येते. हें तत्त्व पूर्णपणें पाळणाराला सगळे जग जिंकतां येईल. आज माझ्या या जर्जरित देहांत जी कांहीं शक्ति दिसत आहे तिचें कारण अहिंसातत्त्वाचें पालन हेंच आहे. हिंदु आपला धर्म ओळखून त्याप्रमाणें वागतील तर त्यांची छाप साऱ्या जगावर पडल्याशिवाय राहणार नाहीं. तुम्ही हिंदु आईबापांचीं लेकरें ज्या

दिवशीं आपलें धर्मविषयक कर्तव्य कराल त्या दिवसापासून तुम्ही अन्यायी दुर्जनाशीं सहकारिता करण्याचें सोडाल ही मला खात्री आहे.

त. भा.—पाश्चात्य सुधारणेनें हिंदु धर्माचा पाया ढासळण्यास लाविला आहे असें आपलें म्हणणें आहे. पण पुष्कळ हिंदु असें समजतात कीं इंग्रजी राज्य ( अर्थात् पाश्चात्य पद्धतीनें सुधारलेलें राज्य ) च हिंदुधर्माचें रक्षण करीत आहे. इंग्रजी राज्याचे हे उपकार काय थोडे आहेत?

म०—तुम्ही पुष्कळ हिंदूंचे म्हणून जे विचार आतां माझ्यापुढें मांडिले त्यांहून अधिक लज्जास्पद विचार दुसरे कांहीं असतील असें मला वाटत नाहीं. जर २३ कोट हिंदु ७ कोट मुसलमानांच्या हातून आपल्या धर्माचें रक्षण करूं शकत नसतील तर तो हिंदु-धर्मच खोटा असला पाहिजे, आणि अशा धर्माला मानणारे नामर्द किंवा अधर्मी असले पाहिजेत असें मी समजेन (नं. जी. २९।८।२०).

---

## ६ वर्णाश्रमधर्म व अस्पृश्य जाति.

त० भा०—चातुर्वर्ण्याच्या संबंधानें आपलें काय मत आहे?

म०—ही संस्था फार चांगली आहे. हिच्यापासून देशाचें पुष्कळ हित झालें आहे. म्हणून ही संस्था कायम राखली पाहिजे.

त० भा०——चातुर्वर्ण्याप्रमाणें सर्व हिंदूंचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ग होतात. यांपैकीं कोणत्या वर्गात आपण अस्पृश्य जातीच्या लोकांना घालतां?

म०——अस्पृश्य जाति या चारी वर्गांच्या बाहेर चातुर्वर्ण्यानें ठेविली आहे. पण वस्तुतः ती चातुर्वर्ण्यांतच आली पाहिजे.

त० भा०——पण चातुर्वर्ण्यांतल्या कोणत्या वर्गात?

म०——अस्पृश्यांचा जितका अधिकार असेल त्या मानानें समाज त्यांना योग्य वर्गात घालील. [डिसेंबर १९१६ मध्यें एका काशीकर महाराष्ट्रीयाच्या म. गांधींशीं झालेल्या मुलाखतीचा वृत्तांत.]

त० भा०——पण हिंदुधर्मी लोक भंगी, महार इत्यादिकांना अस्पृश्य समजतात तें कशाच्या आधारावर?

म०——तसें समजण्याला हिंदुधर्मशास्त्रांत कांहीं आधार नाहीं. हिंदुधर्माच्या सभोंवतीं रूढीचीं कित्येक पुटें बसलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं रूढी चांगल्या असल्या तरी कांहीं अगदीं निंद्य आहेत. अस्पृश्यतेची रूढी मी सर्वथैव निंद्य समजतों. तिच्या योगानें धर्माच्या नांवाखालीं आज आज दोन हजार वर्षांच्या पापांची रास हिंदुधर्माच्या माथीं चढली आहे, व अजूनहि चढत आहे. या रूढीला मी पाखंड समजतों. या रूढीच्या समर्थनार्थ स्मृतिग्रंथांतून आधार शोधण्यांत अर्थ नाहीं. कारण, स्मृतिग्रंथांतून पुष्कळ श्लोक क्षेपक आहेत.

पुष्कळ श्लोकांना अर्थच राहिला नाहीं. शिवाय, या स्मृति-ग्रंथांतल्या एकूणएक आज्ञा पाळणारा असा एकहि हिंदु माझ्या पाहण्यांत नाहीं. तसा तो वागेल तर आजच्या काळांत तोच भ्रष्ट समजला जाईल. शास्त्रग्रंथांतल्या वचनाचें समर्थन करून दाखविण्यानें सनातन धर्माचें रक्षण व्हावयाचें नाहीं. त्या शास्त्रांत सांगितलेल्या त्रिकालाबाधित तत्त्वांचें आचरण करण्यानेंच तें होईल. जुन्या मताचे कित्येक शास्त्रीलोकसुद्धां अस्पृश्यत्वाला शास्त्रांत आधार नाहीं ही गोष्ट कबूल करतात, पण रूढीपुढें त्यांना हात टेकावे लागतात.

त० भा०—तर मग हिंदुधर्माला निष्कारण लागलेला अस्पृश्यत्वाचा कलंक कां काढून टाकूं नये?

म०—काढूं नये असें कोण म्हणतो? जरूर काढावा. त्या कामीं देह खर्ची पडला तरी बेहेत्तर आहे असें मानणारे तुमच्यासारखे तरुण लोक पुढें यावयास पाहिजेत. हा कलंक दूर झाल्याशिवाय आपल्या देशाची उन्नति कधीं व्हावयाची नाहीं असें माझें ठाम मत झालें आहे. (१९१७ च्या अंत्यज-परिषदे मधील भाषणावरच्या ‘ गुजराथी ’ पत्रांतल्या टीकेस उत्तर. )

## ८ स्त्रिया अबला कीं सबला ?

त० भा०—स्त्रियांना आपल्या समाजानें हलकें समजून त्यांना पुरुषांच्या खालची पायरी दिली आहे या विषयीं आपलें काय म्हणणें आहे ?

म०—माझ्या दृष्टीनें समाजाचें हें मोठें अज्ञान आहे. स्त्रियांना अबला म्हणतात; पण ही चूक आहे. शरीरबळांत त्या पुरुषापेक्षां कदाचित् कमी असतील. पण त्यांच्या आत्म्याला हें विशेषण मुळींच लावतां यावयाचें नाहीं. जिचा आत्मा तेजस्वी आहे, स्वतःचें आत्मतेज जिला कळून चुकलें आहे, अशी एखादी मुलगीसुद्धां सहाफूट उंचीच्या व धिप्पाड बांध्याच्या उद्धट पुरुषापुढें उभी राहून त्याचा नक्षा उतरूं शकते. जिला आपल्या आत्म्याचें बळ कळूं लागलें आहे अशा स्त्रीच्या स्त्रीत्वाची शोभा तिच्या आत्मबळानें वाढते. सीता-द्रौपदीसारख्या स्त्रियांनीं प्रबळ दुष्टांवर आपला प्रभाव पाडल्याचीं उदाहरणें आपल्या पुराणग्रंथांतून आढळतात. जसें हत्तीचें शारीरिक बळ माणसाच्या बुद्धिबळापुढें चालत नाहीं, त्याप्रमाणें स्त्रियांच्या आत्मबळापुढें पुरुषांच्या शरीरबळाचें व बुद्धिबळाचें चालत नाहीं. ज्या स्त्रीजातीनें हनुमानासारख्या महावीरांना जन्म दिला, त्यांना अबला कसें म्हणतां येईल, तुम्हीच सांगा ?

त० भा०—पण स्त्रियांच्या ठायीं इतकें आत्मबळ असून त्यांचा उपयोग लोक देशकार्याकडे कां करून घेत नाहींत?

म०—येथेंहि आमचें अज्ञानच आम्हांस नडतें. स्त्रियांच्या आत्म्याचा विकास होईल अशीं साधनें आम्हींच त्यांना दिलीं नाहींत यांत त्यांच्याकडे काय दोष आहे? पुरुषांनीं तीं साधनें त्यांना देऊन त्यांच्याकडून देशसेवा करवून घ्याव-यास पाहिजे. तें न करतां शरीरबळावर सगळी भिस्त ठेवून आपण बसतों आणि भ्रमांत पडून मनाची अशी समजूत करून घेतों कीं आपण दुर्बळ प्रजा! आपल्या हातून काय पराक्रम होणार? अशा दुर्बळतेच्या विचारामुळें हिंदुस्थानचे पुरुष सुद्धां अबला बनले आहेत! मग स्त्रियांना ते अबला समजतात व त्यांना हलके लेखतात यांत आश्चर्य काय? ते आपलें व स्त्रियांचें आत्मबळ ओळखून स्वाभिमान जागृत ठेवतील तर जनरल डायरसारखे लोक येथें दिसणारच नाहींत.

त० भा०—पण हें आत्मबळ कसें ओळखावें?

म०—त्याला विशेष खटपट किंवा शिक्षण लागत नाहीं. परमेश्वरावर पूर्ण निष्ठा ठेवून आपण कोणाच्याहि शरीर-बळाला भिऊं नये. शरीरबळ फार तर शरीराचा नाश कर-ण्यास समर्थ असतें. त्या शरीरनाशाचें भय आपण बाळगलें नाहीं म्हणजे आपण प्रत्यक्ष सिंह बनतों हें ध्यानांत ठेवावें. इतकें बळ राक्षसाच्या शरीरांत सुद्धां आढळावयाचें नाहीं. तें मनाची दृढता, आत्मज्ञान, व मृत्यूविषयींची बेपर्वा यांतच आढळावयाचें (न जी. १८।७।२०)

———

## ७ स्त्रिया आणि देवदर्शन.

त० भा०—पुरुषांपेक्षां स्त्रिया अधिक अज्ञान आणि भाविक असतात हें मत आपणांस कबूल आहे काय?

म०—स्त्रिया पुरुषांपेक्षां अधिक भाविक असतात असें मलाहि वाटतें. पण त्या अधिक अज्ञान असतात कीं काय याचें उत्तर तुम्ही ज्ञान कशाला म्हणतां त्यावर अवलंबून आहे. लिहायलावाचायला येणें म्हणजे ज्ञान नव्हे, व खरें शिक्षण नव्हे. लिहिणेंवाचणें हीं ज्ञान मिळविण्याचीं व मिळविलेलें ज्ञान दुसऱ्यास देण्याचीं साधनें आहेत इतकेंच. पण ज्ञान मिळविण्याचें मुख्य साधन म्हणजे अनुभव व विचारशक्ति. हीं स्त्रियांचे ठायीं पुरुषांपेक्षां कमी आहेत असें माझा अनुभव मला सांगत नाहीं. मीं पुष्कळ स्त्रिया अशा पाहिल्या आहेत कीं त्या अगदीं निरक्षर असून त्यांची विचारशक्ति विलक्षण तीव्र, मन अत्यंत उदार, आणि स्वभाव फार करारी असे, दक्षिणआफ्रिकेंतल्या निःशस्त्र प्रतिकाराचे वेळीं मला या गोष्टीचा अनुभव अनेक वेळां आलेला आहे. स्त्रियांची चिकाटी खरोखर प्रशंसनीय असते. एकदां एखादें व्रत त्यांनीं धरलें म्हणजे तें त्या हटकून पुरें करावयाच्या, देहाला कष्ट होतील म्हणून तें अर्धवट टाकावयाच्या नाहींत. सकाळीं संध्याकाळीं देवदर्शनाला जाण्याचा पुष्कळ स्त्रियांचा नियम असतो. म्हाताऱ्याकोताऱ्या बाया-

सुद्धां हा नियम इतक्या कडक रीतीनें पाळतांना आढळतात कीं तें पाहून कोणालाहि नवल वाटेल.

**त० भा०**—देवदर्शनाविषयींची गोष्ट आपण आतां बोललांत त्यावरून मला एक प्रश्न सुचला आहे. स्त्रिया एखाद्या सार्वजनिक मंदिरांत देवदर्शनासाठीं जातात यांत त्यांचा काय हेतु असतो? घरोघर देव आहेतच. मग त्याच्या दर्शनासाठीं सार्वजनिक मंदिरांत कशाला जावयाला पाहिजे?

**म०**—देवदर्शनासारख्या गोष्टीसंबंधानें अशा तऱ्हेचे प्रश्न विचारून चर्चा करणें हें माझ्या मतें निष्कारण काथ्याकूट करण्यासारखें आहे. नारळाच्या आंतलें खोबरें टाकून त्याच्या बाह्यस्वरूपाविषयींच वाद घालीत बसण्यासारखें वेडेपणाचें आहे. धर्माविषयींची माणसाची आस्था वाढण्याला देवदर्शन हें एक उत्कृष्ट साधन आहे या दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहिलें म्हणजे त्याचें महत्त्व तुम्हांला कळून येईल. देवदर्शनासाठीं बाहेर जाण्यांतच धर्म साठविला गेला आहे असें विचारी स्त्रिया काय किंवा पुरुष काय मानीत नाहीत. आत्मज्ञानाचें एक साधन याच दृष्टीनें ते देवदर्शनाला महत्त्व देतात. (न. जी. ३।१०।२०)

# ९ स्त्रिया आणि देशकार्य.

त० भा०–घरकोंबड्या स्त्रियांना देशकार्य काय करता येणार आहे? अशी पुष्कळांची समजूत आहे. याविषयीं आपलें काय मत आहे? ही समजुत आपण खरी समजतां काय? त्यांनीं देशकार्यांत पुरुषांना मदत कशी करावी?

म०–हाच प्रश्न मला बोलपूरच्या शांतिनिकेतनांतल्या कांहीं स्त्रियांनीं विचारला होता, व आणखीहि पुष्कळ लोक विचारतात. या प्रश्नाला मी असें उत्तर देतों कीं जोंपर्यंत स्त्रियांची पूर्ण मदत पुरुषांना मिळणार नाहीं, तोंपर्यंत स्वराज्य-प्राप्तीची आशा करणें व्यर्थ आहे. कर्तव्यपालन स्त्रियांच्या हातून हल्लीं होत नाहीं. लोकांच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणें व तें स्वातंत्र्य नष्ट झालें असल्यास पुनः मिळविणें हा आपला धर्म आहे हें स्त्रिया न समजतील किंवा न कबूल करतील तर लोकांचें रक्षणच होणार नाहीं. स्त्रियांनीं मनावर घेतल्यास देशासाठीं त्यांना काय करतां येणार नाहीं? लोकांचीं जुलुमांतून सुटका करणें हें आपलें एक अवश्य कर्तव्य आहे असें स्त्रिया जाणतील, तर पुरुषांना हवी तेवढी स्फूर्ति देऊन त्यांच्या अंगचें शौर्य वाढविणें, ईर्ष्येला चढविणें, भेकडपणा सोडून स्वाभिमान जागृत करणें वगैरे गोष्टी त्यांना सहज करतां येतील. पूर्वींच्या काळच्या स्त्रिया आपलें हें कर्तव्य जाणीत असत. या गोष्टीला रामायण–महाभारतादि ग्रंथांतून

व पुराणांतून पुष्कळ आधार आहेत. सीतादेवी रामचंद्राबरोबर वनवासांत गेली. तिला रामचंद्राच्या प्रवृत्तींची एकूण एक गोष्ट चांगल्या प्रकारें ठाऊक होती. द्रौपदी पांडवांच्या बरोबर कष्ट सोसण्यास निघाली. तेव्हां त्यांना तिचा किती तरी उपयोग झाला! तिची अब्रू लुटली जाण्याचा प्रसंग आला तेव्हां आत्मबळानें स्त्रियांना स्वतःचें रक्षण करतां येतें हें तिनें साऱ्या जगाच्या पुढें सिद्ध करून दाखविलें. दमयंतीनें नळाच्या दुष्ट व हानिकारक प्रवृत्तीवर अंकुश ठेविला, आणि त्याच्या दुर्बळतेच्या वेळीं त्याचें रक्षण केलें. आज मात्र उलट स्थिति झालेली दिसत आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. स्त्रियांच्या कामांत पुरुष पडत नाहींत व पुरुषांच्या कामांत स्त्रिया पडत नाहींत. त्यामुळें परिणाम असा झाला आहे कीं स्त्रियांविषयीं पुरुषांचा निष्कारण गैरसमज झाला आहे, आणि स्त्रियांची पुरुषांविषयींची आस्था अजून अढळ आहे, त्यामुळें पुरुषांना हवें तसें वागण्यास एक प्रकारचें स्वातंत्र्य मिळालें आहे. अर्थात् स्त्रीपुरुषांमध्यें सहकार्य न घडून कुटुंबाची, समाजाची, व एकंदर देशाची हानि होत आली आहे.

त० भा०—ही स्थिति सुधारण्यास कांहीं उपाय नाहीं काय?

म०—कां नाहीं? आहे. पण तो करतो कोण? पहिली गोष्ट करावयाला पाहिजे ती ही कीं स्त्रियांनीं स्वतंत्रतेच महामंत्र समजून घेऊन तो आपला धर्म आहे असें मानिलें

पाहिजे; आणि ज्यांनीं तो मंत्र समजून घेतला असेल त्यांनीं तो आपल्या बाहेणींना समजावून दिला पाहिजे. स्त्रियांत जागृति करण्याचें काम स्त्रियांनाच करतां येणें शक्य आहे. या कामीं पुरुषांची शक्ति फार मर्यादित आहे. दुसरी गोष्ट मुलांच्या शरीराचें पोषण करणें हें जसें स्त्रियांचें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें त्यांच्या मनांत स्वातंत्र्यप्रियता, निर्भयता, स्वाभिमान, देशप्रीति, करारीपणा इ० गुणांचें बीजारोपण करून त्या गुणांचें संवर्धन करणें हेंहि त्यांचें काम आहे ही गोष्ट स्त्रियांनीं समजली पाहिजे. उदरनिर्वाह कसा होईल ही काळजी मुलांच्या मनांत उत्पन्नच न झाली पाहिजे. काम करणाराला निर्वाहाची काळजी करायला नको हें तत्त्व मुलांच्या मनांत पुरतेपणीं ठसलें पाहिजे. पण सर्वांत महत्त्वाचें व नेहमीं चालूं ठेविलें पाहिजे असें कार्य म्हणजे स्वदेशी-व्रत हें होय. आपल्या लोकांची उपासमार दारिद्र्यामुळें होत आहे. आपणास लागणारें कापड स्वतःला विणण्याची शक्ति असून आपण बाहेरून आणतों. यामुळें आपलें रक्त ( पैसा ) दरसाल मोठ्या प्रमाणांत कमी होत चाललें आहे. ही घातकी प्रवृत्ति स्त्रियांनीं साहस केल्यावांचून जाणार नाहीं. आपल्या देशांत कातण्याचें व कापड विणण्याचें काम स्त्रिया अनादिकाळापासून करीत आल्या याला प्रमाणें आहेत. तें काम त्यांनीं सोडलें, आणि तेव्हांपासून हिंदुस्थानच्या संपत्तीला ओहोट लागून अधोगतीला सुरुवात

झाली. हिंदुस्थानची आर्थिक स्वतंत्रता सुताच्या ताण्यावर अवलंबून आहे असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. जर आपणाला लागणारें बहुतेक सूत आपले लोक आपल्या झोपडींत बसून काढतील व त्याचें कापड विणून तें वापरतील तर हिंदुस्थानाला इतकें बळ प्राप्त होईल कीं त्याच्या योगानें त्यांना स्वतंत्रता व न्याय हीं प्राप्त करून घेतां येतील (न. जी. ३।१०।२०)

## १० पतिव्रता स्त्रिया व एकपत्नीव्रत पुरुष.

**त० भा०**—पुनर्विवाह केलेल्या स्त्रियांचा दर्जा समाजांत हलका समजण्यांत येतो व पतिव्रता स्त्रियांविषयीं हिंदुसमाजाकडून विशेष आदर दाखविण्यांत येतो याविषयीं आपलें काय म्हणणें आहे?

**म०**—वैधव्य ही हिंदुधर्माची शोभा आहे. अखंड पातिव्रत्याचा अर्थच हा कीं ज्याला एकदा पति म्हणून विधिपूर्वक व जाणूनबूजून मानिलें त्याच्या मरणोत्तर त्याचें स्मरण राखण्यांतच संतोष मानावा व आनंद समजावा. आणि अशाच रीतीनें आचरण करून हजारों पतिव्रता विधवा हिंदुस्थानांत प्रातःस्मरण करण्यास पात्र झाल्या आहे. वैधव्यदशेंत पातिव्रत्य निष्कलंक राखणें ही गोष्ट सोपी नाहीं.

ती एकप्रकारची तपश्चर्या आहे. ती करणाऱ्या स्त्रीचा अधिकार मोठा व तिची पदवी थोर समाजानें समजावी यांत आश्चर्य नाहीं (न. जी. १६।६।२०)

त० भा०—पण हा एकतर्फी विचार झाला असें आपणांस नाहीं वाटत? पातिव्रत्य हें स्त्रियांचें जर भूषण आहे तर पुरुषालाहि एकपत्नीव्रतानें राहावयाला समाजानें लावावयास नको काय?

म०—'एकपत्नीव्रतानें राहणारे पुरुष' या शब्दानें विधुर असून अन्यस्त्रीचें करग्रहण करण्याचा विचारसुद्धां मनांत न आणणारे पुरुष असा तुमचा उद्दिष्ट अर्थ असेल असें वाटतें. पण असे पुरुष किती विरळा दृष्टीस पडतात! स्त्रियांत मात्र पतिव्रता स्त्रियांची संख्या मोठी दिसते. म्हणून त्या पूजेला पात्र गणिल्या गेल्या आहेत. अनुकरणासारखी दुसरी पूजा कोणती आहे? आणि जेथें अनुकरण करण्याची इच्छा नाहीं, तेथें नुसत्या शाब्दिक पूजेला घेऊन काय करावयाचें आहे! आज पांच वर्षें मी हिंदुस्थानभर हिंडून हिंदुस्थानच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत चांगला अनुभव मिळविला आहे. त्यांत सामान्यतः मला असें आढळून आलें आहे कीं चांगले चारित्र्यवान् पुरुष, पत्नीवर मनापासून प्रेम करणारे असतां, तरुणवयांत पत्नीचा वियोग झाल्याबरोबर लागलीच दुसऱ्या लग्नाची तयारी करतांना आढळतात. हा प्रकार मी जेव्हां पाहतों तेव्हां माझ्या मनाला अत्यंत दुःख

होतें. आपण रूढीचे इतके गुलाम बनलों आहों ही गोष्ट आपणाला किती कमीपणा आणणारी आहे! आईनें आपल्या तरुण पण विधुर झालेल्या मुलाला पुनः लग्न करण्याचा आग्रह करावा, किंवा सासूनें आपल्या विधुरावस्थेंतल्या जांवयाला द्वितीय शरीरसंबंध करण्याचे कामीं उत्तेजन द्यावें हें स्वाभाविक आहे; पण मुलानें किंवा जांवयानें त्यांच्या आग्रहाची सबब पुढें करून पुनः विवाह करण्यास तयार व्हावें यासारखी लज्जास्पद गोष्ट दुसरी कोणती असेल? पहिल्या स्त्रीच्या संबंधानें शोक करण्यांत मग कोणता अर्थ राहिला? आणि पहिल्या स्त्रीविषयीं विरह-गीतें रचणें किंवा अन्यरूपानें स्मारक करणें यांची काय किंमत समजावयाची? अशा जीवनाला विचारयुक्त म्हणतां येईल काय? जोंपर्यंत पुरुषांमध्यें असा प्रकार बिनधोक चाललेला दृष्टीस पडेल तोंपर्यंत स्त्रियांच्या वैधव्याचे पोवाडेच मी गात राहीन. पुरुषांच्या स्वार्थपरायणतेची आत्यंतिक सीमा येथें दिसते. या बाबतींत आमच्यापेक्षां इंग्रज बरे असें म्हटलें पाहिजे.

त० भा०—तें कसें? तिकडे विधुर पुरुष पुनः लग्न करीत नाहींत काय?

म०—करतात; पण पहिल्या स्त्रीच्या स्मशानयात्रेच्या प्रसंगीं स्मशानांतच पुरुषाच्या द्वितीय लग्नाविषयींचे विचार चालत नाहींत. तेथें विधवांना पुनर्विवाह करण्याची स्वतंत्रता आहे. पण कोणीहि खानदानीची स्त्री पतिमरणानंतर

एका वर्षाच्या आंत अन्य पति वरण्याइतकी निर्लज्जता दाखवीत नाहीं. पण इंग्रजी स्त्रियांच्या इतकाहि विचार आमच्यांतले सुशिक्षित म्हणविणारे पुरुष पुष्कळ वेळां दाखवीत नाहींत. विधवापुनर्विवाहाच्या बाबतींत आमच्याइतकी स्वार्थांधता तिकडच्या पुरुषांच्या ठायीं दिसत नाहीं. कित्येक सुधारक विधवांच्या पुनर्विवाहाविषयीं अनुकूलता दाखवून आपली स्वतःची वर सांगितलेली लज्जाजनक स्थिति झाकण्याचा यत्न करीत असतात. जर विधवांची तुम्हांला खरी दया येत असेल तर तुम्हीं पुरुषांनीं स्वतः एकपत्नीव्रत पाळण्यास तयार झालें पाहिजे. या संबधांत लोकमत इतकें नेभळें झालेलें आहे कीं चांगल्या कुळशीळाच्या शिकलेल्या पुरुषांनाहि विधुरावस्था प्राप्त होतांच सत्वर पुनः लग्न करण्यास लज्जा वाटत नाहीं.

त० सा०—आपण म्हणतां तशी शोचनीय स्थिति समाजांत दिसते खरी. पण त्याला इलाज काय?

म०—त्याचा इलाज स्त्रियांच्या हातीं आहे. पुरुष आपलें कर्तव्य करोत किंवा न करोत; पण स्त्रियांनीं आपला हक्क कां बजावूं नये? स्त्रियांना मताधिकार जरूर मिळाला पाहिजे. पण जिला आपला सामान्य हक्क समजत नाहीं, किंवा समजत असला तरी तो मिळविण्याचें सामर्थ्य जिच्या ठायीं नाहीं, तिला मताधिकार मिळाला तरी त्यापासून कोणता लाभ होणार आहे! स्त्रिया मताधिकार भला मिळवोत

आणि कायदेकौंसिलांत जाऊन बसोत. पण त्यांचें पहिलें कर्तव्य म्हणजे जाणूनबुजून म्हणा किंवा अज्ञानतः म्हणा, पुरुषांकडून घडणाऱ्या अत्याचारापासून स्वतःचें संरक्षण करून हिंदुस्थानाला शोभा आणणें व त्याला वीर्यवान् करणें हें आहे. जेव्हां अज्ञानी माता आपल्या अजाण कन्येची पुरुषाच्या विषयाग्नींत आहुति देण्यास तयार होते, तेव्हांच असे पाषाणहृदयी पुरुष पहिल्या पत्नीबद्दलचे शोकाश्रु वाळण्याच्या पूर्वींच द्वितीय संबंध करण्याचा विचार करूं लागतात. माझें तर असें मत आहे कीं या बाबतींत सुधारणा करणें हा स्त्रियांचा हक्क आहे; इतकेंच नाहीं, तर स्वतःसंबंधानें, पुरुषसंबंधानें व देशासंबंधानें त्यांचें तें कर्तव्य आहे. (न. जी. १८।८।२०)

## ११ जातिभेद.

त० भा०---जातिभेदाविषयीं आपलें काय मत आहे? याच्यामुळें हिंदुस्थानांत एकी होणें अशक्य आहे असें पुष्कळ लोक म्हणतात. त्या म्हणण्यांत कितीसें तथ्य आहे असें आपणांस वाटतें?

म०---जातिभेद ही संस्था अपायकारक आहे असें म्हणणारांपैकीं मी नाहीं. मूळांत तर ही संस्था फार उत्तम होती व तिनें देशाचें कल्याणहि केलें. जातीजातींत रोटी-

व्यवहार व बेटीव्यवहार सुरु होणें हें राष्ट्राच्या मजबुतीला व उन्नतीला अवश्य आहे अशी कित्येकांची कल्पना आहे. ही कल्पना अर्थात् पाश्चिमेकडून आलेली आहे. ज्याप्रमाणें आरोग्याला दुसऱ्या गोष्टी अवश्यक आहेत, तशीच खाणें ही एक गोष्ट आहे. रोटीव्यवहाराला नसतें महत्त्व पुष्कळांनीं दिलें आहे तसें दिलें नसतें, तर आरोग्यविषयक इतर गोष्टीं प्रमाणें ही गोष्टहि लोकांनीं मुकाट्यानें एकांतांत बसून केली असती. हिंदूंची उच्चतम संस्कृति याच दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहते. म्हणून शेकडों हिंदु अजून दुसऱ्याच्या देखत जेवायला बसत नाहींत. एकांतात बसून जेवणारे पण दुसऱ्यांचा द्वेष न करतां त्यांच्याशीं मित्रता ठेवणारे शेकडो स्त्रीपुरुष मला माहित आहेत. बेटीव्यवहाराचा प्रश्न याहून ज्यास्त कठीण आहे. जर परस्परांशीं लग्न करण्याचा विचार स्वप्नांतसुद्धां न आणितां भाऊबहिणींना मित्रत्वानें एकत्र राहतां येतें, तर हिंदु मुलीला मुसलमान किंवा मुसलमान मुलीला हिंदु भावासारखा मानण्यांत कोणती अडचण प्राप्त होते तें मला कळत नाहीं. जगांतले सारे हिंदु, मुसलमान, खिस्ती वगैरे लोक माझे मित्र आहेत. मी मुसलमानांच्या व खिस्त्यांच्या घरीं फलाहारापलीकडे कांहीं खाल्लेलें नाहीं. प्रत्यक्ष मुलाला आपल्या ताटांत जेवायला घेणें किंवा त्याच्या उष्ट्या पेल्यानें पाणी पिणें मला आवडत नाहीं. पण त्यामुळें जर मुलावरच्या माझ्या प्रेमांत यत्किंचित्हि कमतरता आलेली नाहीं, तर ती

मुसलमान व खिस्ती यांच्याशीं मी रोटीव्यवहार करण्याचें नाकारल्यानें तरी कां यावी? बरें; जेथें रोटीव्यवहार व बेटीव्यवहार यांना कांहींच निर्बंध नाहीं, तेथें तरी सर्वत्र मैत्रीभाव नांदत असलेला दिसतो काय? कौरव व पांडव भाऊभाऊ असतां त्यांच्यांत एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्याइतकें सूत होतें! इंग्रज लोक व जर्मन यांच्यांतला द्वेषभाव अजून कोठें अस्तंगत झाला आहे? सारांश, रोटीव्यवहार व बेटीव्यवहार या गोष्टी मैत्री व एकी होण्याला अवश्यकच आहेत असें नाहीं. या गोष्टीवांचून एकी घडणें अशक्य आहे असें आग्रहानें प्रतिपादल्याचा परिणाम येवढाच होणार आहे कीं जी गोष्ट आजपर्यंत सुरळीतपणें घडत आली तिच्यामध्यें या कल्पनेनें अंतराय मात्र येईल, आणि तो कदाचित् कायमचा होऊन बसेल. हिंदुमुसलमानांमध्यें उद्यां बेटीव्यवहार सुरू झाला तर त्याच्या योगानें दोघांनाहि आपापल्या धर्माप्रमाणें आचरण ठेवणें अशक्य होऊन बसेल. ज्यानें त्यानें आपापला धर्म पाळून परस्परांविषयीं अंतःकरण शुद्ध ठेवणें यांतच जातजातींतल्या एकीचें खरें भूषण आहे असें मला वाटतें, (यं. इं. २५।२।२०)

# १२ विधवांचे शाप.

तं० भा०—सर्व हिंदुस्थांनात मिळून १५ वर्षांच्या आंतील बालविधवांची संख्या एकंदर ३॥ लक्ष आहे, आणि त्यांतल्या १७००० विधवा तर ५ वर्षांच्या आंतिल वयाच्या आहेत. असें नुकतेंच कोठेंसें माझ्या वाचण्यांत आलें आहे हे आंकडे भयंकर—अंतःकरणाला द्रव आणणारे—आहेत असें आपणांस वाटत नाहीं काय? इतक्या मुलींचा जन्म वृथा घालविण्यापेक्षां त्यांना पुनः लग्न करण्याची परवानगी समाजानें दिली, तर इतक्या प्राण्यांना सुखी केल्याचें श्रेय समाजाला मिळणार आहे. तें त्यानें कां मिळवूं नये? विधवा-विवाहाविषयीं आपलें काय मत आहे?

म०—तुम्हीं आतां सांगितलेले आंकडे हृदयाला पाझर फोडणारे आहेत यांत बिलकुल शंका नाहीं. ही अत्यंत शोचनीय स्थिति दूर करण्याला विधवाविवाहाचा प्रचार हाच एक उपाय आहे असें उतावळे सुधारक म्हणतात तें म्हणणें मात्र मला पटत नाहीं. मी एक कुटुंबी आहें. माझ्या घरांत पुष्कळ विधवा बाया आहेत. पण त्यांना तुम्ही पुनः विवाह करा असें सांगण्यास माझी जीभ चालत नाहीं. पुनः लग्न करण्याचा विचारसुद्धां त्यांच्या डोक्यांत कधीं येत नाहीं. अशा गोष्टीला योग्य उपाय म्हणजे पुरुषांनीं पुनः विवाह न करण्याची प्रतिज्ञा करावी हाच मला दिसतो. याशिवाय

दुसरेहि कित्येक उपाय आहेत; पण आपण ते करीत नाहीं. उदाहरणार्थ—१ बालपणीं विवाह करण्याची चाल बंद करावयाला हवी. २ प्रौढ—विवाह सुरू करावे. ३ जी स्त्री पतीशीं समागम होण्यापूर्वींच विधवा झाली असेल तिला पुनः लग्न करण्याची मोकळीक द्यावयाला पाहिजे. इतकेंच नाहीं, तर तिला तसें करण्याला उत्तेजनहि दिलें पाहिजे. अशा स्त्रियांना माझ्या मतें विधवा म्हणतांच येत नाहीं. अशा स्त्रियांना समाजानें विधवा समजूंच नये म्हणजे झालें. ४ ज्यांना वयाच्या पंधराव्या वर्षाच्या आंत वैधव्य प्राप्त झालें असेल अशा तरुण विधवांनाच पुनर्विवाह करण्याची मोकळीक द्यावी. ५ विधवांचा अपशकुन मानण्यांत येतो त्याबद्दल उलट त्यांना पवित्र मानण्यांत यावें व त्यांचा आदर राखण्यांत यावा. ६ विधवांना उत्तम प्रतीचें शिक्षण व कांहीं उद्योग-धंद्याचें शिक्षण देण्याची तजवीज करण्यांत यावी. इतक्या तजविजी केल्या तर समाज विधवांच्या शापांतून मुक्त होईल यांत शंका नाहीं. या सुधारणा हव्या त्या समाजाला स्वतः च्या कल्याणासाठीं अंमलांत आणतां येण्यासारख्या आहेत. अमका सुधारणा करून दाखवील, मग आपण त्याच्या मागून जाऊं असें म्हणून जो तो दुसऱ्याकडे डोळे लावून स्वतः स्वस्थ बसतो, त्यामुळेंच सुधारणा व्हावयाचें काम अटकून राहतें. ज्याला ज्या वेळीं जें कृत्य पुण्यकृत्य वाटेल त्यानें तें त्याच वेळीं करून टाकावें असा ईश्वरी नियम आहे. पाप-

कर्म करण्याचे वेळीं मनाशीं विचार करावा, नफानुकसानी-कडे पहावें, दुसऱ्याची सल्लामसलत घ्यावी, आणि अखेर त्या कर्मापासून परावृत्त व्हावें. पण पुण्यकृत्याचे वेळीं व्यर्थ कालक्षेप करणें म्हणजे ईश्वराचा अपराध करण्यासारखें आहे. असें असून आपलें वर्तन पाहावें तर याच्या अगदीं उलट असतें! लोक पापकर्म करण्याला भीत नाहींत; पण पुण्यकर्म करायला मात्र परिषदेच्या ठरावाची वाट पाहत बसतात! हें आश्चर्य आहे. (न. जी. १।६।२०)

## १२ ब्रह्मचर्य.

त० भा०—महात्माजी! ब्रह्मचर्यासंबंधानें आपल्या विचा-रांवर कित्येक वर्तमानपत्रांतून कडक टीका आलेली आहे, आणि आपण आपलें असहकारितेचें वेड राजकारणांत घुस-डून जशी देशाची धूळधाण करण्याचें मांडिलें आहे, तसें तें कौटुंबिक बाबतींत ही घुसडून समाजाची प्रगति कुंठित कर-ण्याचा आपला प्रयत्न आहे असें टीकाकार म्हणत आहेत. ब्रह्मचर्यासंबंधानें आपले असे विचार विचार तरी काय आहेत?

म०—ज्यांना कर्मेंद्रियांचें केव्हांहि संयमन करणें म्हणजे व्यक्तिविषयक स्वातंत्र्यावर घाला घालण्यासारखें वाटतें त्यांना माझे विचार न रुचणें स्वाभाविक आहे. माझ्या मतें असें संयमन करून त्या इंद्रियांना आपल्या हुकमतीखालीं ठेवणें

हें पूर्ण ब्रह्मचर्य होय. आपले पूर्वज ऋषि असें ब्रह्मचर्य पाळीत म्हणून त्यांचे ठिकाणीं अपूर्व तेजस्विता असे. दीर्घायुष्य, उत्तम शरीरसंपत्ति, तीव्र बुद्धि, मनाची एकाग्रता करण्याचें सामर्थ्य, धीरोदात्तता इ० गुणांबद्दल आपल्या पूर्वजांची जी कीर्ति आज हजारों वर्षें साऱ्या जगांत दुमदुमून राहिली आहे तिचें खरें रहस्य या ब्रह्मचर्यांत आहे. पण आपलें तें ध्येय सुटलें, आणि आपण इंद्रियलोलुप होऊन बसलों, त्याचा परिणाम काय झाला तो दिसतच आहे. रोगराई, दुष्काळ व दारिद्र्य यांची रेलचेल झाली आहे; आपण शरीरानें व मनानेंहि दुबळे झालों आहों; लाथ मारूं तेथें पाणी काढूं अशी धमक एकाऱ्याहि अंगीं दिसत नाहीं; लोक अल्पायु झाले आहेत; तरुण स्त्रीपुरुषांच्या तोंडांवर तेज राहिलें नाहीं; अर्भकांची मृत्युसंख्या भयंकर प्रमाणांत वाढली आहे; लक्षावधि लोक अन्नावांचून तडफडत आहेत; गुलामगिरीचा रूळ सर्वांच्या डोक्यांवरून फिरत आहे; सारांश, आर्थिक, शारीरिक, मानसिक, वगैरे सर्वच क्षेत्रांत आपली अधोगति झालेली आहे. हा कशाचा परिणाम ? आत्मसंयमन नसल्याचा. व्यक्ति-स्वातंत्र्याचा विपरीत अर्थ आपण करीत आहों, आणि त्या चुकीच्या समजुतीवर वर्तन ठेवूं लागल्यामुळें आपण अधोगतीकडे झपाट्यानें चाललों आहों. ही अधोगति थांबवावयाची असेल तर आपण इंद्रियांचें संयमन केलें पाहिजे. ब्रह्मचर्य कडक रीतीनें पाळिलें पाहिजे

तरच प्रजोत्पत्तीचें प्रमाण कमी होऊन हिंदुस्थानच्या वाढत्या लोकसंख्येला व वाढत्या दारिद्र्याला कांहीं आळा बसेल. आपणांस पोसतां येत नाहीं इतकी लोकसंख्या वाढणें हें देशाच्या अवनतीचें खास लक्षण आहे. प्रजा थोडी असली तर चालेल, पण ती घट्टीकट्टी, हिंमतवान्, तेजस्वी पाहिजे. ही स्थिति हिंदुस्थानानें प्राप्त करून घेणें अवश्य आहे व त्याला उत्तम उपाय म्हणजे पाण्याचे पितर अशी प्रजा न निर्माण करणें, अर्थात् शुद्ध व आत्मसंयमनाचा आयुष्यक्रम स्वीकारणें म्हणजे कडक ब्रह्मचर्य-व्रत पाळणें हा आहे. आपल्या धर्मशास्त्रांचीहि अशीच आज्ञा आहे. हिंदुधर्मशास्त्रा-प्रमाणें मुलानें कमींत कमी वयाच्या २५ वे वर्षी लग्न करावें असें आहे. वैवाहिक आयुष्यक्रमाचें शिक्षण मुलांमुलींस आईबापांनीं देणें हें पाप आहे हें हिंदुस्थानांतल्या लोकांच्या मनावर ठसलें पाहिजे. आपली पूर्वपरंपरा आपण विसरलों, बालविवाह सुरू केले, आहारविहारांत धरबंध मुळींच ठेविला नाहीं, उत्तेजक पदार्थांचें सेवन करीत गेलों, त्याचा हा परि-णाम आहे. हा दुष्परिणाम धडधडीत डोळ्यांसमोर दिसत असून आपण शहाणपणाचा धडा घेत नाहीं व कोणी तो देऊं लागला तर त्याचा उपहास करतों इतकी आपल्या मनाला दुर्बळता आली आहे.

त० भा०—'लीडर' पत्रानें म्हटलें आहे कीं लोकसं-ख्या पुष्कळ असणें हें राष्ट्राच्या मजबुतीचें लक्षण पाश्चात्य

समजतात; आणि आपण तर या सिद्धांताच्या उलट उपदेश करतां. हें कसें?

म०--लोकसंख्या पुष्कळ असणें हें पाश्चात्य देशांत राष्ट्राच्या मजबुतीचें लक्षण समजलें जातें, व युद्धांत झालेली प्राणहानि भरून काढण्यासाठीं तिकडे प्रजोत्पत्तीला उत्तेजन देण्यांत येऊं लागलें आहे ही गोष्ट खरी आहे. पण या बाबतींत आपण पाश्चात्यांचें अनुकरण करून चालणार नाहीं. त्या देशांच्या व आपल्या स्थितींत महदंतर आहे. तिकडे इकडच्यासारखें दारिद्र्य नाहीं. देशांत संपत्ति विपुल आहे. बालविवाहाची चाल नाहीं. मुलगे व मुली यांची पूर्ण शारीरिक वाढ झाल्याशिवाय त्यांचीं लग्नें होत नाहींत. ज्यांनीं राष्ट्रोद्धाराचें काम पतकरलें आहे अशा पुरुषांत तिकडे कांहीं ब्रह्मचारी आहेत. आपल्याइकडे मात्र मुलाला चतुर्भुज केलेला केव्हां पाहीन अशी घाई आईबापांना होत असते. याप्रमाणें सर्वच बाबतींत आपणांत व पाश्चात्यांत भिन्नता असतां तिकडचे नियम इकडे लागू करूं पाहणें हा वेडेपणा होईल. या बाबतींत आपल्या पूर्वजांचें उत्कृष्ट उदाहरण आपल्यापुढें असतां ती पूर्वींची परंपरा सोडून आपण उपदेशासाठीं पाश्चात्यांकडे कां धाव घ्यावी तें मला कळत नाहीं.

त० भा०—एकूण नुसतें अविवाहित राहणें येवढाच ब्रह्मचर्याचा अर्थ नसून इंद्रियदमन व आत्मसंयमन याहि गोष्टींचा समावेश आपण ब्रह्मचर्य या शब्दांत करतां व विवा-

# १४ जुनें भांडवल.

त० मा०—आपल्या पूर्वजांनीं मोठमोठाले पराक्रम करून दिगंत कीर्ति मिळविली; धर्म, तत्त्वज्ञान, भौतिक शास्त्रें वगैरे बाबतींत हजारों वर्षांपूर्वीं शोध करून त्यांनीं जे सिद्धांत ठरविले ते आज तागाईत अबाधित आहेत; व ते त्यांचे सिद्धांत पाश्चात्य लोक आतां कबूल करूं लागले आहेत; पूर्वजांच्या अशा बढाया मारण्याची प्रवृत्ति अलीकडे आपल्या लोकांत ज्यास्तज्यास्त प्रमाणावर दिसूं लागली आहे. ही इष्ट आहे कीं अनिष्ट आहे?

म०—पूर्वजांच्या या गोष्टी ज्या सांगण्यांत येतात त्या सगळ्या खऱ्या आहेत कीं काय आणि असल्या तर कितपत खऱ्या आहेत तें मी सांगूं शकत नाहीं. पण मी येवढें जाणतों कीं कै. न्यायमूर्ति रानडे आज हयात असते व त्यांनीं या बढाया ऐकल्या असत्या, तर त्यांनीं उलट असा प्रश्न विचारला असता कीं 'यापासून कोणता निष्कर्ष काढणार?' पूर्वजांचें वैभव आठविल्यानेंच लोक उन्नतीला चढतात असें नाहीं. जुन्या काळच्या अशा गोष्टींचें स्मरण राखावयाचें तें माझ्यामतें येवढ्याच पुरतें असावें कीं त्या पूर्वींच्या वैभवांत आणि आतांच्या आपल्या स्थितींत जें महदंतर पडलें आहे त्यानें लज्जित होऊन कांहींतरी पुरुषार्थ करण्याकडे

आपल्या लोकांची प्रवृत्ति व्हावी. पूर्वीच्या काळच्या लोकांस शोभणारे असे आपण त्यांचे वंशज आहों हें दाखविण्याची प्रशंसनीय स्फूर्ति आपणांस व्हावी या दृष्टीनेंच अशा बढाया सध्याच्या काळच्या लोकांच्या तोंडांत शोभतील. पण आपण वडिलांसारखे मोठे व्हावें अशा विषयींचे प्रयत्न त्यांच्या हातून होत असले पाहिजेत ही मोठी अट आहे. ती अट त्यांच्या हातून पुरी होत नसेल तर आपण 'बड बापके बेटे' आहों असें नुसतें आढ्यतेनें सांगण्यांत अर्थ नाहीं. अशांना जगांत मान मिळणार नाहीं; उलट ते स्वतःला उपहासास मात्र पात्र करून घेतील.

त० भा०——आपल्या पूर्वजांत व सध्याच्या लोकांत जें येवढें मोठें अंतर पडलें आहे त्याचा दोष कोणाकडे आहे? कित्येक लोक असें म्हणतात कीं यांत आपल्याकडे कांहीं दोष नाहीं. आम्ही लोक साधेभोळे, असें पाहून परकीयांनीं लुच्चेगिरी करून आम्हांस फसविलें, त्यामुळें आम्हांला ही अवनति प्राप्त झाली आहे. यावर आपलें काय म्हणणें आहे?

म०——या लोकांच्या म्हणण्यांत बरीचशी अतिशयोक्ति असली तरी थोडा सत्याचा भाग आहे हें मी कबूल करतों. तरी पण त्याबद्दलचा दोष आपल्याचकडे येतो. ईस्ट इंडिया कंपनीच्या मोहोरांची लालूच सुटून स्वतःच्या देशाशीं द्रोह करणारे आपलेच लोक होतेना? आपलाच दाम खोटा, तेथें दुसऱ्याला नांवें ठेवण्यांत काय अर्थ आहे? आपल्या लोकांत

लोभीपणा नसता, स्वार्थी दृष्टि नसती, देशाभिमान जाज्वल्य असता, देशासाठीं आत्मत्याग करण्याची बुद्धि असती, सत्य-प्रीति व प्रामाणिकपणा असता, भित्रेपणा नसता, ज्ञानाची महती कळली असती, व त्याचा प्रसार वरपासून खालपर्यंत करण्यासाठीं आपण प्रयत्न केले असते, तर आज आपणांस ही स्थिति कां प्राप्त झाली असती?

त० भा०—आपल्या हातून मागें हे दोष घडले असतील. नाहीं, घडले असेंच धरून आपण चालूं. पण आतां तर हे दोष आपल्या अंगीं नाहींत ना?

म०—या बाबतींत किंचित् जागृति झालेली सध्या दिसते ही गोष्ट मला कबूल आहे. पण अजून म्हणण्यासारखी सुधारणा झालेली नाहीं ही दुःखाची गोष्टहि कबूल केली पाहिजे. कौटुंबिक बाबतींत स्वार्थत्याग थोडा अधिक दिसूं लागला आहे; पण राष्ट्रीय बाबतींत तो थोड्यांच्याच अंगीं व अल्प प्रमाणांत पाहण्यांत येतो. आपल्या गल्ल्या, रस्ते, आगगाड्या वगैरे ठिकाणीं स्वार्थी दृष्टि अद्याप दिसते. आपल्या घरांतला केर काढून तो रस्त्यावर दुसऱ्याच्या घरापुढें कोण टाकतात? आपल्या अशा कृत्यानें दुसऱ्याला कांहीं त्रास होईल याचा विचार तरी त्यावेळीं आपल्या मनांत येतो काय? शहरांत नळाचें किती पाणी फुकट वाहून जात असतें! पण काम झाल्यावर सार्वजनिक तोटीचें तोंड बंद करणें हें जसें कांहीं आपलें कामच नाहीं, अशी समजूत सार्वत्रिक दिसून येत

नाहीं काय? आगगाडीच्या डब्यांत आपणास स्वतःला जागा मिळाली म्हणजे झालें. त्याच डब्यांत आणखी जागा असली तरी दार बंद करून दुसऱ्या उतारूंना जाण्यास मनाई करणारे लोक थोडे का दिसतात? दुसऱ्याला अडचण झाली तरी पर्वा नाहीं, पण आपलें अग्निहोत्र (धूम्रपान) सुरू ठेवणारे लोक थोडे आहेत काय? अशीं आपल्या लोकांच्या स्वार्थी दृष्टीचीं हवीं तेवढीं उदाहरणें देतां येतील. जेथें इतकी स्वार्थी दृष्टि आहे, तेथें देशासाठीं आत्मयज्ञ करण्याची प्रवृत्ति कशी असेल? तसाच मित्रेपणा व आपण जें खरोखर नाहीं ते आहों असें दाखविण्याची प्रवृत्ति अर्थात् दंभ हीं जिकडे पाहाल तिकडे दिसतील. धर्माच्या बाबतींत तर या ढोंगानें पूर्ण प्रवेश केलेला आढळेल. इतका कीं जपजाप्य, गंधाचे टिळे, व रुद्राक्षाच्या माळा हीं पवित्रतेचीं बाह्य चिन्हें होण्याऐवजीं तीं अपवित्रतेचीं मात्र चिन्हें होऊन बसलीं आहेत. ते आपल्या अंगचे दोष आपण टाकिले नाहींत, तोंपर्यंत वाडवडिलांच्या पराक्रमाच्या व वैभवाच्या बढाया मारण्याचा अधिकार तरी आपणास पोंचतो काय? याचा विचार तुम्हीच करा. जर नसेल तर त्या बढाया मारणें अनिष्ट होय हें सांगावयास पाहिजे काय? (न. जी. २७।६।२०)

# ५१ लोकशाही वि. गुंडशाही.

त० भा०——आपण अलीकडे हिंदुस्थानांतल्या बहुतेक प्रांतांत बरेच फिरून आलां आहां. प्रत्येक ठिकाणीं आपलें दर्शन घेण्यास व आपलें स्वागत करण्यास हजारों तरुण मोठ्या उत्साहानें येत असत. त्यांचा तो उत्साह पाहून आपल्या मनाला काय वाटलें तें कृपा करून सांगाल काय?

म०——तरुणांतच काय, पण एकंदर जनतेंत (वृद्ध, प्रौढ, स्त्रिया, व लहान मुलें यांच्यांतसुद्धां) एकप्रकारची जागृति व उत्साह उत्पन्न झाला आहे हें पाहून कोणाहि देशभक्तास आनंदच वाटेल यांत शंका नाहीं. कांग्रेस ही राष्ट्रीय संस्था आज पसतीस वर्षें अस्तित्वांत आहे. देशांतले मोठमोठे प्रख्यात व विद्वान् पुढारी तिच्या चालकांत आहेत; तरी ती संस्था अद्याप सामान्य जनतेंत उत्साह उत्पन्न करणाऱ्या समारंभाच्या स्थितींतून पलीकडे गेली आहे असें मला वाटत नाहीं. आपल्या इतर सभा तर निःसंशय याच स्थितींतल्या. असतात. या सभांतून व इतर समारंभांतून उत्साह यथेच्छ दिसतो. पण त्या उत्साहाबरोबर जो विवेक असावयाला पाहिजे तो दिसत नाहीं. माझ्या प्रवासांत पुष्कळ ठिकाणीं रेलवे-स्टेशनवर मला कित्येक लाजिरवाण्या गोष्टी घडलेल्या दिसून आल्या. कोणी एकादा सन्मान्य पुढारी आगगाडींतून उत-

रावयाचा असला म्हणजे त्याच्या दर्शनाविषयीं मंडळीची इतकी उत्कंठा असते कीं त्या गाडीनें आलेल्या दुसऱ्या उतारूंच्या सामानाची नासधूस आपल्या हातून न कळत होते कीं काय इकडे ते पाहत नाहींत. मोठ्या कर्कश आवाजानें ओरडावयाचें व गर्दी करून एकमेकांच्या अंगावर पडावयाचें, या तर अगदीं सामान्य गोष्टी होऊन बसल्या आहेत. बंदोबस्त व व्यवस्था ठेवण्यासाठीं स्वयंसेवक नेमिलेले असतात. पण लोकांचा बंदोबस्त व व्यवस्था ठेवण्याऐवजीं हे स्वतःच अव्यवस्थितपणानें वागतात! त्यामुळें प्लाटफार्मपासून गाडीपर्यंत जाऊन पोंचणें म्हणजे त्या पुढाऱ्याला एक मोठी कष्टदायक गोष्ट होते, आणि त्याचा निष्कारण कालक्षेपहि होतो. पांच मिनिटें जेथें लागूं नयेत तेथें एकेक तास व्यर्थ मोडतो! लोक त्या पुढाऱ्याच्या अंगावर गर्दी करून पडतात; वाटेल तीं माणसें त्याच्या गाडींत जाऊन बसतात. या बाबतींत अधिक दोष स्वयंसेवकांकडेसच असतो. गाडीच्या पायरीवर मागें, पुढें, जेथें उभे राहण्याइतकी जागा मिळेल तेथें, लोक खुशाल परवानगी वांचून चढतात. येथें उभे राहूं नका म्हणून त्यांना कितीहि विनवण्या करून सांगितलें तरी ते ऐकत नाहींत. गाडीचें टपसुद्धां पुष्कळ वेळां फाटतें. गाडीच्या मागोमाग कित्येक धावतात. अपघात घडतो कीं काय अशी क्षणोक्षणीं मनाला भीती वाटत असते. सभेंतहि तोच प्रकार दिसतो. आरडाओरड, गोंधळ, आणि

अव्यवस्था ! चांगलाच वक्ता असला तर मात्र स्तब्धता असते. या प्रकाराला मी आडदांडशाही किंवा गुंडशाही असें नांव देतों. अशा ठिकाणीं तुमचें जीवित आडदांड लोकांच्या हातांत असतें. आणि जोंपर्यंत तुमच्यांत व या आडदांड लोकांत सहानुभूतीचें बंधन असतें तोंपर्यंत ठीक असतें; पण तें तुटतांच एकदम भयंकर स्थिति प्राप्त होते. हा प्रकार निःसंशय बंद झाला पाहिजे व आपण व्यवस्थित रीतीनें वागण्यास शिकलें पाहिजे. आपली मोठी अडचण ही आहे कीं आपण आजपर्यंत गायनाकडे दुर्लक्ष करीत आलों आहों. युरोपांत एखादा युक्तिवान् पोलिस सुपरिंटेंडेंट फार गडबड होतेसें पाहिल्याबरोबर लागलींच एखादें लोकप्रिय गाणें म्हणण्यास सुरुवात करतो व त्या गायनाच्या नादांत गडबड करणारे लोक व्यवस्थितपणानें वागूं लागतात. आपल्या स्वयंसेवकमंडळांनीं व सेवासमित्यांनीं राष्ट्रीय गीतें योग्य तऱ्हेनें म्हणण्यास शिकणें अवश्य आहे. त्याचसाठीं कांग्रेस व इतर परिषदा भरण्याच्या वेळीं गायकमंडळीनें हजर राहून सभाजनाना एक-स्वरानें गीत म्हणण्यास शिकविलें पाहिजे. ज्यांना शिस्तीनें वागण्याचें व ती राखण्याचें आणि पद्धतशीर कामें करण्याचें शिक्षण मिळालें असेल असेच स्वयंसेवक ठेविले पाहिजेत. वाटेल त्याला स्वयंसेवक म्हणून घेतां कामा नये. लष्करी शिक्षण ज्याला मिळालें नाहीं असा एकतरी लष्करी शिपाई कधीं दिसतो काय? अशा आडदांडशाहींतून लवकर

निघून आपणास लोकशाही स्थापावयाची आहे. लोकांत उत्साहाची विपुलता आहे; पण त्याला योग्य वळण लावण्याची अवश्यकता आहे. यासाठीं तूर्त मी कांहीं थोडेसे नियम सुचवितों. ते तातडतोब अंमलांत यावे अशी माझी इच्छा आहे.

त० भा०——आपण आतां वर्णन केली अशी लाजिरवाणी स्थिति खरोखर आहे हें कबूल करण्यास मला अतिशय लज्जा वाटते; आणि आपल्या मार्गदर्शित्वाखालीं व आपण घालून द्याल त्या नियमाप्रमाणें चालण्यास मी तयार आहें व माझे सोबतीहि तयार होतील ही मला पूर्ण आशा आहे. आपण कोणते नियम सुचवितां ?

म०——मोठाल्या समारंभांचे वेळीं बंदोबस्तासाठीं जे स्वयंसेवक ठेवावयाचे ते चांगले शिस्तीनें वागण्याचें शिक्षण मिळालेले व अनुभवी असावे. कोणत्या प्रसंगीं कसें वागावयाचें याबद्दलचे नियम छापून त्यांना द्यावे व तें नियमांचें पुस्तक नेहमीं त्यांच्याजवळ असावें. समारंभाचे वेळीं पण कांहीं थोडेंसें अगोदर स्वयंसेवकाची पलटण आणून उभी करावी व त्यावेळीं त्यांना विशेष सूचना देण्यांत याव्या. स्टेशनावर सगळ्या स्वयंसेवकांना एकाजागीं गोळा न करतां गर्दी मोडण्यासाठीं त्यांना निरनिराळ्या जागीं उभे करावें, स्टेशनावर फारशी लोकांना जाऊंच देऊं नये. आंत जाण्यांतच विशेष मान आहे असें नाहीं. बाहेर उभे राहणेंहि

तितकेंच मानास्पद आहे. इतर उतारूंच्या सामानाला धक्का न लागेल हें पाहणें स्वयंसेवकांचें मुख्य कर्तव्य आहे. पुढारी ज्या वेळीं यावयाचे असतील त्याच्या पुष्कळ अगोदर लोकांनीं जाऊन तिष्ठत बसूं नये. उतारूंना जाण्यासाठीं रस्ता अगदीं मोकळा ठेवावा. शक्य असल्यास सन्मान्य पाहुण्यांसाठीं स्वतंत्रच वाट ठेवावी. पाहुणे आपल्या गाडीपर्यंत जाऊन पोंचल्याचे अगोदर प्रेक्षकांनीं प्लाटफार्मवरून हलूं नये. पाहुण्यांच्या सन्मानार्थ जो जयघोष करावयाचा तो ठराविक व राष्ट्रीय असावा. रस्त्यावर गाडीच्या मागें न धावतां रस्त्याचे दोन्ही बाजूस लोकांनीं रांगेनें उभे राहावें. प्रेक्षकांत स्त्रिया असल्या तर त्यांचें संरक्षण करणें हें प्रत्येकानें आपलें कर्तव्य समजावें. अशा गर्दीच्या समारंभांत लहान मुलांना नेऊं नये. स्वयंसेवकांना निशाणें व शिट्या यांचा योग्य उपयोग करण्यास व त्यांच्या द्वारें एकमेकांशीं दुरून सूचना पोंचविण्यास शिकविलें पाहिजे. गर्दींतल्या वाटेल त्या माणसानें व्यवस्था ठेवण्याचें काम आपल्या हातीं घेऊं नये. त्यानें स्वतः स्तब्ध व व्यवस्थित रीतीनें उभे राहावें म्हणजे पुरे आहे. प्रत्येकानें स्वयंसेवक सांगतील त्याप्रमाणें वागलेंच पाहिजे हा नियम ध्यानांत ठेवावा. असे पुष्कळ नियम घालून देतां येतील. आपणास लोकशाही स्थापावयाची आहे तर आडदांडशाहीच्या स्थितींतून आपण निघालें पाहिजे हें उघड आहे. (यं. इं. ८।९।२०)

१५४८

## १६ जयघोष.

त० भा०—आपल्या बोलण्यांत आतां जयघोषाचा उल्लेख करण्यांत आला म्हणून विचारतों, कीं कोणा मोठ्या पुढाऱ्याचें स्वागत करणें झालें, किंवा त्याच्या दर्शनानें होणारा आनंद व्यक्त करणें झालें म्हणजे त्याच्या नांवाचा जयघोष करण्याची जी वहिवाट पडली आहे, तिच्यासंबंधांत आपलें मत काय आहे?

म०—एखाद्या व्यक्तीच्या नांवानें जयघोष करण्यापेक्षा ध्येयांचा उच्चार करून जयघोष करणें अधिक चांगलें असें मला वाटतें. 'शौकतअलीकी जय' असा घोष न करतां 'हिंदु-मुसलमानकी जय' असें म्हणावें. शौकतअलींचें तर म्हणणें आहे कीं हिंदु 'वंदे मातरम्' असा जयध्वनि करतात, व त्याच वेळीं मुसलमान 'अल्लाहो अकबर' हे शब्द मोठ्यानें उच्चारतात, त्याच्या योगानें गोंधळ मात्र उडतो, आणि जय-घोष करण्यांतसुद्धां आमच्या लोकांचें एकमत नाहीं असें दिसून येतें. त्यापेक्षां हिंदु व मुसलमान या दोघांनीं मिळून आनंदानें 'अल्लाहो अकबर' असा जयघोष करावा; कारण, त्यानें ईश्वराची थोरवी गाइली जाते. दुसरा जयध्वनि 'वंदे मातरम्' किंवा 'भारतमाताकी जय' हा असावा. त्यानें मातृभूमीवरचें आपलें प्रेम व्यक्त होतें; आणि तिसरा 'हिंदु मुसलमानकी जय' हा असावा. कारण, त्यांच्या एकीवांचून

हिंदुस्थाननें आपल्या राष्ट्रीय कार्यांत यशप्राप्तीची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. हा जयघोष करण्यांतसुद्धां व्यवस्थितपणा व एकी अवश्य पाहिजे. एकानें केलेला जयघोष दुसऱ्याला आवडला नाहीं, तर त्यानें लागलीच दुसरा जयघोष करून गोंधळ माजवूं नये. गप बसावें. व्यक्तीच्या नांवांचा जयघोष करण्यानें तो करणारांच्या फुप्फुसाला चांगला व्यायाम मिळण्यापलीकडे कांहीं राष्ट्रीय हित होत नाहीं. वेळ आणि उत्साह मात्र फुकट खर्च होतो. (यं. इं. ८।९।२०)

## १७ ग्रामसुधारणा.

त० भा०—आपल्या खेड्यापाड्यांची स्थिति अत्यंत शोचनीय आहे. तेथें स्वच्छता राखण्याविषयींची जबाबदारी कोणावर नसते. लोक अडाणी आणि दरिद्री म्हणून गलिच्छ रीतीनें राहतात असें आमच्या खेड्याचें हिडिस चित्र मि. लायोनेल कर्टिस यांनीं काढलें आहे तें आपल्या वाचण्यांत आलेंच असेल. हें चित्र बरोबर आहे असें आपणांस वाटतें कीं त्यांत अतिशयोक्ति आहे ?

म०—कांहीं बाबतींत थोडीशी अतिशयोक्ति असली तरी एकंदरींत तें चित्र वस्तुथितीचें निदर्शक आहे अशी माझी समजूत आहे. कांहीं बाबतींत तर मी असेंहि म्हणेन कीं मि. कर्टिस यांनीं लिहिलेलें फार कमी आहे. खरी स्थिति त्यांनीं

लिहिली आहे त्याहूनहि वाईट आहे. सुव्यवस्थित ग्रामरचना म्हटली म्हणजे ती नियमबद्ध असावयाला पाहिजे. गांवांतल्या गल्ल्या कशा तरी असतात; त्यांना कांहीं व्यवस्थित आकार पाहिजे. खेड्यापाड्यांतून अनवाणी चालणाऱ्या लोकांची संख्या मोठी असते. म्हणून तेथील रस्ते असे स्वच्छ आणि साफ पाहिजेत कीं कोणाला ठेच न लागेल किंवा दुसरी कांहीं अडचण न वाटेल. पाण्याचा निकास चांगला झाला पाहिजे. देवांचीं मंदिरें व मुसलमानांच्या मशिदी वगैरे इतक्या स्वच्छ असाव्या कीं त्या नुकत्या बांधल्या आहेत कीं काय असें पाहणाराला वाटावें, आणि दर्शनासाठीं किंवा प्रार्थनेसाठीं त्यांत जाणाऱ्यांच्या मनाला पूर्ण शांति, व पवित्रता प्राप्त व्हावी. गांवच्या आणि घरांच्या आसपास झाडें लाविलेलीं असावीं. मुशाफिरांसाठीं धर्मशाळा, मुलांमुलींसाठीं शाळा व आजारी माणसांसाठीं लहानसा दवाखाना असावा. लोकांच्या नित्याच्या प्रातर्विधीसाठीं अशी व्यवस्था असावी कीं त्यामुळें हवापाणी बिघडूं नये. गांवच्या लोकांना लागणारें अन्नवस्त्र तेथल्या तेथेंच पैदा करतां येईल, बाहेरून आणण्याचें काम पडणार नाहीं, अशी तजवीज केली पाहिजे. चोर, लुटारू वगैरे पासून किंवा वाघ, लांडगे, डुकरें वगैरे पासून लोकांना उपद्रव न झाला पाहिजे. गांवचे लोक पूर्णपणें स्वावलंबी असले पाहिजेत.

त० भा०—आपण आतां सांगितलें हें वर्णन

एखाद्या कादंबरीला शोभण्यासारखें आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत इतक्या गोष्टी घडवून आणणें मला तर अशक्य दिसतें.

म०—अशक्य तर मुळींच नाहीं, आणि तुम्हांला वाटतें तितकें तें कठीण पण नाहीं अशी माझी समजूत आहे. हिंदुस्थानांत साडेसात लक्ष खेडीं व गांवें आहेत असें म्हणतात. म्हणजे सरासरीनें प्रत्येक गांवची लोकसंख्या चारपांच शें पडते. येवढ्या लहान गांवांत लोकांनीं मनावर घेतलें तर त्यांना पुष्कळ गोष्टी सहज करतां येतील. त्यासाठीं व्याख्यानमाला नकोत, कायदेकौंसिलें नकोत, कीं दुसरें कांहींहि नको. एकच गोष्ट पाहिजे; आणि ती म्हणजे हाताच्या बोटांवर मोजतां येतील इतके शुद्ध भावानें व कळकळीनें कामें करणारे स्त्रीपुरुष पाहिजेत; त्यांनीं स्वतः लोकांना उत्तम आचरणाचा धडा घालून दिला पाहिजे; आणि लोकसेवा हीच देवाची सेवा मानून अनन्य भावानें गांवच्या सुधारणेला स्वतःला वाहून घेतलें पाहिजे. हीं कामें करण्यासाठीं त्यांना उद्योगधंदा सोडून आपला सगळा वेळ इकडेच द्यावा लागेल असेंहि नाहीं. त्यांना आपला उद्योगधंदा संभाळून हें सुधारणेचें काम करतां येईल.

त० भा०—पण या कामाला अवश्य लागणारें शिक्षण खेडवळ लोकांना कोठें मिळणार आहे ?

म०—फारशा शिक्षणाची या कामाला जरूरी नाहीं. अक्षरज्ञान मुळींसुद्धां नसलें तरी चालेल. या कामासाठीं

सरकारी अधिकाऱ्यांशीं पत्रव्यवहार करायला नको, किंवा त्यांच्याकडून ग्रांट मिळण्यासाठीं अर्ज खरडायला नकोत. स्वतःचा खंबीरपणा मात्र पाहिजे. प्रत्येक गांवांत लोकांच्या सेवेसाठीं तयार होणारीं पांचचार माणसें निघालीं तरी पुरे आहेत. ग्रामसुधारणेचें मोठें अवडंबर न घालतां, किंवा चळवळ न करतां, मुकाट्यानें त्यांना या गोष्टी करतां येतील. प्रत्येक गांवानें आपापल्या पुरती नीट व्यवस्था अशा रीतीनें ठेविली म्हणजे सगळ्या देशाची एकदम सुधारणा होईल.

त० भा०—पण या कार्यासाठीं लागणारें द्रव्य कोठून आणावयाचें ?

म०—द्रव्याचें कामच नाहीं. सगळीं कामें अंगमेहनतीनें स्वतः करावयाचीं व दुसऱ्यांकडून गोड बोलून करवून घ्यावयाची. याला माणसाच्या ठायीं सदाचरण व धर्मवृत्ति या गोष्टी मात्र अवश्य पाहिजेत. खेड्यापाड्यांची सुधारणा करण्याला हा सर्वांत सोपा मार्ग आहे हें मी स्वानुभवावरून सांगतों. यांत माणसानें दुसऱ्याची वाट पाहण्याचें कारणच नाहीं. अशा रीतीनें ग्रामसुधारणा करण्याचें काम अंगावर घ्यावें असें ज्याला वाटेल त्यानें तें एकदम करूं लागावें, व लोकांपुढें उदाहरण ठेवावें. त्याचें उदाहरण पाहून दुसऱ्या थोड्या लोकांना तरी त्याच्यासारखें वागण्याची स्फूर्ति आपोआप होईल, आणि त्यापासून फायदा दिसूं लागल्यावर लोकांच्या मदतीची वाण भरून निघेल, आणि थोड्याच वेळांत अशा प्रयोगाचा सुपरिणाम एकंदर देशाला दाखवितां येईल. (न. जी. ५।१०।१९१९)

---

# १८ मजूर वि. भांडवलवाले.

त० भा०—मजूर व कारखानदार यांच्यामध्यें झगडा उत्पन्न होऊन सध्या जे संप सुरू आहेत त्यांविषयीं आपलें काय म्हणणें आहे? या झगड्याच्या मुळाशीं कोणाचा दोष आहे? याचा परिणाम पुढें काय होईल असें आपणांस वाटतें?

म०—अशा प्रकारच्या कलहांत बहुधा भांडवलवाल्यांचाच दोष ज्यास्त असतो असें सामान्यतः आढळतें. सध्याच्या महागाईच्या काळांत पूर्वींच्या सारख्या अल्प वेतनावर मजूरचा निर्वाह होणें शक्य नाहीं. दांडगाई करून मजूरी वाढवून घेणें अशक्य आहे. मजुर आणि भांडवलवाले यांचा परस्परांवर विश्वास नाहीं. मजुरांच्या बाजूला शारीरिक बळ आहे, पण बुद्धिमत्ता नाहीं. भांडवलवाल्याजवळ मात्र ती आहे. मजुरांना बुद्धिमत्ता प्राप्त होईल तर ते धनी होऊन बसतील. भांडवलवाले नुसत्या द्रव्यबळावर नव्हे तर बुद्धिबळावर भांडत आहेत. मजूर केवळ संख्येच्या जोरावर अवलंबून राहतील तर स्वतःचा नाश करून घेतील, आणि देशाच्या उद्योगधंद्यांचीहि त्यामुळें हानि होईल. पण ते न्याय मिळविण्यासाठीं स्वतः विपत्ति सोसून भांडत राहतील तर मात्र त्यांना यश येईल. इतकेंच नाहीं, तर ते

आपल्या धन्यांलाहि सुधारण्यास लावतील, आणि धनी व नोकर हे एका कुटुंबांतल्या माणसांसारखे नांदत राहतील. या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावण्याला प्रथम पुढील गोष्टी केल्या पाहिजेत—१ मजूरांचे कामाचे तास अशा रीतीनें ठरविले पाहिजेत कीं त्यांना कांहीं विश्रांति मिळेल. २ त्यांना शिक्षणाच्या सोयी प्राप्त करून दिल्या पाहिजेत. ३ त्यांच्या मुलांसाठीं दूध, कपडालत्ता व शिक्षण यांची तजवीज केली पाहिजे. ४ त्यांना राहण्यासाठीं आरोग्यकारक घरें बांधून दिलीं पाहिजेत. ४ खर्चवेंच जाऊन मालिना कांहीं रकम म्हातारपणची तरतूद म्हणून त्यांना शिल्लक टाकतां येईल असें केलें पाहिजे. आज यांपैकीं एकहि गोष्ट केलेली दिसत नाहीं. याबद्दलचा दोष दोन्ही पक्षांकडे आहे. धनी मजुरांच्या नुसत्या चाकरीकडे पाहतात, आणि कमींत कमी वेतन देऊन ज्यास्तींत ज्यास्ती काम करवून घेण्याकडे त्यांचें लक्ष असतें. याच्या उलट, ज्यास्तींत ज्यास्ती वेतन घेऊन कमींत कमी काम करण्याची युक्ति मजूर शोधीत असतात. याचा परिणाम हा होतो कीं पगारांत वाढ केली तरी कामांत सुधारणा होत नाहीं. एकंदरींत धनी व नोकर यांच्यांतला संबंध पवित्रपणाचा नसतो, आणि मजूर पगारांत झालेल्या वाढीचा सदुपयोग करीत नाहींत. आतां या मजुरांचा राजकारणांत उपयोग करून स्वतःच्या हिताचें घोडें पुढें ढकलणारे कांहीं लोक निघाले आहेत. मजुरांनाहि पुढारी पाहिजेच आहेत.

ते कशाप्रकारचे मिळतात त्यावर त्यांची बरीवाईट स्थिति अवलंबून राहील. खरोखर संप ही एक अजब गोष्ट आहे. पण तिचा सदुपयोग करण्याचें काम सोपें नाहीं. मजुरांनीं आपापले व्यवस्थित संघ तयार केले पाहिजेत व संघाच्या सल्ल्याशिवाय संप करूं नये. अगोदर कारखानदारांशीं बोलणें चालणें केल्याशिवाय एकदम संप करण्यांत धोका असतो. भांडवलवाले पंच नेमण्यास व त्यांचा निकाल मान्य करण्यास कबूल झाले तर पंचायतीचें तत्त्व मजुरांनीं मान्य करावें, व त्यांनीं दिलेला निकाल आपणास रुचो अगर न रुचो, त्याप्रमाणें दोन्ही पक्षांनीं वागलेंच पाहिजे. नुसती मजुरीची वाढ होण्यांत अर्थ नाहीं. तर ती मिळविण्याचीं साधनें कशाप्रकारचीं आहेत व पैशाचा व्यय कशाप्रकारें करण्यांत येत असतो तेंहि पाहिलें पाहिजे. (न. जी. ८।२।२०)

त० भा०—पण आपल्या इकडचे गिरण्यांतले मजूर आळशी आहेत; ते ठरलेला भरपूर वेळ कामाला देत नाहींत; व कामाकडे दुर्लक्ष करतात असें गिरणीवाले म्हणतात. अशा मजुरांना वाढती मजुरी काय म्हणून द्यावयाची?

---

म०—रोज बारा तास राबणाऱ्यांकडून कामाकडे एकाग्रता, व पूर्ण उद्योगीपणा या गोष्टींची अपेक्षा करणेंच चुकीचें आहे. कामाचे तास कमी केल्याचे परिणाम इंग्लंडमध्यें चांगले दिसून आले तसे येथेंहि दिसतील. बाराच्या

ऐवजीं दहा तास ठरविले तर हल्लींच्या इतकेंच काम ते ज्यास्त काळजीपूर्वक करतील.

त० भा०--स्त्रिया व मुलें यांना गिरण्यांतून कामावर लावण्यासंबंधानें आपलें काय म्हणणें आहे?

म०—लहान लहान मुलांना शाळांतून काढून मजुरीला लावणें, व गृहकृत्यें व मुलांची जोपासना करणें हेंच खरोखर जिचें मुख्य कर्तव्य त्या गृहिणीला तें कर्तव्य सोडून गिरण्यांतून मजुरी करण्याचा प्रसंग येणें या गोष्टी आपल्या देशाच्या अधोगतीच्या निदर्शक आहेत असें मी समजतों. उदरनिर्वाहासाठीं नवरा व बायको या दोघांनाहि दिवसभर दुसऱ्याची मजुरी करण्याचा प्रसंग येणें म्हणजे दिवाळखोरपणा आहे. (यं. इं. ५।५।३०)

---

# १९ गोरक्षण.

त० भा०--हल्लीं दूध, तूप वगैरे पदार्थ इतके महाग झाले आहेत कीं कांहीं दिवसांनीं त्यांच्या नुसत्या वासावर हिंदुस्थानच्या लोकांना तृप्ति मानून राहावें लागेल कीं काय अशी भीति वाटते. याला काय उपाय आपण सुचवितां?

म०--याला गोरक्षण हाच एक उपाय दिसतो.

त० भा०--पण तीं तर आम्ही करीतच आहों. आमच्या लोकांनीं पांजरपोळ स्थापिले आहेत व ज्यांना गाईंना

संभाळण्याचें सामर्थ्य नसेल त्यांनीं पांजरपोळांत गाई नेऊन दिल्या असतां त्यांना तेथें संभाळण्यांत येतें.

म०—गोरक्षणाबद्दल आपल्या लोकांनीं जें कांहीं करावयास पाहिजे त्याच्या शतांशहि आपल्या हातून होत नाहीं. गोरक्षण ही हिंदुधर्माची एक मोठी बाब आहे. पण या प्रश्नाचें धार्मिक स्वरूप लक्षांत न घेतलें तरी आर्थिक दृष्ट्या या गोष्टीचें जें महत्त्व आहे तेंहि आमच्या लोकांना कळत नाहीं. गोरक्षणाचा हवाला आम्हीं नामधारी गोरक्षणसभांवर सोपविला आहे. हिंदुस्थानांत गाईच्या खाण्याच्या व जोपासनेच्या संबधांत जितकी हेळसांड होत असलेली दिसते तितकी जगांतल्या दुसऱ्या कोणत्याहि देशांत होत नसेल. गोमांस खाणाऱ्या इंग्लंड देशात अस्थि व चर्म येवढेच अवशेष राहिलेल्या गाई तुम्हांला दिसावयाच्या नाहींत. आपल्या लोकांनीं पांजरपोळ स्थापिले आहेत हे खरें; पण त्यांची व्यवस्था असावी तशी आहे काय? गाईच्या केवळ प्राणांचें आम्ही रक्षण करतों, या पलीकडे पांजरपोळांत ज्यास्त कांहीं करीत नाहीं. गाईच्या जोपासनेची शास्त्रीय पद्धति व गोशाळेची सुव्यवस्था या गोष्टी आम्हांस अद्याप कळू लागल्या नाहींत.

त० भा०—पण गोमांसासाठीं मुसलमान व इंग्रज यांच्याकडून जो गाईचा वध होतो त्याला पांजरपोळाच्या सुव्यवस्थेनें आळा कसा पडणार? आणि तो संहार बंद झाल्याशिवाय आम्हीं तरी काय करावें?

म०--नुसती पांजरपोळाची सुव्यवस्था ठेविल्यानें कार्य-भाग पुरा व्हावयाचा नाहीं. गाईचा संहार बंद-निदान पुष्कळ कमी-झाला पाहिजे हें मला कबूल आहे. पण हा संहार बंद होण्यासाठीं आपण प्रयत्न तरी कोठें करीत आहों? मुसलमानांच्या हातांत गाय जाऊं द्यावयाची नाहीं, आमच्या पांजरपोळांत तिला अर्धपोटीं राहावें लागलें तरी बेहेत्तर आहे, अशा पद्धतीनें पुष्कळशा गोरक्षण-सभांचें काम चालतें. इंग्रज लोकांनीं स्वतःच्या खुषीनें गोमांस खाणें बंद करावें म्हणून आमच्या लोकांनीं त्यांच्या समाजांत कधीं खटपट केली आहे काय? तुम्हांला गोमांस हवेंच असलें तर त्या-साठीं इकडच्या गाई मारूं नका, विलायतेंतून गोमांसाचे डबे मागवा, असें त्यांना कोणीं सांगून पाहिलें आहे काय? गुरांची निर्गत या देशांतून होते ती बंद करण्याकडे आतां कोठें आमच्या लोकांचें लक्ष जाऊं लागलें आहे! दुधाचा पुरवठा वाढविण्याकडे आणि शुद्ध निर्भेळ दूध मिळण्याची तजवीज करण्याकडे आमच्या लोकांचें लक्ष लागलेलें दिस-ल्यावर मुसलमान बंधूंचाहि या प्रयत्नाला पाठिंबा मिळेल ही मला खात्री आहे. गाई मारूं नका असा मुसलमानां-वर जुलूम केला तर त्याचा परिणाम विपरीत होईल. जुलुमानें कोणी दुसऱ्याच्या धर्ममताला मान देत नसतो. पण जें जुलुमानें किंवा जबरदस्तीनें करतां येत नाहीं तें दुसऱ्याच्या पोटांत शिरून व त्याची सहानुभूति मिळवून

साध्य करतां येतें. खिलाफतीचा प्रश्न हातीं घेतांना तुम्हीं गोवध बंद कराल तर मी तुम्हांला मिळेन अशी शर्त मीं घातली नाहीं याचें कारण हेंच. मुसलमानांच्या हातून गाईचे प्राण वांचवावे असें इतर हिंदूप्रमाणें मला वाटत नाहीं असें का तुम्ही समजतां? मला ती गोष्ट अगदीं जिव्हाळ्याची वाटते. पण या खिलाफतीच्या चळवळींत मी पडलों आणि मुसलमानाशीं मैत्री केली, व त्यांना न्याय मिळवून देण्याचे कामीं मी आपले प्राण खर्चीं घालण्यास तयार झालों म्हणजे आपोआपच माझ्या धार्मिक कल्पनांना मान देण्यासाठीं मुसलमान बंधु आपण होऊन गोवध बंद करतील अशी मला पक्की खात्री होती, व अनुभवहि तसाच आला आहे. गोवध बंद करा असें तोंडानें सांगावयाला नको. आपली तपश्चर्या शुद्ध असली आणि आपण खऱ्या बंधुत्वाच्या नात्यानें मुसलमानांना त्यांच्या आपत्काळीं मनापासून मदत केली तर त्यांच्या हातून होणारा गोवध आपणांस सहज बंद करतां येईल. (ले. व भा. पृ. १०७ व यं. इं. ४।८।२०).

---

## २० भयंकर दिव्य!

त० भा०—हिंदुस्थानचा उद्धार होण्यापूर्वीं त्याला भयंकर दिव्यांतून जावें लागेल असें आपण एका व्याख्यानांत सांगितलें होतें. तेंच अधिक विस्तृत रीतीनें आपण समजावून सांगाल काय?

म०—होय. हिंदुस्थानाला भयंकर दिव्यांतून गेल्याशिवाय उत्तम गति प्राप्त व्हावयाची नाहीं असें पूर्ण विचाराअंतीं माझें मत झालें आहे. हिंदुस्थानच काय, पण आजपर्यंत कोणताहि देश भयंकर दिव्यांतून तावून सुलाखून निघाल्याशिवाय त्याला ऊर्जित कळा आलेली माझ्या ऐकण्यांत नाहीं. मुलानें जगावें म्हणून त्याच्या आईला किती कष्ट सोसावे लागतात! जमीनींत पेरलेला गव्हाचा दाणा सडून जमीनींत मिळाल्या खेरीज गव्हाचें पीक येत नाहीं. दिव्याच्या द्वारें हिंदुस्थानची पूर्णशुद्धि झाल्याविना त्याच्या मागची गुलामगिरी सुटेल अशी अपेक्षा कशी करतां येईल? दुःखाला भिऊन कसें चालेल? हॅमडन व वॉट टायलर यांनीं दुःखाला भिऊन माघार घेतली असती तर त्यांचा कार्यभाग सिद्धीला गेला असता काय? अज्ञान जनतेला तिच्या इच्छेविरुद्ध दुःख भोगावें लागेल कीं काय या गोष्टीचा विचारच त्यांनीं केला नाहीं. आपल्या वाडवडिलांनीं केलेल्या चुकांपासून आपण धडा घेण्याचें मनांत आणिलें तर तसें करणें शक्य आहे; पण दुःख भोगण्याचा नियम अजीबात आपणांस टाळतां येणें अशक्य आहे. कारण, उन्नतीची ती एक अपरिहार्य अट आहे. जितके कष्ट व त्यामुळें शुद्धि ज्यास्त तितकी उन्नतीची मात्राहि अधिक असते. म्हणून एकट्या ख्रिस्तानें केलेला आत्मत्याग साऱ्या जगाला दुःखमुक्त करण्यास समर्थ झाला. येशू आपल्या मार्गांत पुढें पाऊल टाकीत

प्रामाणिकपणा नव्हे. रेलवे नोकरांना मी असें म्हणतों कीं तुम्ही हिंदुस्थानचेच लोक आहां; इंग्रजी राज्यांत अन्याय घडला कीं तुम्ही ओरड करतां. तुम्हीच चोऱ्यासारखीं अन्यायाचीं कृत्यें करूं लागलां तर तुमच्याविषयींच्या अन्यायी कृत्यांविरुद्ध ओरड कोण करील? व स्वतः अन्याय करणारांना कोणत्या तोंडानें न्याय मागतां येईल? (न. जी. ११।१।२०)

## २२ स्वदेशी.

त० भा०—आपल्या मतें शुद्ध स्वदेशी कापड म्हणजे येथें पिकविलेल्या कापसाचें येथेंच आपल्या लोकांनीं, यंत्रानें नव्हे, तर हातानें सूत काढून हातांनींच विणलेलें कापड होय. आतां असें समजा कीं आपल्या म्हणण्याप्रमाणें हिंदुस्थानांत जिकडेतिकडे हातचरक व हातमाग चालू झाले, तर त्यापासून आपल्याच लोकांच्या कापडाच्या गिरण्यांना धोका येणार नाहीं काय? आणि त्यापासून सुधारणेंत पुढें पाऊल टाकण्याचे ऐवजीं माघार घेतल्यासारखें नाहीं कां होणार?

म०—शुद्ध स्वदेशी कापडाचे हातचरक व हातमाग निघाल्यास गिरण्या बंद पडतील किंवा त्यांचें नुकसान होईल ही समजूत अगदीं चुकीची आहे. हिंदुस्थानांत दरसाल प्रत्येक माणसाला सरासरीनें १३ यार्ड कापड लागतें. यापैकीं अर्धे कापडसुद्धां इकडच्या गिरण्यांतून निघत नाहीं.

हिंदुस्थानांत पुरेसा कापूस पिकतो. तो इकडच्या गिरण्यांना पुरून उरलेला लाखो खंडी कापूस जपानला व म्यांचेस्टरला जातो व तिकडे त्यांचें कापड बनून तें परत इकडे येतें. वस्तुतः प्रयत्न केल्यास हिंदुस्थानाला लागणारें सगळेंचें सगळें कापड इकडे हातमागांवर तयार करतां येईल व त्यामुळें कोट्यवधि लोकांना काम मिळेल. हल्लीं हिंदुस्थानांत एकच धंदा—शेतकी हा—लोकांना राहिलेला आहे. लोकांना हातांनीं सूत काढण्याचा व कापड विणण्याचा धंदा शेतकीच्या जोडीला मिळाला तर हवाच आहे. शंभर वर्षांमागें हा धंदा आपले देशांत बराच प्रचलित होता. अर्वाचीन यंत्रें व सांपत्तिक निकड यांमुळें हा धंदा बसला असें म्हणणें चुकीचें आहे. हा धंदा बसला तो या दोन गोष्टींमुळें नव्हे, तर ईस्ट इंडिया कंपनीनें तो बुडविण्यासाठीं स्वीकारलेल्या विलक्षण व अनीतीच्या मार्गांमुळें बसला. गिरण्यांचें नुकसान न होऊं देतां या उद्योगाचें पुनरुज्जीवन करतां येण्यासारखें आहे. गिरण्यांची संख्या वाढविल्यानें कार्यभाग होणार नाहीं. हातचरकांचें व हातमागांचें पुनरुज्जीवन केल्यास दरसाल सहा कोट रुपये परदेशीं जाण्याचे वांचतील, आणि इतका पैसा गरीब स्त्रिया व मुलें यांच्यांत वांटून त्यांना सुखी केल्याचें श्रेय मिळेल. एखादे वर्षी पाऊस कमी पडला तरी मग हल्लींच्या सारखी लोकांची अन्नान्नदशा होणार नाहीं.

त० भा०——आपलें हें तत्त्व एकट्या कापडालाच कां लावितां? तें साखरेलाहि लाविलें पाहिजे. कारण, साखरेचा खप आपल्या देशांत कांहीं थोडा नाहीं.

म०——तुम्ही म्हणतां तें खरें आहे. पण सगळ्या देशाला पुरेल इतकी साखर तयार करण्याला पुरेसा ऊंस इकडे पिकत नाहीं ही मोठी अडचण आहे. शिवाय, परदेशी साखर वाढत्या प्रमाणावर इकडे आली तरी तिनें गूळ करण्याचा धंदा बुडाला नाहीं. साखरेच्या पायीं कापडाइतका पैसाहि परदेशांत जात नाहीं. इकडे साखरेची पैदास वाढवावयाची म्हणजे प्रथम शास्त्रीय पद्धतीवर शेतकी केली पाहिजे व ऊंस गाळण्यासाठीं सुधारलेल्या पद्धतीचीं यंत्रें आणविलीं पाहिजेत. स्वदेशी साखर मिळूं लागली तर हवीच आहे. पण शुद्ध स्वदेशी कापडाची पैदास वाढविण्याची अवश्यकता व शक्यता हीं दोन्ही ज्यास्त आहेत. ( यं. इं. १८।८।२० )

त० भा०——स्वदेशी व्रत आचरण्यापासून कापडाप्रीत्यर्थ दरसाल हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या कोट्यवधि रुपयांचा प्रवाह बंद पडेल येवढाच फायदा होईल कां आणखी कांहीं फायदे त्यापासून होतील ?

म०——दरसाल ५० कोट रुपये देशाच्या बाहेर जाण्याचें थांबणें हा कांहीं लहानसान फायदा नाहीं. पण याशिवाय दुसरे किती तरी फायदे त्यापासून होण्यासारखे

आहेत! हिंदुस्थानच्या स्त्रियांची अब्रू त्यानें वांचेल ही माझ्या दृष्टीनें फार मोठी गोष्ट आहे. ज्यांचा गिरण्यांशीं संबंध येतो त्यांना हें ठाऊक आहे कीं गिरण्यांतून काम करणाऱ्या बायकांना मोहपाश व जोखीम याच्या भयंकर दिव्यातून जावें लागतें. म्हणून पुष्कळ बायका गिरण्यांत कामाला न जातां रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामावर मजुरीसाठीं जातात. त्यांना घरीं बसल्या करतां येण्यासारखें काम दिल्यास किती चांगलें होईल! हा एक फायदा झाला. दुसरा फायदा म्हणजे शेतकीच्या जोडीला सूत काढणें व कापड विणणें हे धंदे मिळाल्यावर लोकांची उपासमार होणार नाहीं. तिसरी गोष्ट—सध्या गिरणीवाल्यांच्या हातांत पैसा जाऊन ते तेवढे एकटे गब्बर होतात, तें बंद होऊन तो पैसा पुष्कळ लोकांत वाटला जाईल व त्याच्या योगानें हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा प्रश्न अंशतः सुटेल. (यं. इं. २१।४।२०)

**त० भा०**—स्वदेशी व मांटेग्यु–चेम्सफोर्ड सुधारणा यांत आपल्या दृष्टीनें अधिक महत्त्वाची गोष्ट कोणती आहे?

**म०**—अलबत् स्वदेशीचें महत्त्व मी ज्यास्त समजतों.

**त०भा०**—तें कसें?

**म०**—सुधारणेच्या कामांत श्रम व्यर्थ होण्याचा संभव फार आहे. कारण, कौंसिलांचीं सर्व सूत्रें नोकरशाहीच्या हातांत आहेत. तुम्हीं कौंसिलांत बहुमत करून घेतलें तरी अखेर मंजुरीची गोष्ट व्हाइसराय साहेबांच्याच हातांत राहणार

कीच प्रिय आहे. तरी तिचें पिलूं खिलाफतीच्या चळवळींत सोडून देण्याची माझी खरोखर इच्छा नव्हती. पण मीं पाहिलें कीं खिलाफतीचा असहकारितेशीं निकट संबंध येतो, आणि असहकारिता म्हणजे स्वार्थत्याग हें ठरलेलेंच आहे. स्वदेशींतहि स्वार्थत्याग आहे. शुद्ध स्वदेशी म्हटली म्हणजे तींत फ्याशन व झकपकपणा यांच्याविषयींची आपली आवड बाजूला ठेवावी लागते, आणि युरोप किंवा जपान येथील तलम, झकपक, व उंची माल न वापरतां आपल्या प्रिय देशभगिनींनीं स्वतःच्या हातांनीं सूत काढून विणलेला जाडा भरडा पण सुंदर माल वापरण्यांतच भूषण मानावेंसें वाटतें. आमच्या लोकांना धर्मावर व स्वाभिमानावर गदा येऊन पडल्याबद्दल खरोखरच वाईट वाटत असलें आणि त्यांच्यांत खरी खरी जागृति झालेली असली तर स्वदेशी व्रताचा स्वीकार करण्याची अत्यंत मोठी अवश्यकता त्यांना तीव्रतेनें भासूं लागल्याशिवाय राहणार नाहीं; आणि त्यांनीं अत्यंत आस्थापूर्वक नेटानें तें व्रत चालविलें असतां त्यांच्या हातीं एक नवी शक्ति आल्यासारखें होऊन साऱ्या जगांत त्यांची छाप बसल्यावांचून राहणार नाहीं अशी माझी खात्री आहे. म्हणून भपकेदार पोषाख करण्याचें सोडून शुद्ध स्वदेशी कपडा वापरण्याचें उदाहरण मुसलमानांनीं घालून द्यावें असें मी त्यांना सांगत आलों. हिंदूंनीं—किंबहुना आपल्या देशांतल्या मनुष्यमात्रानें—स्वदेशीव्रत आचरण्यासारखें आहे. (मुंबईस ता. २९ जुलै १९२० रोजीं मुसलमानांपुढें केलेलें भाषण.)

# २३ खिलाफतीचा प्रश्न.

त०मा०—खिलाफत हें काय प्रकरण अलीकडे उपस्थित झालें आहे ? मुसलमानांच्या धार्मिक भावनांशीं या प्रश्नाचा संबंध आहे, व त्या भावनांना इंग्रज सरकारानें जो मान द्यावयास पाहिजे तो दिला नाहीं यामुळें मुसलमानांचीं मनें दुखावलीं असें मीं वर्तमानपत्रांत वाचिलें आहे; पण त्यासंबंधानें नक्की माहिती मला नसल्यामुळें आपणांस विचारीत आहें.

म०—खिलाफत हा केवळ मुसलमानांचाच प्रश्न आतां राहिलेला नाहीं. त्याला आतां अव्वल दर्जाच्या साम्राज्यविषयक प्रश्नाइतकें महत्त्व प्राप्त झालें आहे. राज्यविषयक सुधारणेपेक्षांहि या प्रश्नाचें महत्त्व मला अधिक वाटतें. हा नुसता धार्मिक प्रश्नच असता, किंवा मुसलमानांच्या मागण्या अन्यायाच्या असत्या, तर गोष्ट निराळी होती. पण तसा प्रकार नाहीं. सरकारला जेव्हां हिंदुस्थानांतून युद्धासाठीं माणसें पाहिजे होतीं, तेव्हां खुद्द इंग्लंडच्या मुख्य प्रधानांनीं मुसलमानांना कांहीं आश्वासनें दिलीं होतीं. पण युद्ध संपल्याबरोबर 'गरज सरो, वैद्य मरो' या म्हणीप्रमाणें ते वचनभंग करण्यास तयार झाले आहेत ! तुर्कस्थानाशीं तह करण्याच्या संबंधांत ज्या अटी ब्रिटिशसरकारानें घातल्या आहेत, त्या मुख्य प्रधानांनीं हिंदुस्थानांतल्या मुसलमानांना

दिलेल्या वचनाशीं विसंगत आहेत असें मुसलमानांचें म्हणणें आहे, व त्या वचनाशीं सुसंगत अशा आमच्या मागण्या सरकारानें कबूल कराव्या असें त्यांचें म्हणणें आहे.

त० भा०---या मागण्या कोणत्या?

म०—या मागण्या खिलाफत परिषदेनें जाहिरपत्रकाच्या द्वारें सरकारास कळविल्या आहेत. त्या येणेंप्रमाणें—या प्रश्नाचे मुख्य दोन भाग आहेत. एक खिलाफत म्हणजे खलीफाच्या अधिकाराबद्दलचा, व दुसरा जझिरत-अल-अरब व मुसलमानांचीं पवित्र स्थानें यांच्याबद्दलचा. खिलाफतीबद्दल मुसलमानांचें असें म्हणणें आहे कीं लढाई सुरू होण्या पूर्वीं तुर्की साम्राज्य जसें होतें तसें आतांहि कायम ठेवा; फक्त लहान लहान अ-तुर्की राष्ट्रांना, त्यांची इच्छा असल्यास, तुर्की सम्राटाची इभ्रत कायम राखून तुर्की साम्राज्यांतर्गत स्वसत्ताक राज्यपद्धति देण्याबद्दलची हमी ब्रिटिशसरकारानें हवी तर द्यावी. जझिरत-अल-अरब म्हणजे ( मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें ठरलेला अरबस्तानचा भाग ) यावर आणि मुसलमानांचीं पवित्र स्थानें यांच्यावर तुर्की सुलतानाची सत्ता असावी ही दुसरी मागणी आहे. या दोन मागण्या मुख्यतः मुसलमानांच्या धर्मशास्त्राच्या व धार्मिक भावनांच्या आधारावर केलेल्या आहेत, व त्यांना नोवेंबर १९१४ मध्यें इंग्लंड, फ्रान्स, व रशिया येथील सरकारांनीं काढलेल्या जाहिरनाम्यानें पुष्टि दिलेली आहे. हा जाहिरनामा ब्रिटिशसरकारच्या हुकुमावरून

व्हाइसराय साहेबांनीं हिंदुमुसलमानांना कळवून अरबस्तान, व मेसोपोटेमिया मधील पवित्र स्थानांना बिलकुल धक्का लावण्यांत येणार नाहीं असें आश्वासन दिलें होतें. ता. ५ जानेवारी १९१८ रोजीं मुख्य प्रधान मि. लॉइड जॉर्ज यांनीं सर्व साम्राज्याच्या वतीनें बोलतांना असें स्पष्टपणें सांगितलें होतें कीं तुर्कस्थानाकडून कान्स्टान्टिनोपल किंवा एशिया मायनरमधल्या नामांकित, सुसमृद्ध जमीनी व थ्रेस प्रांत काढून घेण्यासाठीं आम्ही लढत नाहीं. अमेरिकेच्या प्रेसिडेंटांनींहि असेंच आश्वासन दिलें होतें. इतकीं आश्वासनें देण्यांत आल्यानंतर आतां त्या वचनापासून रेसभरसुद्धां ढळणें म्हणजे ज्या मुसलमानांनीं युद्धांत दोस्तराष्ट्रांसाठीं प्राण धोक्यांत घातले त्यांच्या भावनांना दुखविण्यासारखें आहे, तो वचनभंग आहे; अन्याय आहे. मुसलमान येवढेंच म्हणत आहेत कीं दिलेलीं वचनें खरीं करून दाखवा, या त्यांच्या मागणीला हिंदुस्थानांतल्या सर्व हिंदूंचें पाठबळ आहे यांत आश्चर्य नाहीं. पण पुष्कळ आंग्लो-इंडियनांनींसुद्धां मुसलमानांच्या या मागण्या न्यायाच्या आहेत हें कबूल केलें आहे.

त० भा०—आपण खिलाफतीच्या प्रश्नासंबंधानें मुसलमानांचें जें म्हणणें पुढें मांडिलें आहे त्यावरून इंग्रजांनीं आपणांस दगा दिला असें हिंदुस्थानांतल्या मुसलमानांना वाटणें रास्त दिसतें. पण मुसलमानांची बाजू सांगतांना आपण जीं विधानें केलीं आहेत त्यांतल्या कित्येकांना कांहीं इंग्रज लेख-

कांनीं हरकत घेतली असल्याचें मीं नुकतेंच कोठें वाचलेलें स्मरतें. या आक्षेपकांचें म्हणणें आहे कीं मुसलमानी धर्मा-प्रमाणें अरबस्तानावर तुर्की सुलतानाचा अंमल असणें अव-श्यच आहे असें जें हिंदीमुसलमान म्हणतात तें खरें नाहीं. तसें असतें तर अरब हेहि स्वतः मुसलमानच आहेत; त्यांनीं आपल्या धर्माज्ञेच्या विरुद्ध स्वराज्याची मागणी कशी केली असती ? अरबस्तानावर तुर्की अंमल असणें अवश्य आहे अशी त्यांची धर्माज्ञा आहे हें गृहीत धरून चाललों तरी सध्याच्या काळांत धर्माच्या नांवाखालीं जुलमी तुर्की अंमल अबाधित चालू ठेवणें योग्य आहे काय ? तिसरी गोष्ट-तुमच्या धर्माला दुखविणार नाहीं असें आश्वासन युद्धाच्या आरंभीं देण्यांत आलें होतें त्याचा अर्थ हल्लीं सर्वसमंत असलेल्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला सोडून कसा करतां येईल ? अरबांना स्वयंनिर्णयाचा हक्क देण्याचें जें आश्वासन देण्यांत आलें आहे त्याचा भंग अशानें होईल त्याची वाट काय ? अरब लोकांना तुर्की अंमल मनापासून नकोसा झाला आहे. त्यांनीं आजपर्यंत त्या अंमलाखालीं किती दुःखें भोगलीं आहेत तें त्यांचें त्यांनाच माहित ! त्यांतून सुटण्याची संधी आयती प्राप्त झाली असतां तुम्ही तिचा फायदा घेऊं नका असें अरबांना सांगणें इंग्रज सरकारला शोभलें असतें काय ? सुलतानाच्या ताब्यांत कान्स्टान्टिनोपल आहे येवढें बस आहे. यावर आपण काय उत्तर देनां ?

म०---तुम्हीं आतां जे आक्षेप सांगितले ते केवळ कल्पनेच्या किंवा चुकीच्या समजुतीच्या आधारावर केलेले आहेत. त्यांना सत्याचा पाया मुळींच नाहीं. अरबांवर तुर्की अंमल असावा असें हिंदी मुसलमानांनीं मुळींच म्हटलेलें नाहीं. अरबांच्या स्वराज्यप्राप्तीला त्यांचा मुळींच विरोध नाहीं. त्यांचें म्हणणें येवढेंच आहे कीं अरबांना पूर्ण स्वराज्य देण्यांत येईल अशा विषयीं तुर्कांजवळून इंग्रजसरकारानें हवी तेवढी ग्यारंटी घ्यावी; पण इस्लामी धर्मस्थानांवर खलीफाचें आधिराज्य ठेवावें. युद्धापूर्वीं मुख्य प्रधानांनीं हिंदी मुसलमानांना दिलेल्या आश्वासनाचा हाच अर्थ होता व तें आश्वासन पाळलें जावें येवढेंच त्यांचें म्हणणें आहे. (यं. इं. १२।५।२०)

त० भा०---मुंबईच्या ' टाइम्स ऑफ इंडिया ' पत्रानें दुसराहि एक आक्षेप घेतला आहे. तो असा कीं तुर्कस्थाननें जर उघड उघड दोस्तराष्ट्रांशीं शत्रुत्व पतकरून जर्मनीची बाजू स्वीकारली तर त्याच्या राज्याचे तुकडे तुकडे करण्यास इंग्रजांनीं तरी काय म्हणून मागें घ्यावें ? यावर आपण काय उत्तर देतां ?

म०---माझें उत्तर येवढेंच आहे कीं जर्मनीला एकटा तुर्कस्थानच जाऊन मिळालेला नव्हता. आस्ट्रिया व हंगेरी हेहि देश मिळाले होते. मग या देशांपेक्षां तुर्कस्थानावरच इंग्रजांचा येवढा कटाक्ष कां ? शुद्ध जर्मनीच्या राज्याचे किंवा आस्ट्रिया व हंगेरी या देशांचे तुकडे तुकडे करून ते सर्वराष्ट्रीय

प्रदेश कां करण्यांत आले नाहींत ? आणि एकट्या तुर्की राज्याचेच कां करण्यांत यावेत ? तुर्कीविषयीं हा अन्याय नाहीं तर दुसरें काय म्हणावयाचें ? स्वयंनिर्णयाचें तत्त्व अंमलांत आणण्यासाठीं ते करावे लागले असें म्हणण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. कारण, स्मर्नाप्रांत ग्रीसला देऊन टाकण्यांत कोणतें स्वयंनिर्णयाचें तत्त्व पाळलें गेलें आहे ? थ्रेस आणि स्मर्ना येथील प्रांतांनीं आमच्यावर ग्रीसचें राज्य पाहिजे असें कधीं म्हटलें होतें ? अरबांना तरी हल्लींची नवी व्यवस्था पसंत असेल असें मला वाटत नाहीं. हेदजाजचा राजा व एमिर्-फीजल हे कोण आहेत ? अरबांनीं त्यांना राजा किंवा सरदार म्हणून निवडलें आहे काय ? अरबस्तान, थ्रेस व स्मर्ना येथील लोकांना नवी व्यवस्था पसंत नाहीं अशीं चिन्हें आतांच दिसूं लागलीं आहेत. त्यांना तुर्की अंमल आवडत नसेल. पण नवी व्यवस्था त्यांना त्याहूनहि कमी आवडत आहे. अरबांना स्वतंत्रपणें तुर्कांशीं नवा करार करून बिघड-लेली घडी पुनः नीट बसवितां आली असती; पण म्यांडेटचें तत्त्व त्यांच्या आड आलें आहे. यापेक्षां अरबांना स्वराज्य देण्याबद्दल तुर्कस्थानजवळून योग्य ग्यारंटी घेऊन त्याचें अधि-राज्य त्यांच्यावर राहूं दिलें असतें तर ती व्यवस्था अधिक समाधानकारक झाली असती. (यं. इं. ७।७।२० )

त० भा०—आजकाल वर्तमानपत्रांतून या खिलाफती-संबंधाच्या लेखांतून व भाषणांतून हिजारत व महजरीन हे

शब्द वारंवार वापरलेले दृष्टीस पडतात. त्यांचा अर्थ काय आहे ?

म०---हे दोन्ही अरबी भाषेंतून आलेले शब्द आहेत. हिजारत म्हणजे सोडून जाणें, आणि महजरीन म्हणजे आपल्या धर्माचें रक्षण होत नाहीं म्हणून देशत्याग करणारे. या खिलाफतीच्या प्रश्नासंबंधांत सरकारनें ठेविलेलें वर्तन हिंदुस्थानांतल्या लक्षावधि किंबहुना कोट्यवधि मुसलमानांना अतिशय दुःखदायक झालेलें आहे. कित्येकांना तर तें इतकें असह्य वाटतें कीं अशा राज्यांत राहणें नको असें वाटून ते हिंदुस्थानदेश सोडून शेजारच्या मुसलमानी राज्याकडे—अफगाणिस्तानाकडे—जाऊं लागले आहेत. आज पिढ्यान्‌पिढ्या ज्यांनीं या देशांत घरेंदारें बांधून आणि शेतवाडी व उद्योगधंदे करून कायमची वस्ती केली, त्यांच्यावर हा देश सोडून जाण्याचा दुर्धर प्रसंग यावा याहून अधिक दुःखाची गोष्ट कोणती असेल ? पण धर्मनाश झालेला पाहण्यापेक्षां कोणताहि ऐहिक नाश झालेला पतकरला अशा समजुतीनें हजारों लोक तो स्वीकारण्यास व देशत्याग करण्यास तयार झाले आहेत. शौकत अलीसारख्या एकट्यादुकट्या धर्मवेड्या माणसाच्या उपदेशाचा हा परिणाम आहे असें समजणें ही चूक आहे. हे लोक येवढा स्वार्थत्याग करण्यास जे तयार झाले आहेत ते उगाचच नाहींत. त्यांच्या धार्मिक भावना सरकारच्या कृत्यानें दुखविल्या गेल्या आहेत हें त्याचें कारण

आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांना अजून आपली चूक दिसून येत नाहीं, आणि तिची दुरुस्ती त्यांच्या हातून होत नाहीं हें दुर्दैव म्हटलें पाहिजे (यं. इं. २१।७।२० च्या आधारें)

त० भा०——तुर्कस्थानच्या सुलतानाचा हिंदुस्थानांतल्या मुसलमानांशीं येणारा संबंध केवळ धार्मिक स्वरूपाचा आहे. असें असतां त्याच्या ऐहिक सत्तेला कांहीं उणेपणा येऊं नये म्हणून मुसलमानांनीं येवढें अकांडतांडव करावें हें रास्त दिसतें काय? समजा, तुर्कस्थानचें राज्य राष्ट्रसंघानें अबाधित ठेवलें तर त्या राज्याची व्यवस्था, कायदे वगैरे करण्यांत सुलतान हिंदुस्थानच्या मुसलमानांच्या म्हणण्याप्रमाणें थोडाच वागणार आहे? मग मुसलमानांनीं तरी त्याची तळी येवढी कां उचलून धरावी?

म०——सुलतानाच्या केवळ ऐहिक सत्तेचाच प्रश्न असता तर तुमचें म्हणणें बरोबर म्हटलें असतें. पण सुलतान हा मुसलमानांचा धर्माध्यक्ष (खलीफा) आहे, आणि त्याचा मानमरातब वगैरे राहण्यासाठीं त्याच्या हातांत ऐहिक सत्ताहि असणें अवश्य आहे. ती सत्ता कमी झाली तर त्याच्या मानमरातबांत व अधिकारांत कमीपणा येणारच, व आपल्या धर्मगुरूचा तो अपमान आहे असें मुसलमानांना वाटणें स्वाभाविक आहे. शिवाय सुलतानाचा मुलुख दुसऱ्याच्या हातांत गेल्यावर त्यांतील धर्मस्थानें व धर्म संस्था यांना धोका पोंचण्याचा संभव आहे. आणि तुमच्या धर्मस्थानांचें पूर्ण

संरक्षण करूं असें जें इंग्रज मुत्सद्यांनीं युद्धाचे वेळीं मुसलमानांना आश्वासन दिलें होतें त्यासहि तुर्कस्थानच्या राज्याचे तुकडे तुकडे केल्यानें बाध येतो. तुर्कस्थानच्या राज्यव्यवस्थेंत आपला हात असावा असें मुसलमान मागतच नाहींत. त्यांचें मागणें केवळ धर्मरक्षणापुरतें आहे. पण हें धर्मरक्षण सुलतानाची ऐहिक सत्ता व अधिकार यांच्याशीं पूर्णपणें संबद्ध असल्यामुळें ती सत्ता व ते अधिकार कायम राहावे, व ब्रिटिश सरकारच्या वचनावरचा मुसलमानांचा विश्वास उडेल असें कृत्य त्या सरकारनें करूं नये असें मुसलमान आग्रहानें सरकारला विनवितात यांत ते कांहीं गैरकृत्य करीत आहेत असें मला वाटत नाहीं.

त० भा०—खिलाफतीच्या प्रश्नासंबंधानें हिंदुस्थानांतले मुसलमान निष्कारण आपल्या डोक्याला त्रास करून घेत आहेत. त्यांनीं आपलें म्हणणें ब्रिटिशसरकारला कळवावयाचें तें केलें. आतां मुसलमानांनीं स्वस्थ बसावयास पाहिजे होतें. शिवाय, हा जर मुसलमानांचा धार्मिक पश्न आहे तर हिंदूंनीं त्यांत कशाला पडावें? इस्लाम आणि खिस्ती यांच्या मधल्या झगड्यांत हिंदूंनीं इतक्या आवेशानें पडण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं.

म०—हिंदूंनीं मुसलमानांशीं कोणत्या कामांत व किती अंशानें मिळावें याबद्दलचा हा प्रश्न आहे. मुसलमानबंधूंचा पक्ष जर वाजवी आहे, व त्यांचा हेतु व साधनें शुद्ध आहेत,

तर त्यांच्या मनाला लागून राहणाऱ्या महत्त्वाच्या बाबतींत न्याय मिळविण्याच्या कामीं अखेरपर्यंत मदत करणें हें हिंदूंचें कर्तव्य आहे असें मी समजतों. खिलाफतीचा प्रश्न धार्मिक आहे खरा; पण हिंदूंवर उद्या तसाच प्रसंग गुजरणार नाहीं कशावरून ? आज मुसलमानबंधूंवर जो प्रसंग गुजरला आहे, त्यासारखा प्रसंग उद्या हिंदुधर्मासंबंधानें कांहीं प्रश्न उपास्थित होऊन आपणांवर गुजरणार नाहीं अशी खात्री कोण देईल? यासाठीं हिंदु व मुसलमान या दोघांनींहि हा प्रश्न आपलाच आहे असें समजून अन्याय दूर करवून घेण्यासाठीं झटणें अवश्य आहे. (न. जी. ६।६।२०)

## २४ असहकारिता.

त० मा०—सरकारी अधिकाऱ्यांशीं असहकारिता ठेवावयाची म्हणजे त्यांना कोणत्याहि प्रकारें प्रजेनें मदत करावयाची नाहीं असा अर्थ मी समजतों. सरकारी अधिकाऱ्यांवर इतका रोष काय म्हणून करावयाचा ? तो करण्यापासून प्रजेला कोणता फायदा होणार ? असहकारिता करणें म्हणजे सुयंत्रित राज्यव्यवस्थेची घडी मुद्दाम बिघडवून आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखें अविचाराचें कृत्य आहे असें नेमस्त अथवा प्रागतिक पत्रें म्हणत आहेत.

या त्यांच्या म्हणण्यांत पुष्कळ अर्थ आहे असें कोणालाहि वाटेल. आपणांस तसें वाटून आपण ही चळवळ कां सोडून देत नाहीं ?

म०—आपल्या या व यासारख्या दुसऱ्या प्रश्नांचीं सविस्तर उत्तरें द्यावयाचीं म्हणजे मला कलकत्त्याच्या स्पेशल कांग्रेसपुढील माझ्या भाषणाची पुनरुक्ति करावी लागेल. त्यापेक्षां तुम्ही प्रथम तें माझें भाषण वाचून मग तुम्हांला ज्या शंका येतील त्या विचाराल तर अधिक सोयीचें होईल. (नवजीवन पत्राचा अंक तरुणभारतापुढें टाकून) हा अंक घ्या. त्यांत माझें साग्र भाषण दिलेलें आहे तें वाचून पहा आणि मग मला प्रश्न विचारा.

[ हें भाषण या पुस्तकाचे शेवटीं परिशिष्टाच्या रूपानें दिलें आहे तें पहा. ]

त० भा०—तें मीं वाचिलें आहे. त्याची पुनरुक्ति करावयास लावून आपला अमूल्य वेळ घ्यावा अशी माझी बिलकुल इच्छा नाहीं. आपल्या त्या भाषणांत ज्याचा खुलासा नीटसा झालेला नाहीं असेच प्रश्न मी आपणास विचारतों. मग तर झालें ?

म०— त्याला माझी बिलकुल ना नाहीं. तुम्हांला विचारावयाचें असेल तें खुशाल विचारा. मी त्याचीं यथामति उत्तरें देण्यास मुळींच कंटाळणार नाहीं.

त० भा०—असहकारितेची चळवळ कितीहि शांतपणानें चालविली तरी तिचें स्वरूप सरकारविरुद्ध उभारले-

त्या बंडासारखें आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. यावर आपलें काय उत्तर आहे?

म०—असहकारिता म्हणजे बंडखोरपणा आहे असें मला वाटत नाहीं. कारण कीं, तींत अत्याचाराचा लेशहि नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांच्या विरुद्ध केलेली प्रत्येक चळवळ म्हणजे बंड असाच अर्थ घेतला तर दुसऱ्याहि पुष्कळ चळवळी बंडें समजावीं लागतील.

त० भा०—गतवर्षीच्या अनुभवावरून हें दिसून आलें कीं अशा चळवळींत लोकांच्या उत्साहावर व अत्याचाराविषयींच्या प्रवृत्तीवर नियंत्रण घालणें जितकें अवश्य आहे तितकें अशक्यहि आहे. मग त्या अनुभवापासून धडा कां घेत नाहीं?

म०—गतवर्षी कांहीं थोड्या ठिकाणीं शोचनीय अत्याचार घडले हें मला दुःखानें कबूल केलें पाहिजे. पण असे प्रकार फार थोड्या ठिकाणीं घडले. एकंदरीनें देश शांतच होता. घडलेल्या अत्याचारांनाहि स्थानिक गोष्टी कारण झाल्या होत्या. झाली इतकीसुद्धां गडबड व्हावयास नको होती हें मीं कबूल करतों. माझा अंदाज चुकला होता व त्याबद्दल मी योग्य प्रायश्चित्तहि केलें. हा कटु अनुभव आला असतांहि सत्याग्रहासारख्या अनुपम शस्त्राच्या सामर्थ्याविषयींची माझी श्रद्धा यत्किंचित्‌हि कमी झालेली नाहीं. गतवर्षींच्या सारखी चूक यंदा होऊं नये म्हणून शक्य तेवढी

खबरदारी घेण्यांत आली आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या भीतीमुळें सत्याग्रही आपल्या धर्माप्रमाणें वागण्यास चुकावयाचा नाहीं. त्याला त्याची स्वतःची चूक नडत नाहीं, लोकांच्या चुका नडतात. इंग्रज मित्रांशीं केलेल्या खाजगी संभाषणांत त्यांनीं मला सांगितलें आहे कीं शांति ठेवण्याच्या उपदेशामुळें—शांति ठेवल्यापासून व्यावहारिक उपयोग किती आहे हें लोकांच्या नजरेस आणून दिल्यामुळें--खिलाफतीच्या चळवळींतला तुफानी अंश पूर्णपणें काबूंत ठेविला गेला आहे. (न. जी. ६।६।२० )

त० भा०——असहकारिता ही एकंदरींत धोक्याचीच आहे. नाहीं काय?

म०——होय. ही गोष्ट मलाहि कबूल आहे. पण आणीबाणीच्या प्रसंगीं कांहीं न करतां स्वस्थ पडून राहण्यांत जो धोका आहे त्यापेक्षां असहकारितेंत तो कमी आहे. आपण कांहीं न करतां स्वस्थ बसणें म्हणजे अत्याचाराला पाचारण करण्यासारखेंच आहे.

त० भा०——आपण इंग्रजाचे मित्र व ब्रिटिश राज्यपद्धतीचे मोठे चहाते म्हणविणारे असतां इंग्रजांविषयीं दुष्ट बुद्धि धारण करणाऱ्या मुसलमान लोकांच्या खिलाफतीच्या चळवळीला जाऊन मिळालां याबद्दल पुष्कळांना मोठें नवल वाटत आहे. हें कसें झालें याचा कांहीं खुलासा कराल काय?

म०——मला प्रथम ही गोष्ट मोठ्या दुःखानें कबूल करावी लागते कीं सामान्य प्रतीच्या मुसलमानांचे ठायीं

इंग्रजाविषयीं विशेषसें प्रेम दिसून येत नाहीं. याला कांहीं योग्य कारणें आहेत असें त्यांला वाटतें. मी इंग्रजांचा मित्र आहें तसा मुसलमान देशबंधूचाहि आहे. आणि देशबंधुत्वाच्या नात्यामुळें त्यांचा माझेवर ज्यास्तच हक्क आहे. मी अहिंसावादी धर्माचा–हिंदू–आहे. मला कोणी राज्य देऊं केलें तरी मी इंग्रजाच्या जिवाला धक्का लागूं देणार नाहीं. मी त्यांच्याशीं सहकारिता ठेवणार नाहीं इतकेंच. सरकारनें केलेल्या अन्यायांत मी अंग ठेवणार नाहीं. मि. विल्यम स्टेड यानीं बोर–युद्धाचे वेळीं इंग्रजांना पराभव प्राप्त झाल्याबद्दल सार्वजनिक प्रार्थना करविल्या होत्या. कारण, त्यांचें राष्ट्र अन्यायाच्या युद्धांत गुंतलें आहे अशी त्यांची समजूत झालेली होती. सध्याचे मुख्य प्रधान हेहि त्या युद्धाला विरोध करणारे होते व त्यांनीं सरकारच्या मार्गांत शक्य तेवढ्या अडचणी घातल्या होत्या. पुष्कळ मुसलमान लोकांत इंग्रजांविषयीं प्रेम वसत नाहीं. तरी मी त्यांला मिळालों आहें तो इंग्रजांचा मित्र म्हणूनच मिळालों आहें. न्याय मिळविणें हा माझा उद्देश आहे, आणि दुःख भोगण्याची तयारी ठेवून केलेल्या प्रामाणिकपणाच्या निश्चयाकडे ब्रिटिश सरकार लक्ष देतें हें मी दाखविणार आहें. सत्याग्रहाची फलद्रूपता दाखविणें, हिंदु–मुसलमानांची एकी करून देशांत शांतता स्थापित करणें, व इंग्रजाविषयीं ज्यांच्या मनांत दुष्टबुद्धि आहे त्यांच्या मनांत त्यांच्याविषयीं प्रेम उत्पन्न करणें या तीन गोष्टी मला

एकदम साधावयाच्या आहेत. प्रयत्न करणें आपल्या हातीं आहे, यश देणें न देणें परमेश्वराच्या आधीन आहे. हे तिन्ही उद्देश थोर नाहींत असें कोण म्हणेल? (यं. इं. ५।५।२०)

त० भा०—सर नारायण चंदावरकरे प्रभृति मंडळीनें असहकारितेपासून लोकांना परावृत्त करण्यासाठीं एक पत्रक काढलें आहे, व असहकारितेची चळवळ धर्मशास्त्राच्या वचनांनीं व इतिहासांतल्या उदाहरणांनीं निषिद्ध ठरविण्याचा यत्न केला आहे. त्यावर आपलें काय उत्तर आहे?

म०—मीं तें पत्रक अतिशय काळजीपूर्वक वाचिलें आहे. त्यांत असहकारितेविरुद्ध कांहीं सबळ प्रमाणें पाहण्यास मिळतील अशी माझी मोठी अपेक्षा होती; पण ती व्यर्थ झाली, आणि धर्मशास्त्र व इतिहास यांचा न कळत विपर्यास केलेला मात्र आढळला. पत्रक म्हणतें कीं आपलीं धर्मतत्त्वें व परंपरा यांनीं—किंबहुना मनुष्य जातीचें तारण व उद्धार करणाऱ्या सर्व धर्मांनीं—असहकारितेचा निषेधच केलेला आहे. मी म्हणतों कीं ज्ञान व अज्ञान—न्याय आणि अन्याय—सुष्टपणा आणि दुष्टपणा—यांच्यामध्यें असहकारिताच असली पाहिजे अशी गीतेची शिकवण आहे. अर्जुनाचा पक्ष न्यायाचा होता व तो कौरवांच्या अन्यायाच्या पक्षाशीं घनघोर युद्ध करीत होता हेंच गीतेंत आहे. तुळशीदासजींनींहि असंतांपासून दूर राहण्याविषयीं संतांना उपदेश

केला आहे. झेंदावेस्तामध्यें आहुरमज्द व अहरिमान यांच्यांत तडजोड शक्य नाहीं, त्याच्यांत कायमचें द्वंद्व आहे, असें दाखविलें आहे. बायबलच्या मतें असहकारिता त्याज्य आहे असें म्हणणें म्हणजे निःशस्त्र प्रतिकार करणाऱ्या व सत्य-पालनासाठीं पितापुत्रांचा विच्छेद करणाऱ्या येशू खिस्ताला आपण चांगलें ओळखलें नाहीं असें दाखविण्यासारखेंच आहे. आणि महंमद पैगंबरानें काय केलें? हेंच. जोंपर्यंत मक्केंत जिवाला धोका घडण्याची भीति नव्हती तोंपर्यंत असहकारिता केली आणि आपण व आपले शिष्य व्यर्थ प्राणांस मुकूं असें वाटल्यावर मक्का सोडून ते मेदिना येथें गेले व विरुद्ध पक्षाला तोंड देण्याचें सामर्थ्य प्राप्त झाल्यावर ते परत मक्केला आले. न्यायी राजाशीं व माणसांशीं सह-कारिता ठेवणें हें जसें सर्व धर्मांत कर्तव्य म्हणून सांगितलें आहे तसें अन्यायी माणसाशीं असहकारिता ठेवणें हें कर्तव्य सांगितलें आहे. आपल्या हिंदुधर्मांतली परंपरा पाहिली तर तीहि अशीच दिसते. प्रल्हाद यानें बापाचा, मिराबाईनें पतीचा, आणि भीष्मानें आपल्या दुष्ट बंधूचा त्याग केला होता.

त० भा०—पण या पौराणिक कथा झाल्या. त्यांत सत्य कितपत आहे कोणास ठाऊक? अशी शंका लोक घेतात. म्हणून अलीकडच्या काळांतलीं कांहीं ऐतिहासिक उदा-हरणें पाहिजेत.

म०—अर्वाचीन इतिहासांतलीं उदाहरणेंहि दाखवितां येतील. अगदीं ताजें उदाहरण म्हणजे जनरल बोथा यांचें

आहे. जनरल बोथा यांनीं लॉर्ड मिल्नर यांच्या कौंसिलावर बहिष्कार घालून आपल्या देशासाठीं पूर्णपणें समाधानकारक व्यवस्था घडवून आणिली. रशियाचे दुखोबूर लोकांनीं असहकारितेचा बाणा ठेविल्यामुळें ते लोक थोडे होते तरी त्यांच्या दुःखांनीं साऱ्या सुधारलेल्या जगाच्या मनाला चटका लाविला. शेवटीं कानडानें त्यांना राहण्यास जागा दिली व तेथें ते आतां सुखानें नांदत आहेत. हिंदुस्थानांतहि कित्येक लहान संस्थानांतून गांजलेल्या प्रजेनें असहकारिता करून राज्यकर्त्यांना वठणीवर आणिलें आहे. असहकारिता व्यवस्थितपणें चालविलेली फसली असें एकहि उदाहरण मला ठाऊक नाहीं. ( यं. इं. ४।८।२० )

त० भा०—विद्यार्थ्यांनीं सरकारी व निमसरकारी शाळा सोडणें हें असहकारितेचें एक अंग म्हणून आपण सांगितलें. पण या संबंधांत निरनिराळ्या प्रकारच्या शंका लोक काढीत आहेत. त्यांचें उत्तर आपण कृपाकरून द्यावें. पहिली शंका ही कीं शाळा सोडून देऊन घरीं बसणें म्हणजे शिक्षणाला मुकणें—आत्मघात करून घेणें—होय. विद्यार्थ्यांनीं स्वार्थत्याग करावा हें म्हणणें बरोबर आहे; पण शाळा सोडून साऱ्या जन्माचें नुकसान करून घ्यावें कीं काय ?

म०—सरकारी व निमसरकारी शाळांतून व कॉलेजांतून मिळणारें शिक्षण नीतिदृष्ट्या विषमिश्रित असतें. व्यवहारांतहि त्या शिक्षणाचा कांहीं उपयोग होत नाहीं हें आपण पाहतों.

मग असें शिक्षण घेण्यापेक्षां रिकामे राहण्यानें काय नुकसान होणार आहे ? अन्याय करणारांचे हातून शिक्षण न घेण्याचें ठरविणें हेंच स्वतः उत्तम शिक्षण आहे. विद्यार्थ्यांनीं शाळा सोडल्यास त्यांच्या उत्तम प्रकारच्या शिक्षणाची कांहीं सोय पुढाऱ्यांना करावीच लागेल, व गरज येऊन भिडली म्हणजे ते राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा त्वरेनें काढतील. तोंपर्यंत कांहीं दिवस शिक्षणावांचून काढावे लागले तरी हरकत नाहीं. आपद्धर्म म्हणून कांहीं स्वार्थत्याग केलाच पाहिजे. स्वार्थत्यागावांचून कोणतेंहि महत्कार्य होत नसतें.

त० भा०—विद्यार्थ्यांनीं शाळा व कॉलेजें सोडलीं तरी त्याचा सरकारवर काय परिणाम घडणार आहे ?

म०—येथें सरकारवर परिणाम घडेल कीं नाहीं हा मुख्य मुद्द्याचा प्रश्न नाहीं. पण अन्याय करणारांकडून शिक्षणरूपी मदत घ्यावयाची कीं नाहीं हा माझे मतें महत्त्वाचा प्रश्न आहे. आपण आपला मान राखून घेतला पाहिजे. जे विद्यार्थी किंवा मुली शाळा व कॉलेजें सोडतील त्यांनीं आपलें कर्तव्य केलें व देशाची सेवा केली असें होईल. एकानें जरी अशी सेवा केली तरी तिचा परिणाम होऊं शकेल.

त० भा०—कित्येक लोक असें म्हणणारे आहेत कीं आमच्या लोकांना शिक्षण मिळावें अशी सरकारची खरोखर इच्छाच नाहीं. अशा स्थितींत मुलांनीं शाळा सोडली म्हणजे सरकारच्या इच्छेप्रमाणें वागल्यासारखेंच होणार आहे. या शंकेवर आपण काय उत्तर द्याल ?

म०—विद्यार्थ्यांनीं शाळा सोडावी अशी सरकारची इच्छाच नाहीं अशी माझी समजूत आहे. सरकारी किंवा निमसरकारी शाळांतून मुलें शिकत राहावीं व आपली हुकुमत त्यांचेवर सतत चालू रहावी ही त्यांची इच्छा. मग मुलांनीं शाळा सोडणें त्यांना कसें आवडेल? पण आपणांस त्यांच्या आवडी नावडीकडे पाहावयाचें नाहीं. आपण आपलें कर्तव्य ओळखून तें पाळिलें पाहिजे.

त० भा०—पण आईबापांची तशी इच्छा नसली तर मुलांनीं काय करावें?

म०—नम्रतापूर्वक व विनयपूर्वक त्यांच्याशीं बोलून त्यांची समजूत घाला. आपण त्यांची आज्ञा पाळिली पाहिजे हें विसरूं नका; पण जेथें त्यांची आज्ञा अयोग्य दिसेल तेथें विनयपूर्वक तिचा अनादर करा.

त० भा०—राष्ट्रीय शाळा सरकारनें राजद्रोही ठरविल्या तर काय करावयाचें?

म०—राष्ट्रीय शाळा सरकारला बंद करतां येत नाहींत. सरकारी शाळा सोडून आपापल्या घरीं जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, किंवा स्वयंसेवकांना सरकारला मनाई करतां यावयाची नाहीं.

त० भा०—पण वंगभंगाच्या वेळच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळी प्रमाणें आतांचीहि चळवळ निष्फळ होणार नाहीं कशावरून?

मं०---त्या वेळच्या चळवळींत दोन तीन न्यूनें होतीं तीं आतां भरून काढलीं पाहिजेत. पहिलें व्यंग हें कीं त्यावेळीं सरकारी शाळांतून मुलांना काढण्याचे प्रयत्न झाले नाहींत. व दुसरी गोष्ट, पुढाऱ्यांनीं आपल्या मुलांना त्या शाळांतच ठेविल्यामुळें लोकांना त्यांचा विश्वास वाटला नाहीं. हीं दोन्ही व्यंगें आतां बऱ्याच अंशानें भरून काढण्याची तजवीज चालली आहे. मला विद्यार्थी शाप देतील; पण ते घेण्यास मी तयार आहें. ज्या माणसाला देशाची सेवा करावयाची आहे त्यानें या गोष्टींची अगोदरपासूनच तयारी ठेविली पाहिजे. व जे प्रसंग येऊन पडतील ते सोसण्यास पुढें झालें पाहिजे.

---

## २५ एका वर्षांत स्वराज्य !


त० भा०---मी आतां जें विचारणार आहे तें लहान तोंडीं मोठा घास घेण्यासारखें होईल. पण त्याबद्दल क्षमा मागून मी विचारतों कीं कलकत्त्याच्या स्पेशल कांग्रेसपुढें भाषण करतांना आपण सांगितलें कीं माझ्या असहकारितेच्या कार्यक्रमाला लोकांकडून पुरेसें उत्तेजन मिळाल्यास एका वर्षांत स्वराज्याची प्राप्ति होईल. ही गोष्ट उघडउघड अतिशयोक्तीची दिसते. आपलें खरोखरच असें मत आहे ? कां लोकांना आपल्या बाजूला वळविण्यासाठीं ही युक्ति केलेली होती ? आपल्या या वाक्यांत ' जर.....तर ' असे संके-

तार्थी शब्द घालण्याची खबरदारी आपण घेतली आहे. पण अशा रीतीनें कोणतीहि अशक्य गोष्ट शक्य आहे असें प्रस्थापित करतां येईल. नाहीं काय?

म०—माझ्या बोलण्यावर जर तुमचा विश्वास असेल तर मी हें प्रामाणिकपणानें सांगतों कीं माझें बोलणें अतिशयोक्तीचें नाहीं किंवा फसवणुकीचेंहि नाहीं. मी नीट अंदाज करूनच तें वाक्य उच्चारलें होतें. मीं ज्या अटी सांगितल्या त्या पूर्ण झाल्याशिवाय स्वराज्य मिळणें ही अगदीं अशक्य गोष्ट आहे. स्वराज्य म्हणजे इंग्रजांच्या साह्यावांचून आपला कारभार आपण स्वतः स्वतंत्रपणानें पाहण्याची स्थिति. आपण इंग्रजांच्या बरोबरीचे आहों अशी भावना जागृत झाल्याशिवाय व खरोखर त्यांच्या बरोबरीची पात्रता अंगीं असल्यावांचून स्वराज्य होऊंच शकत नाहीं. आज आपल्या देशाची अंतर्बाह्य सुरक्षितता, शिक्षण व रोजच्या गरजा भागविणें यासाठीं, फार काय पण धर्मसंबंधीं तंटे मिटविण्यात सुद्धां आपणास दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावें लागत आहे. राजेरजवाड्यांना त्यांच्या अधिकारासाठीं व लक्षाधीशांना आपल्या रुपयांच्या तोड्यांसाठीं इंग्रजांवर अवलंबून राहावें लागत आहे. इंग्रजांना ही गोष्ट पूर्णपणें ठाऊक आहे व सर टॉ. हॉलंडसारखे अधिकारी या गोष्टीवरून असहकारिता ठेवणारांच्या चेष्टा करूं लागले आहेत. म्हणून ही परावलंबिता अगोदर दूर केली पाहिजे. काम फारच कठीण आहे.

पण ईतापनीतींतली एक गोष्ट लक्षांत ठेवा. सिंहाचा एक छावा लहानपणापासून बकऱ्यांच्या संगतींत वाढलेला होता. त्यामुळें त्याला आपण खरोखर बकराच आहों असें वाटून तो अगदीं दीन बनला होता. त्या सिंहाच्या छाव्याप्रमाणें पुष्कळांना नेहमींच्या संवयीमुळें असा भ्रम होत असतो. त्यांना स्वतःच्याच शक्तीचें बरोबर ज्ञान नसतें. आपणास परावलंबी स्थितींतून इंग्रज वर काढतील अशी अपेक्षा करतां येत नाहीं. उलट, क्रमाक्रमानें जातां जातां तुम्हांला स्वराज्याची पात्रता येईल हाच मंत्र ते सदासर्वदा आपणांस सांगणार. टाइम्ससारखीं पत्रें त्या मंत्रांत लबाडीनें केलेल्या विधानांची आणखी भर टाकतील. कितीहि चांगली राज्यव्यवस्था परकीयांनीं ठेविली तरी तिला स्वराज्याची सर यावयाची नाहीं. ज्याच्या अंगांत जोर आहे तोच हल्लींच्या काळीं पाश्चात्यांच्या समजुतीप्रमाणें स्वराज्याला पात्र ठरतो. जर्मन कां हरले ? त्यांचा पक्ष अन्यायाचा होता यामुळेंच केवळ नव्हे, तर दोस्त-राष्ट्रांच्या अंगांत अधिक पशु-शक्ति होती म्हणून. तेव्हां एकंदरींत हिंदुस्थानाला युद्धकला शिकून तयार झालें पाहिजे, ( पण ती कला इंग्रज शिकविणार नाहींत ) किंवा असहकारितेच्या द्वारें आत्मसंयमन व आत्मत्याग करण्यास तयार झालें पाहिजे. आज पांच चार लक्ष इंग्रज तीस कोटि हिंदी प्रजेवर राज्य करतात ही गोष्ट जितकी नवल वाटण्यासारखी आहे, तितकीच ती आपणास खालीं माना

घालण्यास लावणारी आहे. इंग्रज आपल्यावर राज्य करीत आहेत तें अंशतः शस्त्रांच्या जोरावर तर खरेंच, पण शेकडों तऱ्हांनीं आपली सहकारिता मिळवून व आपणास परावलंबी व दीन करून त्यांनीं राज्य चालविलें आहे असें दिसून येईल. सुधारलेलीं कौंसिलें, न्यायाचीं कोर्टें, व खुद्द गव्हर्नराच्या जागा खरी खरी सत्ता आपल्या हातांत देतील असें समजणें चुकीचें आहे. उलट, आपणांस निःसत्त्व करणाऱ्या या गोष्टी आहेत. इंग्रजांना त्यांच्या साम्राज्यविषयक तृष्णेच्या शांतीसाठीं हिंदुस्थानचें मनुष्यबळ व पैसा पाहिजे आहे. तीं त्यांना देण्याचें आपण नाकारलें म्हणजे स्वराज्य, समानाधिकार, व मर्दपणा हीं आपणांस प्राप्त होतील. आत्मत्यागानें—आत्मशुद्धीनें—हें ध्येय प्राप्त करून घेण्याची गोष्ट हिंदुस्थानच्या आटोक्यांतली आहे. हें कार्य असहकारितेनेंच घडून येईल. म्हणून मी म्हणतों कीं मीं सांगितलेल्या अटी पूर्णपणें पाळल्या जाईपर्यंत स्वराज्य मिळणार नाहीं. एक वर्षभर आपण आत्मसंयमन, आत्मत्याग, शिस्त राखण्याचें कौशल्य, परस्परांविषयीं विश्वास व धैर्य या गोष्टी करीत राहिलों, आणि लोकमत तयार केलें, तर एका वर्षांत स्वराज्य खात्रीनें मिळेल. पण या अटी पाळल्या नाहींत, तर स्वराज्य न दिल्याबद्दलचा दोष इंग्रजाकडे येणार नाहीं, आपल्याचकडे येईल. (यं. इं. २२।९।२०)



# परिशिष्ट.

[ कलकत्त्याच्या स्पेशल कांग्रेसपुढें असहकारितेसंबंधाच्या ठरावावर म. गांधी यांनीं केलेलें भाषण व त्या भाषणावर आक्षेप घेणारांस दिलेलीं उत्तरें. ]

स्पेशल कांग्रेसपुढें असहकारितेचा ठराव मांडतांना म० गांधी यांनीं आरंभींच सांगून टाकिलें कीं, हा ठराव फार गंभीर स्वरूपाचा व कांग्रेसच्या आजपर्यंतच्या धोरणांत क्रांति करणारा आहे, व हा ठराव मंजूर झाल्यास आपल्या सध्याच्या अडचणींत मोठी भर पडून मोठी जबाबदारी आपल्या अंगावर येणार आहे. अशा ठरावावर बोलणाराच्या व्यक्तित्वाकडे न पाहतां नीट विचार करून निर्णय ठरवा. असें बजावल्यानंतर महात्माजी म्हणालेः—

एकदाचा ठराव केला म्हणजे सुटका झाली असें नाहीं. प्रत्येक माणसानें ठरावांतलें जें जें कलम आपणांस लागूं पडत असेल तें तें अंमलांत आणिलें पाहिजे. मी विनंति करितों कीं, आपण माझें भाषण शांतपणें ऐकून घ्यावें. टाळ्या वाजवूं नका आणि हुर्योही करूं नका. व्यक्तिशः मला या गोष्टीचा कांहीं विधिनिषेध वाटत नाहीं; पण टाळ्यांच्या योगानें विचारांचा प्रवाह अडकतो व टाळ्या आणि हुर्यो यांच्यामुळें वक्ता आणि श्रोते यांच्यामधली एकतानता तुटते. म्हणून तुमचे स्वतःचे विचार कसेहि असले तरी वक्त्याला हुर्यो करून खालीं बसावयास लावूं नका. असहकारिता ही शिस्त आणि स्वार्थत्याग यांचें साधन

आहे, व विरुद्ध पक्षाचें मत धीरानें व शांततेनें समजून घेणें हें असहकारितेचें एक लक्षण आहे. पूर्व आणि पश्चिम यांच्याइतके विरुद्ध विचारसुद्धां परस्परांविषयीं सहिष्णुता ठेवून ऐकण्याची वृत्ति ठेवण्यास आपण शिकणार नाहीं तोंपर्यंत असहकारिता अशक्य राहील. जेथें क्रोधाचे फूत्कार निघत आहेत अशा वातावरणांत असहकारिता टिकणारच नाहीं. मला आलेल्या कटु अनुभवावरून क्रोधाला दाबून टाकण्यास मी गेल्या ३० वर्षांत शिकलों आहें. दाबून ठेवलेल्या उष्णतेच्या अंगां जशी शक्ति उत्पन्न होते, तशी दाबून ठेविलेल्या क्रोधापासूनहि अशी शक्ति निर्माण करतां येते कीं, ती साऱ्या जगाला हलवून सोडते. कांग्रेसला आलेल्या बंधूंना मित्रत्वाच्या नात्यानें मी असें विचारतों कीं, परस्परांविषयीं सहिष्णुता ठेवण्याचें जें शिक्षण अशा प्रसंगीं मिळतें त्याहून अधिक चांगलें शिक्षण दुसरीकडे कोठें मिळूं शकेल काय ?

मला असें सांगण्यांत येतें कीं, हा ठराव मांडून कांग्रेसमध्यें मोठी फूट पाडण्याचा माझा प्रयत्न आहे. कांग्रेस ही कोणाहि एका विशिष्ट पक्षाची संस्था नाहीं. कोणत्याही मतमतांतराला कांग्रेसचें व्यासपीठ खुलें असलें पाहिजे. आपला पक्ष लहान आहे म्हणून कोणींहि कांग्रेस सोडून जाण्याचें कारण नाहीं. आज नाहीं कालांतरानें आपण बहुमत आपल्या बाजूचें करून घेण्याची उमेद ठेविली पाहिजे. कांग्रेसनें अमान्य ठरविलेल्या कोणत्याही धोरणाला तिच्या नांवावर दडपून देतां येणार नाहीं. तुम्हीं माझें धोरण नापसंत ठरविल्यास मी कांग्रेसला सोडून जाणार नाहीं. माझ्या

विचाराला आज थोड्या लोकांची संमति मिळाली तर ती स्थिति बदलून बहुमत माझ्या बाजूचें होईपर्यंत मी आपलें विचार कांग्रेसपुढें मांडीत राहीन.

खिलाफत प्रकरणांत अन्याय घडला आहे याविषयीं तर मतभेदच नाहीं. कितीहि स्वार्थत्याग करावा लागला तरी तो करून जर मुसलमान स्वतःची लाज राखणार नाहींत तर त्यांना अब्रूनें राहताच येणार नाहीं, आणि महंमद पैगंब-राचा धर्म पाळतां येणार नाहीं.

पंजाबावर भयंकर प्रसंग गुजरला आहे, आणि ज्या दिवशीं एका पंजाब्याला पोटावर सरपटत चालण्याचा प्रसंग आला त्या दिवशींच सगळा हिंदुस्थान देश तसा चालला असें मानिलें पाहिजे. हिंदुस्थानच्या नांवाला लाज आण-ण्याची आपली जर इच्छा नसली, तर बेअब्रूचा हा कलंक धुऊन काढल्याशिवाय आपणांस गत्यंतरच नाहीं. या दोन गोष्टींसंबंधानें दाद लावून घेण्यासाठीं आपण आज कित्येक महिने चळवळ करीत आहों; पण अजून ब्रिटिश सरकार आपणांस वळत नाहीं. हिंदुस्थानचे लोक इतकी चळवळ केल्यावर—आपल्या रागाच्या व दुःखाच्या भावना व्यक्त केल्यानंतर—रागाचें पोकळ प्रदर्शन करूनच स्वस्थ बसतील काय? अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत पंजाबवरच्या घोर प्रसंगाचें जें दिग्दर्शन केलें त्याहून त्या प्रसंगाचें अधिक स्पष्ट शब्दचित्र आपण कोठें पाहिलें किंवा ऐकलें आहे काय? अशा स्थितींत नाखुष अधिकाऱ्यांना न्याय करण्यास भाग पाडिल्याशिवाय, रक्तानें भरलेल्या त्यांच्या हातून मोठाल्या देणग्या स्वीकारण्यापूर्वीं त्यांच्या मनाला खरोखर पश्चात्ताप

अहे, व विरुद्ध पक्षाचें मत धीरानें व शांततेनें समजून घेणें हें असहकारितेचें एक लक्षणच आहे. पूर्व आणि पश्चिम यांच्याइतके विरुद्ध विचारसुद्धां परस्परांविषयीं सहिष्णुता ठेवून ऐकण्याची वृत्ति ठेवण्यास आपण शिकणार नाहीं तों-पर्यंत असहकारिता अशक्य राहील. जेथें क्रोधाचे फूत्कार निघत आहेत अशा वातावरणांत असहकारिता टिकणारच नाहीं. मला आलेल्या कटु अनुभवावरून क्रोधाला दाबून टाकण्यास मी गेल्या ३० वर्षांत शिकलों आहें. दाबून ठेवलेल्या उष्णतेच्या अंगा जशी शक्ति उत्पन्न होते, तशी दाबून ठेविलेल्या क्रोधापासूनहि अशी शक्ति निर्माण करतां येते कीं, ती साऱ्या जगाला हलवून सोडते. कांग्रेसला आलेल्या बंधूंना मित्रत्वाच्या नात्यानें मी असें विचारतो कीं, परस्परांविषयीं सहिष्णुता ठेवण्याचें जे शिक्षण अशा प्रसंगीं मिळतें त्याहून अधिक चांगलें शिक्षण दुसरीकडे कोठें मिळूं शकेल काय ?

मला असें सांगण्यांत येते कीं, हा ठराव मांडून कांग्रेस मध्यें मोठी फूट पाडण्याचा माझा प्रयत्न आहे. कांग्रेस ही कोणाहि एका विशिष्ट पक्षाची संस्था नाहीं. कोणत्याही मत-मतांतराला कांग्रेसचें व्यासपीठ खुलें असलें पाहिजे. आपला पक्ष लहान आहे म्हणून कोणींहि कांग्रेस सोडून जाण्याचें कारण नाहीं. आज नाहीं कालांतरानें आपण बहुमत आप-ल्या बाजूचें करून घेण्याची उमेद ठेविली पाहिजे. कांग्रेसनें अमान्य ठरविलेल्या कोणत्याही धोरणाला तिच्या नांवा-वर दडपून देतां येणार नाहीं. तुम्हीं माझें धोरण नापसंत ठरविल्यास मी कांग्रेसला सोडून जाणार नाहीं. माझ्या

विचाराला आज थोड्या लोकांची संमति मिळाली तर ती स्थिति बदलून बहुमत माझ्या बाजूचें होईपर्यंत मी आपले विचार कांग्रेसपुढें मांडीत राहीन.

खिलाफत प्रकरणांत अन्याय घडला आहे याविषयीं तर मतभेदच नाहीं. कितीहि स्वार्थत्याग करावा लागला तरी तो करून जर मुसलमान स्वतःची लाज राखणार नाहींत तर त्यांना अब्रूनें राहताच येणार नाहीं, आणि महंमद पैगंबराचा धर्म पाळतां येणार नाहीं.

पंजाबावर भयंकर प्रसंग गुजरला आहे, आणि ज्या दिवशीं एका पंजाब्याला पोटावर सरपटत चालण्याचा प्रसंग आला त्या दिवशींच सगळा हिंदुस्थान देश तसा चालला असें मानिलें पाहिजे. हिंदुस्थानच्या नांवाला लाज आणण्याची आपली जर इच्छा नसली, तर बेअब्रूचा हा कलंक धुऊन काढल्याशिवाय आपणांस गत्यंतरच नाहीं. या दोन गोष्टींसंबंधानें दाद लावून घेण्यासाठीं आपण आज कित्येक महिने चळवळ करीत आहों; पण अजून ब्रिटिश सरकार आपणांस वळत नाहीं. हिंदुस्थानचे लोक इतकी चळवळ केल्यावर—आपल्या रागाच्या व दुःखाच्या भावना व्यक्त केल्यानंतर—रागाचें पोकळ प्रदर्शन करूनच स्वस्थ बसतील काय? अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत पंजाबवरच्या घोर प्रसंगाचें जें दिग्दर्शन केलें त्याहून त्या प्रसंगाचें अधिक स्पष्ट शब्दचित्र आपण कोठें पाहिलें किंवा ऐकलें आहे काय? अशा स्थितींत नाखुष अधिकाऱ्यांना न्याय करण्यास भाग पाडल्याशिवाय, रक्तानें भरलेल्या त्यांच्या हातून मोठाल्या देणग्या स्वीकारण्यापूर्वीं त्यांच्या मनाला खरोखर पश्चात्ताप

झालेला आहे कीं नाहीं हें पाहिल्याशिवाय, या प्रकरणांत आपली दाद लावून घेण्यास, आणि आपला नांवलौकिक व अब्रू राखण्यास कांग्रेसला दुसरा काय मार्ग आहे? याच कारणामुळें मी आपली असहकारितेची योजना तुमच्यापुढें मांडीत आहें, आणि हिच्या ऐवजी दुसऱ्या कोणत्याहि योजनेचा स्वीकार तुम्ही करूं नका असें आग्रहपूर्वक म्हणत आहें. स्वतःच्या योजनेविषयींच्या दुराग्रहानें हें मी तुम्हांस म्हणत नाहीं. माझ्या म्हणण्याचा मतलब इतकाच आहे कीं, खूप विचार केल्यानंतर माझ्या योजनेपेक्षां दुसरी एखादी योजना तुम्हांस सरस न दिसली तरच तुम्ही माझी योजना मंजूर करा. या योजनेला लोकांचें पाठबळ मिळालें आहे, आणि ती अंमलांत आणिली गेल्यास तुम्हांला एका वर्षांतच स्वराज्य मिळेल हें तुम्हांला पुनः सांगण्याची हिंमत मी करतों. या जंगी सभेनें हा ठराव मंजूर केला म्हणजे काम झालें असें नाहीं. दिवसेंदिवस जास्त जास्त उत्साहानें तो अमलांत येईल तरच तो फलद्रूप होईल. त्याबद्दलचा कार्यक्रम आपल्या देशाच्या स्थितीचा पूर्ण विचार करूनच ठरविला आहे. असहकारितेशिवाय दुसरा एक मार्ग लोकांपुढें होता, आणि तो म्हणजे तलवार उपसण्याचा. पण सध्या लोकांजवळ तलवारी नाहींत. जर असत्या तर मला वाटतें कीं, असहकारितेचा उपदेश त्यांनीं ऐकूनसुद्धां घेतला नसता. पण मी या लोकांना असें म्हणतों कीं, अत्याचाराच्या उपायानें नाखुष राजकर्त्यांच्या हातून न्याय मिळविण्याची तुमची इच्छा असली तरी त्या मार्गांतहि असहकारितेला अवश्य लागणाऱ्या गोष्टी म्हणजे शिक्षण व स्वार्थ-

त्याग यांच्यावांचून तुमचें चालावयाचें नाहीं. बेताल मेंढूच्या झुंडांनीं लढाई जिंकलेली मीं अजून कधीं ऐकिली नाहीं. पण आपापलें नाकें संभाळून हातावर शिर घेऊन लढणाऱ्या कवाइती फौजेनेंच लढाई जिंकल्याचें तुम्हीं सर्वांनीं पाहिलें आहे. ब्रिटिश सरकारशीं—इंग्रजलोकांशीं—किंबहुना एकंदर युरोपियनांशीं कायमचा निकाल लावणारी लढाई करावयाची झाली तरी आपणांस शिस्त व स्वार्थत्याग या गोष्टी शिकल्या पाहिजेत. त्या आपण शिकाव्या ही माझी इच्छा आहे. बुद्धिबळांत आपण त्यांच्या मागें नाहीं; तरी राष्ट्रीयत्वाच्या पायावर स्वार्थत्याग व शिस्त या गोष्टी बसविलेल्या आपल्यांत दिसत नाहींत. कौटुंबिक क्षेत्रांत मात्र दुनियेंत दुसऱ्या कोणामध्यें दिसत नाहीं इतकें शिस्त आणि स्वार्थत्याग यांचें शिक्षण आपण मिळविलें आहे. याच वृत्ति राष्ट्रीय व्यवहारांत आपण दाखवाव्या अशी मी आपणास विनंति करीत आहें. लोकांत प्रजाविषयक गोष्टींसंबधानें खराखरा उत्साह उत्पन्न झाला आहे कीं नाहीं—राष्ट्राच्या वेदीवर आपलें तनमनधन, स्त्रीपुत्र, आणि स्वतःचे सर्वस्व यांची आहुति देण्यास लोक तयार आहेत कीं नाहीं—हें पाहण्यासाठीं मी देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत हिंडत आहें. जर लोक तयार असतील तर याच क्षणीं तुमच्या हातांत स्वराज्य आणून देण्यास मी तयार आहें. पण लोक इतका आत्मयज्ञ करण्यास तयार आहेत काय ? शक्तिवान् आहेत काय ? मानाचे चांद, पदव्या, व हुद्दे सोडण्याची त्यांची तयारी आहे काय ? देशासाठीं लढाई करतांना मुलांचें पुस्तकी शिक्षण बुडालें तरी बेहेत्तर आहे असें म्हण-

णांस वाटतें तरी कसें ? लोकांनीं विदेशी मालावर बहिष्कार घालावा असें मी अवश्य इच्छित आहें. पण आतांच ती गोष्ट शक्य नाहीं हेंहि मी जाणतों. जोंपर्यंत सुईटांचणीसारख्या वस्तूसाठींसुद्धां परदेशाच्या तोंडाकडे आपणांस पहावें लागत आहे तोंपर्यंत परदेशी मालावर बहिष्कार घालणें ही अशक्य गोष्ट आहे. पण जर तुम्ही मुक्कामावर पोंचण्यासाठीं उतावळे झालां असाल, आणि पडेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार असाल, तर मी हें कबूल करीन कीं, परदेशी मालावर संपूर्ण बहिष्कार घालून दाखविल्यानें डोळ्यांचें पातें लवतें न लवतें इतक्या थोड्या अवधींत हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळवितां येईल. म्हणून या ठरावांत केलेली सुधारणा कांहीं अनमान न करतां मीं मान्य केली. त्याच्या योगानें माझ्या मूळच्या ठरावाच्या सौंदर्यांत थोडेंसें वैगुण्य आलें इतकेंच. माझ्या नम्र मताप्रमाणें ठरावांतले बहिष्कारासंबंधांचे शब्द कार्यक्रमाच्या समतोलपणाला बाधक आहेत. पण आतां मी जो उभा आहें तो चर्चेसाठीं पुढें आलेल्या कार्यक्रमाची वकीली करण्यासाठीं नाहीं. मीं लोकांच्या पुढें व्यावहारिक कार्यक्रम मांडिला आहे. आणि मी ही गोष्ट कबूल करतों कीं, परदेशी मालावर बहिष्कार घालण्याचें काम आपल्या हातून पार पडलें तर चांगला जोर मिळेल. बहिष्कार आणि स्वराज्य या दोन्ही गोष्टी तुम्हांस पसंत असतील तर त्या ठरावाच्या शेवटल्या प्यारिग्राफांत आहेतच.

शेवटीं माझी तुम्हांला येवढीच विनंति आहे कीं याविषयीं नीट विचार करून मत द्या. माझ्यासंबंधाचा व्यक्तिवि-

श्यक विचार सोडून द्या. मीं देशाची सेवा केली असेल तर तिचा विचार या प्रश्नाच्या विचाराच्या आड येऊं देऊं नका. मीं तुमच्यापुढें ठेविलेल्या कार्यक्रमांत कांहीं चूक नसेल असें मी म्हणत नाहीं मी इतकेंच म्हणतों कीं हा कार्यक्रम फार परिश्रमपूर्वक तयार केलेला आहे. त्यासाठीं फार विचार करण्यांत आला आहे, आणि तो व्यावहारिक स्वरूपाचा करण्याचा माझा निश्चय कायम ठेविलेला आहे; या गोष्टी तुम्ही जरूर लक्षांत घ्या. तुमच्याजवळ काम करणारी मंडळी आहे. या वेळीं हें धोरण केवळ विचारापुरतें भलें असो; पण हा माझा कार्यक्रम प्रत्यक्ष करून करणार हजारों इसम तुमच्या मागून येण्यास तयार आहेत.

---

## आक्षेपांस उत्तरें.

माझ्या ठरावावर घेण्यांत आलेल्या आक्षेपांस उत्तरें देणें माझें कर्तव्य आहे. भाई जमनादास यांचें म्हणणें तुम्हीं ऐकून घेतलें नाहीं याबद्दल मला फार दिलगिरी वाटते.

सगळे आक्षेप मीं चांगले लक्षपूर्वक ऐकिले आहेत, पण ते माझ्या गळीं उतरले नाहींत. मि. जिना व मि. दास म्हणतात कीं, माझा कार्यक्रम अव्यावहारिक आहे. मी म्हणतों कीं, त्याचा कोणताहि भाग आज या घटकेस अंमलांत आणतां येण्यासारखा आहे. शाळा आणि वकीली सोडण्याबद्दलच्या बाबतींत 'हळूं हळूं' असा शब्द घालण्यांत आला आहे, या गोष्टीनें माझ्या कार्यक्रमाचा अव्यावहारिकपणा सिद्ध होत नाहीं; त्याच्या योगानें आपली दुर्बलता

मीं अभ्यास केलेला आहे. त्यावरून मी म्हणूं शकतों (आणि विलायतेंत ही गोष्ट सिद्धांत रूप समजण्यांत येते) कीं, कोणत्याहि संस्थेला विरोधाच्या योगानें पुष्टि मिळते, आणि तिची वाढ होते. राष्ट्रीयांनीं कौंसिलाच्या बाहेर रहावें अशी आज सरकारची इच्छा नाहीं. माझें ठाम मत आहे कीं, कौंसिलांच्या आंत जाण्यापेक्षां बाहेर राहूनच अधिक देशसेवा करतां येते. हिंदुस्थानचा एक लोकमान्य पुरुष कौंसिलांच्या बाहेर राहिल्यामुळेंच त्याच्या हातून येवढी अलौकिक देशसेवा घडली. तो जर कौंसिलांत गेला असता तर त्याचा कोट्यवधि लोकांवर इतका जादुवत् प्रभाव पडला असता काय ? असहकारितेविषयीं लोकमान्यांचें मत तुमच्यापुढें मांडण्यांत आलें आहे. पण त्यासंबंधाची दुसरी एक गोष्ट तुम्हांला सांगण्यांत आलेली नाहीं. ती मी सांगतों. लोकमान्यांच्या मरणाच्या १५ दिवस अगोदर मी व भाई शौकतअली असे दोघे त्यांना भेटण्यासाठीं गेलों होतों. तेव्हां बोलतां बोलतां ते म्हणाले कीं ' माझें स्वतःचें मत असें आहे कीं, कौंसिलांत जाऊन जरूर दिसेल त्या ठिकाणीं सरकारला हरकत करावी, व अवश्यक दिसेल तेथें सहकारिताहि' करावी. पण भाई शौकतअली यांनीं त्यांना विचारलें कीं, 'मग आपण दिल्ली येथें मुसलमानांना वचन दिलें होतें त्याचें कसें काय ?' तेव्हां लोकमान्य म्हणाले, 'अलबत्, जसें मुसलमान करतील तसें आम्हीहि करूं !' आणि हे शब्द केवळ कौंसिलांच्या बहिष्कारापुरतेच नव्हते. ' मी तुम्हांला आश्वासन देतों कीं, माझा पक्ष तुमच्या संगतींत राहील ' असाच त्या शब्दांचा अर्थ होता.

आणि हीं कौंसिलें काय आहेत ? तेथें जाऊन वाद करण्यानें तुम्हांस काय मिळणार आहे ? तुमच्या भाषणांचा मुख्य प्रधानावर प्रभाव पडून तुर्की राष्ट्राशीं झालेल्या तह-नाम्यांतलीं कलमें फिरवून घेण्याची उमेद तुम्ही बाळगतां काय ? पंजाबच्या प्रकरणासंबंधानें अधिकाऱ्यांना पश्चात्ताप करण्यास लावण्याची शक्ति तुमचे ठायीं आहे काय ? मालवीयाजी म्हणतात कीं, कांग्रेस कमिटीच्या पुष्कळशा मागण्या लवकरच पुऱ्या झालेल्या दिसतील. कारण, जुलुमांत भाग घेणारे बरेचसे अधिकारी निघून गेले आहेत आणि खुद्द व्हाइसराय साहेबहि उन्हाळ्यांत जावयाचे आहेत. मी आदर-पूर्वक असें म्हणतों कीं, मी स्वतः येवढेंच करण्यासाठीं रिपोर्टांत आपल्या लेखणीचा उपयोग केलेला नाहीं. या विषयीं चर्चा झाली तेव्हां मीं या गोष्टीवर जोर दिला होता कीं, अधिकाऱ्यांना त्यांची नालायकी व जुलूम याच्यासाठीं बरतर्फ करावयास पाहिजे. त्यांच्या नोकरीची मुदत अद्याप पुरी झालेली नाहीं; आणि व्हाइसरायसाहेबांनासुद्धां त्यांची मुदत पुरी होण्यापूर्वी ते राजीनामा न देतील तर परत जाण्यास लाविलें पाहिजे. मुदत पुरी झाल्यावर व्हाइसरायसाहेब काय किंवा दुसरे कोणी काय, केव्हां जातील याच्याशीं मला काय करावयाचें आहे ? त्यांना पश्चात्ताप करावयास लावणें हा माझा उद्देश आहे. त्यांचें अंतःकरण पालटलें पाहिजे; आणि तसें होण्याचें त कांहींच चिन्ह दिसत नाहीं. अमृत-सरच्या कांग्रेसच्या वेळीं अशी कांहीं स्थिति होण्याची मला उमेद वाटत होती. म्हणून सरकारशीं सहकारिता ठेवण्या-विषयीं मीं येवढा आग्रह धरला होता. पण यागाहून माझे

डोळे उघडले आणि ब्रिटिश प्रधानमंडळ किंवा हिंदुस्तान-सरकार यांना मूळांतच हिंदुस्थानच्या कल्याणाची इच्छा नाहीं हें पाहून माझें अंतःकरण व्यथित झालें. पश्चात्ताप करण्याऐवजीं तुम्हांला उलट असें दाखविण्यांत आलें कीं, तुम्हांला जर ब्रिटिश अंमलाखालीं राहावयाचें असेल तर जुलूम व त्रास यांचा भार तुम्हांला घ्यावा लागेल. यासाठींच अशा सरकारच्या हुकुमतींतल्या कोर्टांवर व शाळांवर बहिष्कार घालण्याची व राष्ट्रीय शाळा उघडण्याची अवश्यकता मला दिसूं लागली आहे.

पण सर्व देशभर अगोदर राष्ट्रीय शाळा स्थापून मग मुलांना सरकारी शाळांतून काढावयाचें इतका विलंब करणें मला पसंत नाहीं. अवश्यकता उत्पन्न झाली कीं जरूरीचीं साधनें गोळा होतातच. आपलीं मुलें शाळेच्या बाहेर पडलीं म्हणजे आपले मालवीयाजीच राष्ट्रीय शाळासाठीं फंड गोळा करण्याकरितां फिरण्यास निघतील. हिंदी लोकांनीं ज्ञानावांचून राहावें असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. प्रत्येक हिंदी माणसाला योग्य शिक्षण मिळावें, स्वतःच्या राष्ट्राच्या प्रतिष्ठेचें ज्ञान व्हावें, आणि त्यानें स्वतःला गुलाम बनविणारें शिक्षण घेण्याचें नाकारावें हीच माझी इच्छा आहे.

आतां शेवटीं दोनच गोष्टी सांगावयाच्या राहिल्या आहेत. सामान्य लोकांना सूक्ष्म भेद कळत नाहींत. ते असें समजतात कीं जेथें लोक सरकारशीं सहकारिता ठेवण्यास नाकबूल असतील तेथें चुकीनें प्रजानियुक्त समजल्या जाणाऱ्या नव्या कौंसिलाच्या प्रतिनिधिमंडळांत असहकारिता सर्वांच्या आधीं दिसली पाहिजे. तसें झालें तरच सरकारचे डोळे

उघडतील. खरी गोष्ट अशी आहे कीं, कौंसिलांत जाण्यास नकार करणारे कौंसिलावर बहिष्कार टाकून स्वस्थ बसणार नाहींत. ते देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत हिंडून प्रजेचीं दुःखें सरकारच्या नाहीं तर लोकांच्या नजरेस आणीत राहतील, आणि कांग्रेस प्रतिवर्षी या दुःखांचा पुकारा करील त्यामुळें हीं दुःखें दूर करवून घेण्यास लागणारी धमक लोकांमध्यें उत्पन्न होईल व ती लोकांत उत्पन्न झालेल्या क्षोभाचें संयमन करून त्याचे अदम्य अशा कार्यशक्तींत रूपांतर करून सोडील.

ध्यानांत ठेवा कीं, मुस्लीम लीगनें तर कौंसिलांवर संपूर्ण बहिष्कार पुकारलाच आहे. आपल्यापैकीं एकचतुर्थांश भागानें एकीकडे खेंचावें आणि तीनचतुर्थांशांनीं अगदीं उलट बाजूस खेंचावें हें बरें दिसतें काय? दोन्ही भाग अगदीं स्वतंत्र असूनहि एकाच दिशेनें खेंचीत राहतील तर गोष्ट निराळी. प्रत्येक मुसलमानानें कौंसिलांवर बहिष्कार घातला तर हिंदुलोक कौंसिलांत जाऊन अडचणी उत्पन्न करण्याच्या धोरणापासून कोणता लाभ मिळविणार आहेत? मुसलमान तर कौंसिलांत जाऊन राजनिष्ठेची शपथ घेणें हें धार्मिक दृष्ट्या पाप समजतात. या गोष्टाकडे दरवर्षी व्यावहारिक राजकीय धोरणाची तरफदारी करणाऱ्या पुढाऱ्यांचें लक्ष मी वेधतों. मुसलमानांनीं केलेला ठराव नुसता नांवालाच आहे असें ते समजत असतील तर माझा मुद्दा निष्फळ ठरेल. पण जर तुम्ही असें समजत असाल कीं, मुसलमान बंधु झोंपेंत बरळत नाहींत, त्यांच्या संबंधनें झालेला अन्याय त्यांच्या पोटांत डांचत आहे, आणि कालगतीबरोबर त्यांच्या

भावनांचा जोर कमी न होतां किंवा त्यांचें विस्मरण न पडतां उलट त्या अधिकाधिक तीव्र होत जातील तर—मग हिंदुलोक मदत करोत किंवा न करोत—मुसलमान आपली चळवळ पुढें रेटीत नेतील हें तुम्ही पहाल. याच गोष्टीचा निर्णय या कांग्रेसला कर्तव्य आहे. म्हणून मी विनयपूर्वक सांगतों कीं, मीं विचार केल्याशिवाय हा मार्ग स्वीकारलेला नाहीं; माझ्यासारख्या सामान्य, व चुकीस पात्र अशा एकट्या माणसानें देशांतल्या उत्तमोत्तम पुढऱ्यांच्या पुढें उभे राहण्याचें साहस केलें तें विचार केल्याशिवाय नाहीं. मला यांतच धर्म दिसत आहे. हिंदुमुसलमानांची एकी—आणि तीहि कायमची—करणें असेल तर जोंपर्यंत मुसलमानबंधु प्रशस्त मार्गानें, अत्याचार वगैरे न करतां, आणि गैरवाजवी मागण्या न मागतां, न्यायाची मागणी करीत आहेत तोंपर्यंत हिंदूंनीं त्यांचा पक्ष पूर्णपणें उचलल्याशिवाय सुटका नाहीं.

मी आतां तुमचा आणखी वेळ घेत नाहीं. मी वकीली न करतां निःपक्षपातानें सर्व गोष्टी तुमच्यापुढें मांडिल्या आहेत. तुम्हांला पंच समजून मीं या गोष्टी पंडित मालवीयाजी यांच्या सूचनेवरून तुमच्यापुढें मांडिल्या आहेत. जर तुमच्यापैकीं प्रत्येकजण देशाखातर व हिंदुमुसलमानांमध्यें कायमची एकी करण्याखातर ठरावांत सुचविलेला स्वार्थत्याग करण्यास तयार व सामर्थ्यवान् असेल तर बिलकुल संकोच न धरतां हा माझा ठराव मंजूर करा. नसेल तर तितक्याच दृढतेनें तो नामंजूर करून आपल्या मनाचा दृढपणा दाखवा.

---

१५८४८.

REFBK-0001748